


सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, ८ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २१० | पाने १२+८ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



कुटुंबातील सर्व सदस्यांनी सूर्योदयापूर्वी उठून सूर्यदर्शन केले पाहिजे. त्यानंतर भक्तिगीत, भजन आदी सर्वांनी सामूहिक पद्धतीने म्हटले पाहिजे किंवा ऐकले पाहिजे. घरात अन्य देवी-देवतांच्या चित्रांसह भारतमातेचे चित्र असणे आवश्यक आहे.

**यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### ट्रम्प १२ व्यांदा म्हणाले, मी भारत-पाक युद्ध थांबवले

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा सांगितले की, त्यांनी भारत आणि पाकिस्तानमधील संभाव्य युद्ध रोखले. ट्रम्प यांनी दावा केला की जर त्यांनी हस्तक्षेप केला नसता तर हा लढा अणुयुद्धात बदलू शकला असता. त्यांच्या अधिकृत विमान एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, दोन्ही देशांना संघर्ष त्वरित थांबवण्यास भाग पाडण्यासाठी त्यांनी व्यापाराचा वापर शस्त्र म्हणून केला. ट्रम्प यांनी आतापर्यंत १२ वेळा या मुद्द्यावर विधाने केली आहेत. ट्रम्प म्हणाले- आम्ही भारत आणि पाकिस्तानमधील एक मोठी संभाव्य अणु समस्या सोडवली. मी दोन्ही देशांच्या नेत्यांशी बोललो.

# राहुल गांधींकडून मतदारांचा अपमान

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

◆ **नागपूर, ७ जून**

निवडणुकीवर शंका उपस्थित करून राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील लोकांचा आणि महिला मतदारांचा अपमान केला, असा घणाघात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. राहुल गांधींनी केलेले दावे म्हणजे आगामी बिहार विधानसभेत काँग्रेसच्या पराभवाची कबुली देण्यासारखे आहे आणि या माध्यमातून स्वतःला खोटा दिलासा देण्याचा प्रयत्न राहुल गांधी यांनी करू नये, असे फडणवीस म्हणाले.



एका उपलेखाकडे लक्ष वेधताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राहुल गांधींनी अज्ञानातून जागे व्हावे आणि काँग्रेस पक्षाच्या भीषण भविष्याचे वास्तव समजून घ्यावे. जोपर्यंत राहुल गांधी जमिनीवरील तथ्ये समजून घेत नाहीत आणि स्वतःशी खोटे बोलणे आणि खोटी आश्वासने देणे थांबवत नाहीत, तोपर्यंत त्यांचा पक्ष कधीच जिंकणार नाही. त्यांनी अज्ञानातून जागे व्हावे, अन्यथा ते तथ्य नसलेल्या गोष्टी बोलत राहतील, असे फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितले.

राहुल गांधी यांनी यापूर्वीही असेच आरोप केले. आपण काय बोलतो, तेच त्यांना माहीत नाही. त्यांचे ऐकणाऱ्या लोकांना ते काय बोलतात, हे समजत नाही. यावर प्रतिक्रिया देण्याची गरज नसल्याचे मला वाटते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

◀(तभा वृत्तसेवा)

### आरोप निराधार : निवडणूक आयोग

**नवी दिल्ली :** राहुल गांधी यांनी केलेले आरोप अवास्तव व निराधार असल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले. मतदारांचा निर्णय आपल्या विरोधात गेला म्हणून आयोगाच्या निष्पक्षतेवर संशय घेणे आणि बदनामी करणे हे पूर्णतः गैरवाजवी व हास्यास्पद आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडली होती. सर्व राजकीय पक्षांचे अधिकृत एजंट मतदान केंद्रांवर उपस्थित होते आणि कुठल्याही वेळी काँग्रेसच्या एजंटांनी कोणतीही तक्रार केलेली नसल्याचे आयोगाने म्हटले आहे.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 'हेराफेरी'

### भाजपाची नजर आता बिहारवर : राहुल गांधी

◆ **नवी दिल्ली, ७ जून**



महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाल्याचा आरोप पुन्हा एकदा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी केला. टप्प्यानुसार महाराष्ट्रातील निवडणुकीत कोणत्या टप्प्यात कसा गोंधळ झाला आणि भाजपाला फायदा मिळाला, हे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांच्या आरोपावर भाजपाने पलटवार केला आहे.

२०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पद्धतशीरपणे लोकशाहीला धोका पोहोचवण्याची योजना होती, असा राहुल गांधी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. भाजपाची नजर आता या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बिहार निवडणुकीवर असल्याचा दावाही एक्सवर केला आहे.

भाजपाने पाच टप्प्यात निवडणूक घेण्याची व्यूहरचना वापरली आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल प्रभावित केले. मोदी सरकारने २०२३ मध्ये निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीशी संबंधित कायदा बदलून तो केंद्र सरकारला फायदा होईल असा केला. या माध्यमातून पंचांच्या नियुक्तीसाठी पॅनलमध्ये हेराफेरी करण्यात आली, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

◀(वृत्तसंस्था)

## आषाढी पायदळ वारी भारतीय सैन्याला समर्पित

◆ **आकोट, ७ जून**




तालुक्यातील मुंडगाव येथील श्री गजानन महाराज पादुका संस्थानच्या विश्वस्त मंडळाद्वारे यावर्षीची श्रीक्षेत्र मुंडगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढी पायदळ वारी ऑपरेशन सिंदूर राबविणाऱ्या भारतीय वीर जवानांना समर्पित केली आहे. पायदळ दिंडीतील ऑपरेशन सिंदूरच्या फलकांची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पादुका संस्थान मुंडगावच्या वतीने ३ जून ते १० जुलैपर्यंत आषाढी एकादशीकरिता पंढरपूरला पायदळ दिंडीचे आयोजन करण्यात आले. ८ जून रोजी कौलखेड अकोला येथे पालखीचा मुक्काम आहे. या दिंडीची विशेषत: अशी की, वारकरी संप्रदायाचे पालन करण्याबरोबरच या दिंडीत कन्या भ्रूणहत्या निर्मूलन, आरोग्य, कृषी, शिक्षण, पर्यावरण संरक्षणावर आधारित संदेश देण्यात येत असतात. ४० दिवसांच्या या प्रवासात रात्री मुक्कामाच्या ठिकाणी हरी कीर्तनात कीर्तनकार मंडळी या सर्व विषयाची जनजागृती करीत असतात.

◀(तभा वृत्तसेवा)

## बिजापुरातील दोन चकमकींत सात नक्षल्यांचा खात्मा

◆ **बिजापूर, ७ जून**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातील इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात झालेल्या दोन चकमकींमध्ये सुरक्षा दलांनी सात नक्षलवाद्यांचा खात्मा केला, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली. ठार झालेला टॉप कमांडर भास्करच्या शिरावर ४० लाखांचे बक्षीस होते.

मागील तीन दिवसांत झालेल्या कारवाईत वरिष्ठ माओवादी नेता सुधाकर आणि भास्करसह सात नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले. इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात सुरू असलेल्या नक्षलविरोधी मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांना नक्षलवाद्यांचे सात मृतदेह आढळले, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

शनिवारी झालेल्या गोळीबारानंतर दोन मृतदेह सापडले, तर शुक्रवार आणि शनिवारी रात्री झालेल्या गोळीबारानंतर तीन मृतदेह सापडले.

माओवादी नेता सुधाकर, तेलंगणा राज्य समिती सदस्य बंदी प्रकाश, दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समिती सदस्य पप्पा राव आणि इतर काही सशस्त्र नक्षलवादी परिसरात असल्याच्या माहितीच्या आधारे ४ जून रोजी राज्य पोलिसांच्या विशेष कृती दल आणि जिल्हा राखीव रक्षक तसेच सीआरपीएफच्या विशेष कोब्रा बटालियनच्या समावेश असलेल्या दलांनी ही कारवाई केली. शुक्रवारी सुरक्षा दलांनी ४५ लाख रुपयांचे बक्षीस असलेल्या माओवाद्यांच्या तेलंगणा राज्य समितीचा विशेष क्षेत्रीय समिती सदस्य भास्कर ऊर्फ मैलारापू अडेलू याला चकमकीत ठार केले.

◀(वृत्तसंस्था)

## २७ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर

### जागतिक बँकेची आकडेवारी, भारताच्या विकासाचा डंका

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

कधीकाळी डोंबाऱ्यांचा देश म्हणून जगात ओळखला जाणाऱ्या भारताने मागील १४ वर्षांमध्ये वेगाने प्रगती केली आहे. २०११-२०१२ मध्ये भारतात गरिबीचा दर २७.१ टक्के होता, तो आता केवळ ५.०३ टक्के एवढा आहे, असे जागतिक बँकेने जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत म्हटले आहे. ११ वर्षांच्या काळात तब्बल २७ कोटी नागरिक गरिबीतून बाहेर आले आहेत. २०११-१२ मध्ये देशात सुमारे ३४ कोटी ४० लाख नागरिक गरिबीचे जीवन जगत होते.

भारताने अत्यंत गरिबी कमी करण्यात उल्लेखनीय प्रगती केली आहे, २०११-१२ ते २०२२-२३ दरम्यान २६९ दशलक्ष लोक त्यातून बाहेर पडले. जागतिक बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार, २०११-१२ मध्ये अत्यंत गरिबीचा दर २७.१ टक्क्यांवरून २०२२-२३ मध्ये फक्त ५.३ टक्क्यांपर्यंत घसरला. २०११-१२ मध्ये भारतातील सुमारे ३४४.४७ दशलक्ष लोक अत्यंत गरिबीत जगत होते. २०२२-२३ पर्यंत ही संख्या झपाट्याने घसरून ७५.२४ दशलक्ष झाली. यातील बरीच प्रगती उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्यप्रदेश सारख्या राज्यांमधून झाली आहे, जे एकत्रितपणे २०११-१२ मध्ये भारतातील अती गरिबांपैकी ६५ टक्के होते. गेल्या दशकात एकूण दारिद्र्य कमी करण्याच्या दोन तृतीयांश योगदानात या राज्यांचा वाटा आहे.

२०१७ च्या किमतीवर आधारित पूर्वीच्या २.१५ डॉलर्स प्रतिदिन दारिद्र्यरेषेचा वापर करून, भारतातील दारिद्र्यरेषा २०११ मध्ये १६.२ टक्क्यांवरून २०२२ मध्ये फक्त २.३ टक्क्यांपर्यंत घसरली. यामुळे अत्यंत गरिबीत जगणाऱ्या लोकांची संख्या २०५.९३ दशलक्ष वरून ३३.६६ दशलक्ष पर्यंत कमी झाली. जागतिक बँकेने २०२१ च्या किमतींशी जुळवून घेतलेले, दररोज ३.०० अमेरिकन डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्नावर जगणे म्हणजे अत्यंत गरिबीची व्याख्या केली आहे.

ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात गरिबीतील घट मोठ्या प्रमाणात दिसून आली आहे. ११ वर्षांच्या कालावधीत ग्रामीण दारिद्र्य १८.४ टक्क्यांवरून २.८ टक्क्यांवर आले, तर शहरी दारिद्र्य १०.७ टक्क्यांवरून फक्त १.१ टक्क्यांवर आले.

◀(वृत्तसंस्था)







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

॥ उसंतवाणी ॥
१५३४

दऱ्या नि डोंगर। घेतले सांधुन।
ठेवले बांधून। निसर्गाला ॥१॥

चिवट नि जिद्दी। माणसाची जात।
करूनिया मात। पुढे जाई ॥२॥

रेलवे धावली। चिनाब वरून।
काळीज भरून। आले आज ॥३॥



काश्मीर म्हणजे। भूमीवर स्वर्ग।
तेथे रेल्वे मार्ग। पोचला हा ॥४॥

झटले तंत्रज्ञ। कष्टले मजूर।
आनंदाला पूर। आला आहे ॥५॥

केवळ ना रेल। स्वप्नच धावले।
रूप हे भावले। विकासाचे ॥६॥

कांत उजळली। प्रगतीची दिशा।
मनामध्ये आशा। फुललेली ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०७ जून २०२५

# आषाढी यात्रेत २७ जूनपासून २४ तास दर्शन

## • टोकन दर्शन प्रणालीची १५ जून रोजी पहिली चाचणी : गहिनीनाथ महाराज औसेकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.७ जून -**

आषाढी यात्रा ही पंढरीतील महायात्रा म्हणून ओळखली जाते. यावर्षी आषाढी एकादशी ६ जुलै रोजी आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक श्रीची शासकीय महापूजा केली जाणार आहे. यात्रेचा कालावधी २६ जून ते १०जुलै असा आहे. या यात्रा कालावधीत येणा-या वारकरी भाविकांना अत्याधुनिक व पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, दिनांक २७ जून पासून २४ तास दर्शन असणार आहे.

याशिवाय, यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर जतन व संवर्धनाची सध्या सुरू असलेली सर्व कामे अंतिम टप्प्यात असून, टोकन दर्शन प्रणालीची दिनांक १५ जून रोजी पहिली चाचणी घेण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. मंदिर समितीची बैठक सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या



अध्यक्षतेखाली आज दिनांक ०७ जून रोजी दु.२.०० वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. सदरहू सभेस सदस्य शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्व विभागाचे रामेश्वर निपाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, सर्व खाते प्रमुख, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे व जतन - संवर्धनाचे ठेकेदार उपस्थित होते.

बैठकीमध्ये आषाढी यात्रा २०२५ नियोजन, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन आराखड्यांचा कामाचा आढावा, मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना शनिरत्न व मानवसेवा जीवनगौरव राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत, प्रतिवर्षीप्रमाणे विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देणे, टोकण दर्शनाची चाचणी घेणे इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेण्याचे आल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले. याशिवाय, आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेचे राज्याचे मुख्यमंत्री महोदय मा देवेंद्रजी फडणवीस यांना दिनांक १६ किंवा १७ जून रोजी मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण देण्यात येणार आहे. चंदनउटी पुजेची दिनांक १३ जून रोजी सांगता पुजा होणार असून, श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्या ड माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

**सुलभ व जलद दर्शन देण्यावर मंदिर समितीचा भर**

आषाढी यात्रेत भाविकांना सुलभ व जलद दर्शन उपलब्ध करून देण्यावर मंदिर समितीचा भर राहणार असून, दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून वॉटरप्रुफ मंडप, ४+६ पत्राशेड, विश्रांती कक्ष, फॅब्रिकेटेड शौचालये, लाईव्ह दर्शन, कुलर फॅन, सार्वजनिक सूचना प्रणाली, मिनरल वॉटर, कमांडोज नियुक्ती, आपत्कालिन सुविधा, चहा खिचडी वाटप, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल, २४ तास अन्नछत्र, बँग स्कॅनर मशिन, हिरकणी कक्ष, नदीपात्रात चेंजिंग रूम इत्यादी स्वरूपाच्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्याबाबतची सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



# बार्शीमध्ये अस्थी विसर्जन न करता वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ जून-**

आईचे निधन झाल्यावर व तिचे पार्थिव दहन केल्यानंतर त्याची राख पाण्यात विसर्जित न करता आईच्या आठवणी सतत आपल्यासोबत रहाव्या यासाठी बार्शीतील चार भावंडांनी शेतातच खड्डे घेऊन त्या ठिकाणी राख टाकून तेथेच चार झाडे लावली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे निवृत्त उपकुलसचिव डॉ. सुधाकर बोकेफोडे यांच्या आई द्रौपदी यांचे मंगळवारी (दि. ३) निधन झाले. गुरुवारी (दि. ५) तिसरा दिवस होता. परंपरेला फाटा देत, कोणतेही विधी न करता सावडण्याच्या दिवशी ती राख थेट त्यांच्या बार्शी तालुक्यातील नांदणी येथील शेतात घेऊन गेले व चार खड्डे घेत त्यात राख टाकून तेथेच चिंच, पिंपळ, आणि जांभळाची झाडे लावली. योगायोगाने जागतिक पर्यावरण दिन असल्याने पाण्यात राख विसर्जित करुन जल प्रदूषण करण्यापेक्षा बोकेफोडे यांच्यासह निवृत्त अधिकारी भगवान, महादेव आणि तुषार या चार भावंडांनी वृक्षारोपण करुन पर्यावरणपूरकतेचा संदेश दिला. यावेळी सुनंदा चव्हाण, सुनीता वाघमारे या बहिणीदेखील उपस्थित होत्या. 'माझ्या मरणानंतर कोणतेही विधी न करता माझ्या नावाने झाडे लावा', अशी आईचीच इच्छा होती, अशी भावना बोकेफोडे यांनी व्यक्त केली.

# ६ पोलीस निरीक्षकांसह २४ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

पोलीस आयुक्तालयातील फौजदार ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक दर्जाच्या २४ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी दिले आहेत. यामध्ये हज्ञा पोलीस निरीक्षक, ९ सहाय्यक पोलीस निरीक्षक व ९ फौजदार यांचा समावेश आहे.

**पोलीस निरीक्षक -** जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातील सुहास चव्हाण यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे त्यांच्या जागी शहर वाहतूक शाखेतील सुरज मुलाणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुरक्षा शाखेतील शिवाजी राऊत यांची बदली जेलरोड पोलीस ठाण्यात करण्यात आली तर जेलरोडचे सुरेश चाटे यांची बदली शहर वाहतूक शाखेच्या उत्तर विभागात करण्यात आली आहे. विजापूर नाका पोलीस ठाण्यातील संगीता पाटील यांची बदली सुरक्षा शाखा व विमानतळ सुरक्षा विभागाकडे झाली आहे. तर नव्याने रुजू झालेले सुशांत वराळे यांच्याकडे विजापूर नाका पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेचा पदभार देण्यात आला आहे.

**सहाय्यक पोलीस निरीक्षक -** शहर गुन्हे शाखेतील संदीप पाटील यांची बदली जेलरोड पोलीस ठाण्यात, गुन्हे शाखेतील संजय क्षीरसागर यांची बदली फौजदार चावडी पोलीस ठाण्यात, शहर वाहतूक नियंत्रण शाखेतील अनिल राजगुरू यांची बदली सदर पोलीस ठाण्यात, नियंत्रण कक्षातील रमेश कांबळे यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे, नियंत्रण कक्षातील राचप्पा चानकोटी यांची अर्ज शाखेत बदली करण्यात आली आहे.

**पोलीस उपनिरीक्षक -** विजापूर नाका पोलीस ठाण्यातील अजय पोपळभट यांची बदली शहर वाहतूक दक्षिण शाखेत नियंत्रण कक्षातील नागनाथ कानडे यांची बदली, शहर वाहतूक नियंत्रण शाखेतील प्रवीण पारडे यांची बदली सदर बझार पोलीस ठाण्यात, आर्थिक गुन्हे शाखेतील मोहन पवार यांची बदली विजापूर नाका पोलीस ठाण्यात, विशेष शाखेतील प्रकाश किणगी यांना फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील राधा जेऊघाले यांना, जलद प्रतिसाद पथकातील प्रकाश बनसोडे यांना एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली.

वाहतूक शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश कुलकर्णी यांची बदली सदर बाजार पोलीस ठाण्यात, अर्ज शाखेतील हिनाकौसर कलाल यांची बदली शहर वाहतूक उत्तर विभागात, सदर बझार पोलीस ठाण्यातील फौजदार अतुल बनकर यांची बदली शहर वाहतूक दक्षिण भागात व सदर बाजार पोलिस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण पाटील यांची एमआयडीसी येथे विमानतळ सुरक्षा विभागात बदली झाली आहे. या सर्व अधिका-यांनी विनंतीवरून त्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

# राहुलजी, २००९ मध्ये ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते

## तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का?; चंद्रशेखर बावनकुळेंचे प्रत्युत्तर

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ७ जून-**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर शंका उपस्थित करणाऱ्या काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांचे आरोप भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आकडेवारी खोडून काढलेत आहेत. त्यांनी एक्स वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, राहुल गांधी म्हणतात महाराष्ट्रात ५ महिन्यांत ३९ लाख मतदारांची वाढ ''संशयास्पद'' आहे. पण राहुलजी २००९ ला काय झालं होतं? तुम्हाला आठवत नसेल तर मी सांगतो.

एप्रिल २००९ ला लोकसभा निवडणुकीत ७ कोटी २९ लाख ५४ हजार मतदार होते तर ऑक्टोबर २००९ ला विधानसभा निवडणुकीत ७ कोटी ५९ लाख ६८ हजार मतदार झाले. तेव्हाही फक्त ५ महिन्यांत ३० लाख मतदार वाढले होते! तेव्हा तुमचा



निवडणूक आयोगावर विश्वास होता की तेव्हाही काँग्रेस-आयोग युतीच होती? तेव्हा तुम्ही घोटाळा केला होता का? याचं उत्तर द्या.

२००४, २००९ ला जिंकलात तेव्हा काही प्रश्न पडले नाहीत! आज पराभव झाला, महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला झिडकारलं तेव्हा रडगाणे सुरू झाले .

राहुलजी आकड्यांचं अर्धवट वाचन करून देशाला गोंधळात टाकण्याचा निरर्थक प्रयत्न करू नका. स्वतःचं अपयश लपवण्यासाठी दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षण करा. महाराष्ट्रातील जनतेनं तुम्हाला नाकारलं आता बिहारमधील जनताही तुम्हाला हद्दपार करणार आहे. त्याच भीतीतून तुम्ही आतापासून पराभवाचं कारण देत आहात. आमच्या महायुतीला महाराष्ट्रातील जनतेने बहुमताने निवडून दिले. जनतेने आमच्यावर दाखविलेला हा विश्वास आहे. तो पुढील निवडणुकीतही असाच अभंग राहील. आपण वारंवार खोटे बोलून राज्यातील जनदेशाचा अपमान करीत आहात. जनता तुम्हाला कधीच माफ करणार नाही.असेही त्यांनी म्हटले आहे.

# एखादी व्यक्ती पक्षातून गेली तर पक्ष संपत नाही

### माजी नगराध्यक्षा डॉ. मलगोंडा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.७ जून-**

एखादी व्यक्ती पक्षातून गेली म्हणून पक्ष संपत नाही आम्ही नव्याने आणि जोमाने कॉग्रेस पक्ष उभा करु असे प्रतिपादन माजी नगराध्यक्षा डॉ. सुवर्णा मलगोंडा यांनी पत्रकार परिषदेत केले.

माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या शिवसेना प्रवेशानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. विधानसभेला काँग्रेस पक्षाला सुमारे एक लाख मतदान झाले ही कॉग्रसची ताकद विसरता येणार नाही. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत १६ वेळा विधानसभा निवडणूक झाली असून ११ वेळा काँग्रेसला यश मिळाले. तर फक्त चार वेळा पराभव झाला आहे. यावेळी उपाध्यक्ष अरुण जाधव म्हणाले, कॉग्रेस पक्षाने अनेक वादळे पचवली आहेत. लोक येतात जातात पक्ष संपत नाही. संपणार नाही. मी पक्षातच राहणार आहे. सर्वप्रथम मी भूमिका जाहीर केली होती. माझ्या भूमिकेचे स्वागत खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.

डॉ सुवर्णा मलगोंडा म्हणाल्या, कॉंग्रेसपक्षाने मला नगराध्यक्ष केले. महिला जिल्हाध्यक्ष केले. माझी आई श्रीमती पार्वती मलगोंडा यांना मंत्रिपद दिले याची जाणीव आहे. राजकीय वारे फिरले म्हणून मी बदलणार नाही. काँग्रेसला वाऱ्यावर सोडणार नाही. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील काँग्रेसची घडी बसवणार आहे. यावेळी जि.प.चे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील म्हणाले, आगामी काळात शहर तालुक्यातील कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात येणार आहे. आता काँग्रेस संकटात असली तरी भविष्य उज्ज्वल आहे.

# बार्शीत हिंदू खाटीक समाजातील गुणवंतांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जून-**



येथील हिंदू खाटीक समाजाच्यावतीने आयोजित केलेल्या स्नेहमेळाव्यात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सोलापूर रोड येथील व्ही. के. मार्ट समोरील हिंदू खाटीक समाज सभागृह येथे हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष आसिफभाई तांबोळी, बार्शी नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, तहसीलदार एफ. आर. शेख, बार्शी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, हिंदू खाटीक समाजाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणराव गालिंदे, हिंदू खाटीक समाजाचे माजी अध्यक्ष व्यंकट बेंद्रे, प्रदेश सचिव राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचे पार्थ गालिंदे, युवा प्रदेशाध्यक्ष रोहित थोरात, सोलापूर हिंदू खाटीक समाजाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र गायकवाड, बार्शी हिंदू खाटीक समाजाचे अध्यक्ष शिवाजीराव जठार आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजेंद्र राऊत म्हणाले की, शहरातील खाटीक समाज हा कष्ट करणारा समाज आहे. त्यांच्या कार्यक्रमासाठी सभागृहाची आवश्यकता असल्याने मी आमदार असताना आमदार फंडातून त्यांना ३५ लाख रुपये खर्च करुन सभागृह उपलब्ध करुन दिले आहे. या सभागृहाचा वापर चांगल्या कार्यक्रमासाठी समाज बांधवांनी करावा. तसेच या सभागृहाच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण भिंत, पाण्यासाठी बोअर व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्याचे त्यांनी आश्वासन दिले. हिंदू खाटीक समाजाने आयोजित केलेला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व शालेय साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम स्तुत्य आहे.

यावेळी सभागृहाचे बांधकाम करणारे ठेकेदार अभिजीत डिडवळ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समाजातील बांधव व युवक आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन नीता देव यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान भवन बांधण्याच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करणार

### कौशल्य, रोजगार, उद्योजकता मंत्री लोढा यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या मागील नॉर्थकोट मैदानावरील एक एकर जागेवर संविधान भवन बांधण्यासाठी शासन स्तरावरून अपूर्ण राहिलेली मान्यतेची प्रक्रिया लवकरच पूर्ण करणार आहे, असे आश्वासन महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीच्या वतीने मंत्री मंगल प्रभात लोढा यांना निवेदन देत असताना यातील शिष्टमंडळाला वरील आश्वासन दिले आहे.यावेळी आ. देवेंद्र कोठे यांनी ही संविधान भवन बांधण्यासाठी लागणारा आर्थिक निधी महाराष्ट्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्याची ग्वाही या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव, सरचिटणीस राजरत्न फडतरे, कार्याध्यक्ष राजा सोनकांबळे , प्रसिद्धी प्रमुख गौतम मसलखांब, संपर्क सचिव सिद्धार्थ जाधव, कोषाध्यक्ष दत्ता गायकवाड, उपाध्यक्ष, नागसेन गायकवाड, धर्मेंद्र चंदनशिवे, व्हि.बी.भालशंकर, प्रविण सोनवणे, मच्छिन्द्र अंगुले यांच्यासह कृती समितीमधील मान्यवर पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मावळे भवानी ज्योत घेऊन रायगडकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

श्रीमंतयोगी, जाणता राजा, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त सोलापुरातील मावळे भवानी ज्योत घेऊन रायगडकडे रवाना झाले. यावेळी शिवगर्जना आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत, महिला मुली तसेच आबालवृद्ध शिवप्रेमी व शिवभक्तांनी हिंदवी स्वराज्याची राजधानी रायगडची वाट धरली.

दरम्यान, शिवराज्य राज्याभिषेक सोहळ्यासाठी सालाबादप्रमाणे तुळजापूर येथून भवानी ज्योतचे पूजन सोलापूर येथील भीमाशंकर थोबडे नगर मधील रहिवाशांच्यावतीने करण्यात आले होते. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची आरती करण्यात आली. त्यानंतर शिवगर्जना देऊन जय भवानी जय शिवाजी गजरात भवानी ज्योतचे पूजन करण्यात आले. यावेळी अनिल शिंदे, परशुराम भिमाळी, दशरथ मोरे, प्रमोद चुगे, उत्कर्ष वैद्य, पांडुरंग मोरे, यांच्यासह भीमाशंकर थोबडे नगर मधील स्थानिक रहिवासी उपस्थित होते.



**शिवरायांची अष्टप्रधान मंडळाची निर्मिती**

६ जून १६७४ या दिवशी अनेक वर्षांच्या संघर्षानंतर हिंदवी स्वराज्याचे सार्वभौम सिंहासन दुर्गराज रायगड येथे प्रस्थापित होऊन शिवराय छत्रपती झाले. खऱ्या अर्थाने तो हिंदुस्थानाचा पहिला स्वातंत्र्य दिनच आहे. छत्रपती शिवरायांनी स्वतःला राज्याभिषेक करतानाच अष्ट प्रधान मंडळाची निर्मिती करून लोकशाही मूल्यांची स्थापना देखील यादिवशी केली. अनेक वर्षांच्या गुलामगिरीनंतर या देशाला भुमीपुत्रांचे स्वराज्य लाभले. छत्रपती शिवरायांच्या राज्यभिषेकाने असंख्य मावळ्यांच्या बलिदानाचे सार्थक झाले. या महान दिवसाची आठवण म्हणून प्रतिवर्षी मोठ्या उत्साहात भवानी ज्योत रायगडकडे मार्गस्थ होते.

**- अनिल शिंदे, स्थानिक नागरिक**

# जिल्ह्यातील २३२७ शाळांचे जीआयएस मॅपिंग




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

जिल्ह्यात १८ एप्रिल पासून शिक्षणअधिकारी कादर शेख यांनी ऑनलाईन सर्व शाळांचे जीआयएस मॅपिंग करण्याचे आदेश दिले होते . जीआयएस मॅपिंगद्वारे शौचालय, मैदान, किचन शेड, पाण्याची सोय व शाळेची इमारत आदि फोटो शासनाच्या ॲपवर अपलोड करण्यात आले होते. जिल्ह्यातील २७७७ शाळांपैकी २३२७ शाळांचे जीआयएस मॅपिंग पूर्ण झाले आहे. अनेक शाळांमध्ये इंटरनेट सुविधा नसल्याने फोटो अपलोड करताना अडचणी आल्या होत्या.

विशिष्ट ॲपवरच सर्व फोटो अपलोड करण्यासाठी विशिष्ट मुदत देण्यात आले होते. मुख्याध्यापकांना जीआएस मॅपिंग करताना अडचणींचा सामना करावा लागला होता. म्हणून जिल्ह्यात जीआयएस मॅपिंग अपूर्ण असल्याचे दिसून येते. राज्यात अनेक शाळा , शिक्षक व भौतिक सुविधा बोगस असल्याने जीआयएस मॅपिंगवरून करण्यात आले होते. जिल्ह्यात अजूनही ४४६ शाळा जीआयएस मॅपिंग केले नाहीत. जीआयएस मॅपिंगमुळे बोगसगिरीवर कारवाई होऊन शाळांच्या विकासासाठी मदत होणार आहे. जिल्ह्यात सर्वाधिक मॅपिंग सांगोला तालुक्यात ३६२ शाळा तर सर्वात कमी उत्तर सोलापूर तालुक्यात २९ शाळांनी मपिंग पूर्ण केले आले आहेत.

| जीआयएस मॅपिंग | |
|---|---|
| अक्कलकोट | २१७ |
| उत्तर सोलापूर | २९ |
| करमाळा | १९३ |
| दक्षिण सोलापूर | १५८ |
| पंढरपूर | ३०३ |
| बार्शी | ७२ |
| मंगळवेढा | १३२ |
| माढा | २८७ |
| माळशिरस | ३३७ |
| मोहोळ | २३५ |
| सांगोला | ३६२ |
| एकूण | २३२७ |

**जीआयएस टॅगिंग शाळांचा उत्तम प्रतिसाद**

जिल्ह्यात २७७७ शाळा असून ४ शाळा बंद आहेत. २७७३ शाळांपैकी २३२७ शाळांचे जीआयएस मॅपिंग करण्यात आला आहे. सर्व शाळांनी उत्तम प्रतिसाद दिल्याने शाळांच्या भौतिक सुविधांसह इतर माहीती कळण्यास मदत होणार आहे.

**- कादर शेख, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## महत्त्वाचे

### एक लाख रुपयांच्या बनावट नोटा जप्त, दोघांना अटक

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यात १.०८ लाख रुपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहे. यात दोघांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले. एका गुप्त माहितीच्या आधारे, पोलिसांनी २ जून रोजी मीरा रोड येथील विनय नगर भागात आरोपींना अटक केली आणि त्यांच्याकडून ५०० रुपयांच्या २६ नोटा जप्त केल्या. आरोपी, सुपर्णा रामकृष्ण मन्ना आणि सूर्यदेव गोपीनाथ गायन हे मूळचे पश्चिम बंगालचे रहिवासी आहेत. या दोघांच्या निवासस्थानाची झडती घेतली असता त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या आणखी १९० नोटा आढळल्या. जप्त केलेल्या नोटेची किंमत १.०८ लाख रुपये होती. पोलिस पथकाने एक प्रिंटर, कागदाचे तुकडे आणि बनावट नोटा छापण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या इतर वस्तू देखील जप्त केल्या आहेत. या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खैबर पख्तूनख्वा येथील शाळेत बॉम्बस्फोट

**इस्लामाबाद** : पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील एका सरकारी हायस्कूलला शुक्रवारी सकाळी अज्ञात हल्लेखोरांनी लक्ष्य करून बॉम्बहल्ला केला. या हल्ल्यात शाळेतील अनेक वर्गखोल्या उद्ध्वस्त झाल्या. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टँक जिल्ह्यातील गुल इमाम पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या अकबरी गावातील सरकारी हायस्कूल स्फोटकांनी उडवून देण्यात आले. आतापर्यंत कोणत्याही दहशतवादी गटाने या शाळेतील बॉम्बस्फोटाची जबाबदारी स्वीकारलेली नाही. तथापि, टँक जिल्ह्यात सक्रिय असलेल्या बंदी घातलेल्या तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) चे छोटे गट मुलींच्या शिक्षणाविरुद्ध आहेत आणि ते अनेकदा मुलींच्या शाळांना लक्ष्य करतात. स्थानिक स्वयंसेवी संस्थांनी गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या दशकात अशा हल्ल्यांमध्ये प्रांतातील ४५० हून अधिक शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत,

### लाच स्वीकारल्याप्रकरणी सरकारी अधिकाऱ्याला अटक

**ठाणे** : नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्र (नैना) प्रकल्पाशी संबंधित जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील एका कर्मचाऱ्याला ५० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी संजिपन सानप यांना लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले, असे एसीबी-नवी मुंबई युनिटचे पोलिस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी सांगितले. ४ जून रोजी दाखल झालेल्या तक्रारीवरून ही कारवाई सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारदाराच्या मित्राची नैना प्रकल्पांतर्गत येणारी मालमत्ता होती आणि त्याने जमीन सर्वेक्षणासाठी अर्ज केला होता. तक्रारदाराने सर्वेक्षणासाठी आवश्यक शुल्क भरल्यानंतर, तो सर्वेक्षणाच्या तारखेबद्दल विचारपूस करण्यासाठी सानप यांच्याकडे गेला, असे अधिकाऱ्याने सांगितले. सानप यांनी सीमांकन आणि सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी तक्रारदाराकडून दोन लाख रुपयांची मागणी केली आणि ५० हजार रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मिळावा यासाठी आग्रह धरला, असे त्यांनी सांगितले.

### तीन बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरमधील दोन प्रतिबंधित संघटनांशी संबंधित तीन बंडखोरांना सुरक्षा दलांनी अटक केली आहे, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले. शुक्रवारी बिष्णुपूर, काकचिंग आणि इंफाळ पश्चिम जिल्ह्यात सर्व अटक करण्यात आली. बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टीच्या एका सक्रिय कार्यकर्त्याला खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपाखाली बिष्णुपूरमधील वांगू समुशांग भागातून अटक करण्यात आली. कुंबी परिसरातील शाळा, महाविद्यालये, दुकानदार आणि निवडून आलेल्या सदस्यांकडून या दहशतवाद्याने पैसे मागितले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.५ | २४.६ |
| अमरावती | ३६.८ | २६.३ |
| भंडारा | -.- | २५.० |
| बुलडाणा | ३६.५ | २५.४ |
| चंद्रपूर | ४१.० | २६.६ |
| गडचिरोली | ३९.० | २५.६ |
| गोंदिया | ३८.२ | २६.४ |
| नागपूर | ३९.५ | २८.५ |
| वर्धा | ३८.० | २८.० |
| वाशीम | ३८.० | २६.० |
| यवतमाळ | ३९.२ | २७.४ |

# राज्यात सध्या ‘ठाकरें’चीच चर्चा

## काका-पुतण्याच्या मनोमिलनाच्या बातम्या तूर्त थांबल्या



**मुंबई, ७ जून**

गेल्या पंधरा दिवसांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पुन्हा एकत्र येणार,अशी चर्चा रंगली आहे. प्रथमच दोन्ही नेत्यांनी सकारात्मक संकेत दिल्यानंतर राजकीय वर्तुळात उबाठा-मनसे एकत्र येणार असल्याचे बोलले जात असून दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य पसरले आहे. मात्र, दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या बातम्यांना तूर्त विराम मिळाला आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याची हवा सध्या पसरलेली आहे. उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना लवकरच गोड बातमी देणार असल्याचे सांगितले तर राज यांनी शनिवारी मिश्किलपणे मातोश्रीवर निघालो असल्याचे सांगत पत्रकारांना गुगली टाकली. दोन्ही चुलत भावंडांच्या एकत्र येण्यावर राजकीय वर्तुळातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. दोन्ही बंधू एकत्र आले तर आम्ही त्याचे स्वागत करू, अशी प्रतिक्रिया काँग्रेसने व्यक्त केली तर दोन्ही भाऊ एकत्र येणे मराठी माणसासाठी सुचिन्ह आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले.

शिवसेनेचे वरिष्ठ नेते गजानन कीर्तीकर यांनी तर उद्धव आणि राजबरोबर एकनाथ शिंदे यांनीही एकत्र यावे, अशी भावना व्यक्त केली आहे. सध्याची शिवसेना भाजपप्रणित आहे आणि भाजपला एकत्र आलेली शिवसेना नको आहे, अशी टीकाही कीर्तीकर यांनी केली आहे.

दरम्यान, युतीबाबत काय करायचे आहे हे त्यांना ठरवू द्या, मला त्याचे काही घेणेदेणे नाही, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. तर दोन्ही भावंडे एकत्र आले तरी काहीच फरक पडणार नाही. दोन्ही पक्षांचा विधानसभेतील आकडा फक्त २० एवढा आहे तर आमचा २०० पेक्षा जास्त, असा टोला केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी लगावला आहे. (वृत्तसंस्था)

### मुंबईवर परिणाम होऊ शकतो

शिवसेना-मनसे वेगवेगळे लढत असल्याने मराठी मतांची फाटाफूट होऊन त्याचा फायदा इतर पक्षांना मिळत असल्याचे आतापर्यंतच्या निवडणुकांमधून सिद्ध झाले आहे. लोकसभा निवडणुकीत मनसेमुळे उबाठाला फटका बसल्याचे आकडेवारीवरून दिसून आले. मुंबई मनपात अस्तित्व कायम ठेवायचे असेल तर एकत्र आल्याशिवाय पर्याय नसल्याची जाणीव दोन्ही पक्षांना झाली असावी. दोन्ही पक्ष एकत्र लढल्यास त्यांना निश्चित फायदा होऊ शकतो, असे सूर राजकीय वर्तुळातून उमटत आहेत.

# अनावश्यक शस्त्र परवाने रद्द केले जातील : पवार



**पुणे, ७ जून**

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील अनावश्यक शस्त्र परवाने रद्द करण्याच्या निर्णयाप्रमाणेच पुणे जिल्ह्यातही अशीच पावले उचलली जातील, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सांगितले.

यापूर्वी, पोलिसांनी बीड जिल्ह्यात जारी केलेल्या सर्व शस्त्र परवान्यांची छाननी करण्यासाठी आणि परवानाधारकाला बंदुकीची कायदेशीर गरज होती का हे तपासण्यासाठी प्रत्येक प्रकरणाची पडताळणी करण्यासाठी अभ्यास केला होता. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे परिणाम म्हणून या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

पुणे आणि बीड दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री असलेले अजित पवार यांनी येथे पत्रकारांना सांगितले की बीड प्रशासनाने जिल्ह्यातील काही परवाने रद्द केले आहेत. पुण्यातही अशीच पावले उचलली जातील आणि त्यासाठीचे आदेश देण्यात आले आहेत.

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींना असे शस्त्र परवाने देण्यात आल्याचे उघड झाल्यानंतर पुणे जिल्ह्यातील शस्त्र परवाने अलीकडेच चर्चेत आले.

राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (यूबीटी) यांच्यातील संभाव्य युतीबद्दल विचारले असता पवार म्हणाले, ‘राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे त्यांच्या संबंधित पक्षांचे प्रमुख आहेत. पक्षांबाबत कोणताही निर्णय घेणे हा त्यांचा अधिकार आहे. तुम्ही आणि मी याबद्दल विचार करून काहीच उपयोग नाही.’’ (वृत्तसंस्था)



# हिंगणघाट येथे कार घेऊन जाणाऱ्या मालगाडीचा डबा घसरला

**वर्धा, ७ जून**

हिंगणघाट रेल्वे स्थानकाजवळून जाणाऱ्या २८ डब्यांच्या मालगाडीचा शेवटचा गार्ड डबा आणि एक व्हॅगन डबा रुळावरून घसरला. मालगाडीचा वेग कमी असल्यामुळे मोठी दुर्घटना टळली, परंतु, रेल्वे रुळांचे नुकसान झाले. ही घटना आज दुपारी घडली.

ही मालगाडी कार घेऊन जात असल्याचे सांगण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, मेलापक्कम (तामिळनाडू) येथून नागपूरच्या दिशेने जात असताना हिंगणघाट रेल्वे स्थानकाजवळ शेवटचा डबा रुळावरून उतरला आणि जवळपास १०० मीटरपर्यंत फरफटत गेला. त्यामुळे रेल्वेचे रुळ तीन ते चार ठिकाणी तुटले. या मालगाडीच्या २८ व्हॅगनमध्ये कारची वाहतूक केली जात होती. डबा रुळावरून घसरल्याने मोठा आवाज झाला. हा अपघात नेमका कशामुळे झाला, हे वृत्त लिहिस्तोवर कळू शकले नव्हते. हा रेल्वे मार्ग दक्षिण आणि उत्तर पश्चिम रेल्वेला जोडणारा असल्याने यावर मालवाहतूक आणि प्रवासी गाड्यांची मोठी वर्दळ असते. या घटनेमुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. रेल्वे रुळांच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे.

# जी-७ शिखर संमेलनाचे भारताला निमंत्रण

## कॅनडाच्या पंतप्रधानांचा नरेंद्र मोदींना फोन

**नवी दिल्ली, ७ जून**

कॅनडात या महिन्याच्या अखेरीस आयोजित केलेल्या जी-७ शिखर संमेलनाचे निमंत्रण देण्यासाठी कॅनडाचे नवनिर्वाचित पंतप्रधान मार्क जे कार्नी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना फोन केला. या फोनवरून मोदींनी निमंत्रणाबाबत कार्नी यांचे आभार मानत त्यांना निवडणुकीतील यशाबाबतही शुभेच्छा दिल्या.

मोदी यांनी एक्सवर पोस्ट करून कार्नी यांच्यासोबत झालेल्या फोनवरील संवादाची माहिती देत ते म्हणाले, कॅनडाचे पंतप्रधान मार्क जे कार्नी यांच्याशी फोनवरून संवाद साधून आनंद झाला. अलिकडेच कॅनडात झालेल्या निवडणुकीत कार्नी यांचा विजय झाल्याबाबत त्यांचे अभिनंदन केले.

त्याशिवाय या महिन्याच्या अखेरीस कनानस्किस येथे होणाऱ्या जी-७ शिखर संमेलनात आमंत्रित करण्यासाठी त्यांचे आभार मानले. परस्पर आदर आणि सामायिक हितसंबंधांवर आधारित नवीन ऊर्जेने एकत्र काम करू असे त्यांनी सांगितले. जी-७ शिखर संमेलनात पंतप्रधान कार्नी यांची भेट होईल. या भेटीसाठी मी उत्सुक आहे. कॅनडात येत्या १५-१७ जून रोजी जी-७ शिखर संमेलन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी कॅनडाला जाणार आहेत. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रासह अनेक राज्यांत रविवारपासून मुसळधार पाऊस



**नवी दिल्ली, ७ जून**

भारतातील काही राज्यांमध्ये येत्या रविवारपासून पुढचे सहा दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ईशान्य भारतात वादळ आणि पाऊस सुरूच राहील. आसाम आणि मेघालयासह ईशान्येकडील राज्यांमध्ये वादळासह मुसळधार पाऊस पडेल. अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. छत्तीसगड, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गोवा, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील काही ठिकाणी वादळ आणि विजांसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान खात्याने म्हटले आहे.

दिल्ली-एनसीआरमध्ये पावसाची शक्यता नाही. येत्या काही दिवसांत दिल्लीत उष्णतेचे प्रमाण वाढेल. हवामान विभागाने ओडिशामध्ये उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे, तर पश्चिम राजस्थानमध्ये शनिवार ते सोमवार या काळात तीव्र उष्णता जाणवेल. या काळात राजस्थानातील अनेक जिल्ह्यांमध्येही उष्णतेची लाट येईल. तेलंगणाची राजधानी हैदराबादसाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील काही दिवसांत हैदराबादमध्ये हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या ताज्या अंदाजानुसार, पुढील आठवड्याच्या सुरुवातीपर्यंत शहरात आकाश ढगाळ राहील, जवळजवळ दररोज रिमझिम किंवा मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. शनिवारी हैदराबादमध्ये जोरदार वारे आणि गडगडाटी वादळासाठी आयएमडीने येलो अलर्ट देखील जारी केला आहे. (वृत्तसंस्था)

### मुंबईत वाऱ्यासह मुसळधार पाऊस

मुंबई आणि त्याच्या आसपासच्या भागात हवामानात बदल झाला आहे. मुंबईत मुसळधार पाऊस झाला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडणार आहे. हवामान खात्याने नैऋत्य मोसमी वारे हे या पावसाचे कारण आहे. हवामानशास्त्रज्ञांचा अंदाज आहे की आठवड्याच्या शेवटपर्यंत परिस्थिती अशीच राहील. हलका ते मध्यम पाऊस आणि गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. जळगाव, नाशिक, पुणे आणि नागपूरसह इतर जिल्ह्यांमध्येही असेच हवामान राहील,असा अंदाज आहे.

# शाळा उत्पन्नाचे साधन नाही

## फीसाठी विद्यार्थ्यांना धमकावल्याने दिल्ली हायकोर्टाने फटकारले

**नवी दिल्ली, ७ जून**

शाळा हे केवळ उत्पन्नाचे साधन नाही. तिचा पहिला उद्देश मुलांना शिक्षित करणे आणि नैतिक मूल्ये विकसित करणे आहे, व्यावसायिक उपक्रम म्हणून काम करणे नाही. जरी शाळा तिच्या सेवांसाठी शुल्क आकारत असली तरी, ती व्यावसायिक संस्थेशी समतुल्य होऊ शकत नाही अशा शब्दात दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पब्लिक स्कूल प्रशासनाला फटकारले.

शाळेची फी न भरल्याबद्दल ३१ विद्यार्थ्यांना निलंबित केल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती सचिन दत्ता यांच्या एकल खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्या. दत्ता म्हणाले, शाळेची फी न भरल्याबद्दल मुलांना धमकावता येणार नाही. अशा कृती मानसिक छळासारख्या आहेत आणि विद्यार्थ्यांचा स्वाभिमान दुखावते. शाळा प्रशासन आणि पालकांनी मुलांचे हित लक्षात घेऊन आपापसात वाद सोडवण्याचे निर्देश यावळी न्यायाधीशांनी दिले. १५ मे २०२५ रोजी १०२ पालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ९ मे २०२५ रोजी शाळेने ३२ मुलांची फी न भरल्याबद्दल शाळेतून निलंबित केले. (वृत्तसंस्था)

### ५ वर्षात ५० हजारांनी वाढले शुल्क

पालकांचा आरोप आहे की, द्वारका येथील दिल्ली पब्लिक स्कूलने गेल्या ५ वर्षात शिक्षण संचालनालयाच्या (डीओई) परवानगीशिवाय १,३९,६३० वरून १,९०,००० पर्यंत शुल्क वाढवले आहे. पालकांनी याचा निषेध केला तेव्हा शाळेने ३२ मुलांना काढून टाकले आणि शाळेच्या प्रवेशद्वारावर बाउन्सर तैनात केले. पालकांनी याला न्यायालय आणि डीओईच्या आदेशांचे उल्लंघन म्हटले. डीओईने विद्यार्थ्यांना भेदभाव न करता शाळेत प्रवेश देण्याचे आदेश दिले.

# ३०० कोटी रुपयांचे मार्जिन मनी अनुदान वितरित



**मुंबई, ७ जून**

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत, भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगाने मंगळवारी आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमाद्वारे देशभरातील ८७९४ लाभार्थींना ३०० कोटी रुपयांचे मार्जिन मनी अनुदान वितरित केले. हे वितरण सुमारे ८८४ कोटी रुपयांच्या कर्ज मंजुरीवर करण्यात आले. हा कार्यक्रम मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात केव्हीआयसीचे अध्यक्ष मनोज कुमार यांनी ऑनलाईन पद्धतीने लाभार्थींना अनुदान दिले. याप्रसंगी, केव्हीआयसीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रूप राशी यांच्यासह केंद्रीय कार्यालयातील इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली, पीएमईजीपी योजनेने आज भारतात स्वयंरोजगाराचा एक मजबूत आणि प्रभावी पाया निर्माण केला आहे. खादी आणि ग्रामोद्योग हे आज केवळ एक उत्पादन नाही तर ते आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाचे सार आहे. या योजनेने लाखो तरुणांना केवळ रोजगारच उपलब्ध करून दिला नाही तर त्यांना उद्योजकतेच्या शक्तीशी जोडले आहे, असे अध्यक्ष मनोज कुमार म्हणाले.

देशातील सर्व सहा विभागांनी या वितरणात भाग घेतला. आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, पुदुचेरी या दक्षिणेकडील राज्यांसाठी २४४५ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली ज्यासाठी ८०.२६ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले. मध्य विभागात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंडमधील २३६६ प्रकल्पांसाठी ९१.१३ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले. पूर्व भारतातील बिहार, झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि अंदमान निकोबार आणि ईशान्य भारतातील आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोरम आणि त्रिपुरा येथील २१६७ प्रकल्पांना एकूण ६२.६८ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले. हरयाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, लडाख, पंजाब, राजस्थान या उत्तर प्रदेशातील १३२० प्रकल्पांसाठी ४१.८० कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले. तर पश्चिम क्षेत्रातील गुजरात, महाराष्ट्र, गोवा येथे ४९६ प्रकल्पांना २४.१२ कोटी रुपयांचे अनुदान मिळाले. वा



# रिलायन्स डिजिटलमध्ये खरेदी करा आणि 30 कोटींपर्यंत बक्षिसे जिंका



**मुंबई, ७ जून**

रिलायन्स डिजिटल हा भारताचा मोठा इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर असून खरेदीचा अनुभवात आधिक सुखद बनवत आहे. त्यांनी खरेदी करा आणि जिंका उपक्रम आणला आहे. यात प्रत्येक खरेदीवर मोठी बक्षिसे जिंकता येणार आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत रिलायन्स डिजिटल स्टोअर्स, माय जिओ स्टोअर्स आणि ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ३0 कोटींपर्यंत बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे: २५ कार्स, ४0 बाईक्स, ४५0 पेक्षा अधिक इलेक्ट्रॉनिक उत्पादने मिळणार आहेत.

तसेच लॅपटॉप आणि वॉशिंग मशीन खरेदीदारांना निश्चित बक्षिसे मिळणार आहेत. यासोबत, १५ जून पर्यंत आयसीआयसीआय बँक कार्ड्स वापरून १५ हजारपर्यंत त्वरित सूट मिळेल. तसेच, लॅपटॉप खरेदी करणाऱ्यांना १ कोटींच्या प्राइज पूलमधून स्कॉलरशिप्स जिंकण्याची संधी मिळणार आहे. रिलायन्स डिजिटलबद्दल माहिती: रिलायन्स डिजिटल हा भारताचा मोठा इलेक्ट्रॉनिक्स रिटेलर असून त्याचे ६00 पेक्षा जास्त शहरांमध्ये ६५0 पेक्षा लार्ज- फॉरमॅट रिलायन्स डिजिटल स्टोअर्स आणि ९९0 पेक्षा जास्त माय जिओ स्टोअर्स आहेत. ज्यामुळे देशातील कानाकोपऱ्यामधील ग्राहकांना अत्याधुनिक टेक्नॉलॉजीचा उपयोग करता येतो. रिलायन्स डिजिटलमध्ये ३00 पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय ब्रँड्स व पाच हजार पेक्षा जास्त उत्पादने उत्तम किंमतीत मिळतात. तसेच, मोठ्या प्रमाणावर मॉडेल्स उपलब्ध असल्यामुळे ग्राहकांना आपल्या जीवनशैलीला साजेशी टेक्नॉलॉजी निवडता येते.



# राज ठाकरे म्हणाले, मातोश्रीवर चाललोय

## कार थांबवून घेतली पत्रकारांची फिरकी

**मुंबई** : गत काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारात ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची एकच चर्चा सुरू आहे. त्यामुळे पत्रकारांचे कान यासंबंधीच्या प्रत्येक घटनाक्रमाकडे टवकारलेले आहेत. त्यातच राज ठाकरे यांनी शनिवारी अचानक शिवतीर्थाहून बाहेर पडत पत्रकारांना आपण मातोश्रीवर जात असल्याचे सांगून एकच खळबळ उडवली. पण त्यानंतर आपण दुसरीकडेच जात असल्याचे सांगून पत्रकारांची फिरकी घेतली. राज ठाकरे कारमधून शिवतीर्थाहून बाहेर पडले. अपेक्षेनुसार एका पत्रकाराने त्यांच्या कारच्या दिशेने धाव घेतली. त्याने राज ठाकरेंना कुठे दौरा? असा प्रश्न केला. त्यावर ठाकरेंनी कारची काच खाली करून चटक मातोश्रीवर निघालोय असे प्रत्युत्तर देत त्याची फिरकी घेतली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक


दिनेश गुणे

# संकल्पातून सिद्धीकडे...

भारत वेगवान विकासाचे नवे मॉडेल आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय आता कोणीही रोखू शकणार नाही. येत्या दशकभरानंतर विकसित देशांच्या रांगेतील अमेरिका आणि चीनच्या बरोबरीने भारताने आपले स्थान निर्माण केलेले असेल. मध्यमवर्गाचा वेगवान विकास आणि नव-मध्यमवर्गाचा उदय गेल्या ११ वर्षांत देशाने अनुभवला. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर येण्याआधी, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची देशातील संख्या तीन कोटी ४० लाख होती. गेल्या १० वर्षांत यामध्ये तब्बल २६.५ टक्क्यांची भर पडली. २०२४ मध्ये ही संख्या ४.३० कोटीपर्यंत पोहोचली. देशातील दीड कोटी युवकांना संशोधनाच्या क्षेत्रात नव्या संधींची दारे खुली झाली, तर स्टार्टअपच्या क्षेत्रात क्रांतीच्या खुणा उमटू लागल्या. दर चार तासांत एक नवी स्टार्टअप योजना अस्तित्वात येणे हा विकासाच्या गतिमान वाटचालीचा पुरेसा पुरावा ठरला आहे. अशा विकासाचा सुकाणू ज्याच्या हाती असतो, त्याला लोकशाहीचा सातत्यपूर्ण कौल मिळत असतो. अशा नेत्याची गुणवत्ता, कार्यक्षमता, धोरणशक्ती, मूल्ये, यावरच नेतृत्वाची क्षमता सिद्ध होत असते. गेल्या काही वर्षांत देशाच्या कुटुंबकेंद्रित राजकारणाने जनतेची दिशाभूल केली आणि नेतृत्वाचा हक्क केवळ घराणेशाहीच्या वारसांनाच असतो, असे वातावरण निर्माण केले गेले. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाचा उदय झाला आणि भ्रम माजविण्याचे हे प्रयत्न पुसले जाऊ लागले. लोकशाहीला घराणेशाहीच्या मुखवट्यात बंद करण्याचा काँग्रेसचा डाव संपून सर्वसामान्यांमधील क्षमतावान व्यक्तीदेखील देशाचे नेतृत्व करू शकते, याची नवी जाणीव देशात रुजत आहे. घराणेशाही हा देशाच्या लोकशाहीपुढील सर्वांत मोठा धोका आहे हे गेल्या सातत्याने सांगणाऱ्या नरेंद्र मोदी नावाच्या नेत्यामुळे आता भारतीय संविधानाला अपेक्षित असलेली सुदृढ लोकशाही स्थापित होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. कोणतीही राजकीय पृष्ठभूमी नसलेल्या एक लाख कर्तृत्ववान युवकांना राजकारणात नवी संधी देण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हा याच प्रक्रियेचा भाग ठरला आहे.

या प्रक्रियेचे पहिले पाऊल ११ वर्षंपूर्वी पडले. २६ मे २०१४ या दिवशी, नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली. तेव्हापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रत्येक कृतीमध्ये देशातील जनतेने या शपथेचे प्रतिबिंब अनुभवले आहे. 'प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वत:' हे मोदी यांच्या पक्षाचे ब्रीदवाक्य आहे. पक्षाच्या संघटनेच्या स्तरावर प्रत्येकाने याचे पालन करावे अशी अपेक्षा असते, पंतप्रधान मोदीही त्याला अपवाद ठरलेले नाहीत. आपण पक्षाचा कार्यकर्ता आहोत याची जाणीव त्यांनी पंतप्रधानपदाच्या प्रतिष्ठेआड येऊ दिली नाही, म्हणून सेवा, सुशासन आणि सामान्य माणूस ही त्रिसूत्री त्यांच्या कर्तव्यनिष्ठेत पाहावयास मिळते. आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या दोन पर्वांतच नव्हे, तर त्याआधीच्या गुजरातच्या सत्ताकाळातही आणि पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या पर्वातही, सामान्य माणूस हा देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू मानून विकासाची जी काही वाट मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने आखली, त्या वाटचालीत देशाला नवा आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेची जाणीव झाली. जगाच्या पाठीवर भारताला मिळणारा सन्मान आणि प्रतिष्ठा ही गेल्या अकरा वर्षांची मोदी सरकारची मोठी कमाई आहे आणि त्याचे मोठे श्रेय नरेंद्र मोदी नावाच्या नेत्यास आहे याबाबत दुमत असू शकणार नाही. विरोधकांत मात्र, नेमक्या याच कारणामुळे अस्वस्थता दिसते. ती लपून राहिलेली नाही. मोदींची प्रतिमा हेच त्यांचे भांडवल आहे आणि तीच उद्ध्वस्त करणे हाच आमचा कार्यक्रम राहील असे वक्तव्य २०१९ च्या निवडणुकांपूर्वी एकदा काँग्रेसचे राहुल गांधी यांनी जाहीरपणे केले होते. पण देशाने काँग्रेसचा हा कार्यक्रम पुरता धुडकावून लावला. त्यानंतरच्या लोकसभा निवडणुकीत मोदी यांच्या प्रतिमेवर उभ्या देशाने आपल्या पसंतीची मोहर उमटविली आणि मोदी यांची प्रतिमा धुळीस मिळवू पाहणाऱ्या काँग्रेसला नामोहरम होण्याची वेळ आली. मोदींच्या प्रतिमेवर चिखलफेक करू पाहणारा प्रत्येक विरोधी नेता स्वतःच्या प्रतिमेची धूळधाण अनुभवताना दिसू लागला. गेल्या ११ वर्षांची देशाची वाटचाल ही देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या वाटचालीतील सर्वाधिक तेजस्वी वाटचाल ठरली आहे. मरगळलेल्या विकासानेही याच काळात खडबडून जागे होऊन जो वेग घेतला, ते पाहता जगाने अचंब्याने तोंडात बोटे घातली आहेत. केवळ भौतिक विकास म्हणजे विकास नाही, तर त्या विकासाने माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला गेला पाहिजे, हा मोदी सरकारचा संकल्प आहे आणि उभ्या देशाने त्यास मान्यता दिल्याने, विकासपर्वाचा साक्षीदार होऊन तो मोदी यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. त्यामुळेच गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारने लोककल्याणाच्या हजारो योजना कार्यान्वित केल्या. काँग्रेस सरकारच्या काळात कागदावर रेंगाळलेल्या योजनांना चालना दिली आणि आता त्या योजनादेखील देशाच्या विकासाच्या वाटचालीत आपला वाटा उचलत आहेत. मोदी सरकारने देशात कार्यान्वित केलेल्या योजनांचा ढोबळ आढावा घेतला तर असे दिसते, की दर चार दिवसांमागे एक नवी किंवा सुधारित योजना देशात अंमलात येत होती आणि त्याचे प्रत्यक्ष लाभ प्रत्येक संबंधित देशवासीयास थेट प्राप्त होऊ लागले होते.

''सम्मान की समानता, कानून की समानता, अधिकार की समानता, मानवीय गरिमा की समानता, अवसर की समानता'' अशा अनेक मुद्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबोडकर आग्रही राहिले. बाबासाहेबांच्या याच विचारांच्या पायावर नव्या भारताची भक्कम इमारत उभी करण्याचा मोदी सरकारचा ध्यास आहे. देशाचा विकास आणि प्रत्येकाच्या प्रगतीचा ध्यास हेच सत्तेचे ध्येय समजून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने देशात एक सुवर्णकाळ सुरू केला. देशाच्या महान परंपरांची प्रगतीशी सांगड घालत देशाला संपूर्ण जगात एक नव्या आदराचे स्थान मिळवून दिले आणि परंपरांशी तडजोड न करतादेखील आधुनिक प्रगतीची कास



धरता येते, हे दाखवून देत एक नवा आदर्शही निर्माण केला. कोणे एके काळी, धर्म, जाती, समाज नजरेसमोर ठेवून योजना आखल्या जात असत. हा प्रकार पुढे एवढा फोफावला, की प्रत्येक योजनेतून कोणत्या धर्माच्या, कोणत्या समाजाच्या हिताचे काय साधले जाणार याचीच चर्चा करण्याची देशाला सवय लागली. सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने ही बाब गंभीरच होती. मात्र, त्याकडे कानाडोळा केला गेला. मोदी सरकार सत्तेवर आले आणि हा दृष्टिकोन बदलला. पुसला गेला. आता जाती-धर्माच्या भिंती पाडून 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' या भावनेतून समाजाच्या प्रत्येक घटकास प्रत्येक योजनेचा सारखाच लाभ मिळेल अशा योजना अस्तित्वात आल्या. त्यामुळेच, युवक असो वा महिला, शेतकरी असो वा कष्टकरी, अनुसूचित जाती जमाती, अल्पसंख्य, ज्येष्ठ नागरिक, अशा प्रत्येक समाजघटकाचे प्रत्येक योजनेशी नाते जडले. जो देशातील प्रत्येक योजनेशी कोणत्या ना कोणत्या रूपाने जोडला गेलेला नाही असा एकही समाजघटक नाही. डिजिटल इंडिया, स्टार्टअप-स्टॅण्डअप इंडिया, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला, जलजीवन मिशन, किसान सम्मान निधी, मुद्रा योजना, स्वनिधी योजना, वन नेशन-वन राशन कार्ड, सुगम्य भारत, नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण, कौशल्य विकास, खेलो इंडिया, मिशन कर्मयोगी, स्वच्छता मिशन, पासपोर्ट सेवा, श्रम सुधार, स्वामित्व, पीएलआय, भारतमाला, अशा असंख्य योजनांच्या मालिकेने देशातील प्रत्येक नागरिकास जोडून घेतले आणि आजवर विकासापासून वंचित राहिलेला समाज किंवा क्षेत्र नव्या भारताचा अभिमानास्पद सहभागी म्हणून स्वत:स गौरवान्वित करू लागले. विकासाच्या या वाटचालीतून कोणीही वंचित राहू नये, कोणताही प्रदेश उपेक्षित राहू नये आणि देशाचा एकही कोपरा यातून वगळला जाऊ नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. ईशान्य भारत, जम्मू-कश्मीर, लडाखसह हिमाचलचे संपूर्ण क्षेत्र, आदिवासीबहुल भाग आता भारताच्या विकासयात्रेचा भक्कम आधार बनले आहेत.


मोदी सरकारच्या कारकीर्दीचे दुसरे पर्व हा देशाच्या अमृतकाळावरचा सुवर्णलेप ठरला आहे. याच काळात उभे जग कोविड महामारीच्या भयाने धास्तावले होते, जगभरातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेस अक्षरशः घरघर लागली होती आणि माणसे जगविण्याच्या संघर्षाने शिखर गाठले होते, तेव्हा मोदी यांच्या नेतृत्वाने देशाला जगण्याची दिशा दाखविली. विक्रमी वेळातील लस संशोधन, लसीकरण आणि जगातील गरजू देशांना कोविडविरोधी लसीचा पुरवठा करून मोदी सरकारने वसुधैव कुटुम्बकम हा देशाचा सांस्कृतिक मंत्र वास्तवात आणला आणि जगाला भारताच्या सहिष्णुतेची एक नवी ओळख घडविली. रशिया-युक्रेन युद्धामुळे जगावर मंदीचा झाकोळ असतानाही भारताच्या अर्थव्यवस्थेवर साधा ओरखडाही उमटला नाही, हे या नेत्याच्या द्रष्ट्या नियोजनाचे फलित आहे. विरोधकांनी कितीही आगपाखड केली, तरी केवळ नैराश्य हेच त्यामागचे कारण आहे, याची खात्री उभ्या देशाला पटली आहे. ग्लास्गो परिषदेतील पर्यावरणविषयक आराखड्याद्वारे पृथ्वीच्या पर्यावरणरक्षणाचा आगळा विचार, संयुक्त राष्ट्र, ब्रिमस्टेक, जी-२० आदी आंतरराष्ट्रीय मंचावर भारताला मिळालेल्या नेतृत्वाच्या संधीमुळे आणि भारताच्या विश्वकल्याणाच्या भूमिकेमुळे जगाच्या नजरा आज भारतावर खिळलेल्या दिसतात. देशातील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावेल, तो आरोग्यसंपन्न, चिंतामुक्त आणि समाधानी राहील असा विकास साधण्याचा पंतप्रधान मोदी यांचा ध्यास आहे. त्यामुळेच कोविड महामारीच्या काळात देशातील ८० कोटी लोकसंख्येवरील अन्नसंकटाचे सावट सहज दूर करण्यासाठी मोदी यांनी आखलेली अन्नसुरक्षा योजना हा देखील जगाच्या कुतूहलाचा विषय ठरला. कोणत्याही घोटाळ्याविना, पात्र लाभार्थीला त्याच्यासाठी असलेल्या प्रत्येक योजनेचे थेट लाभ मिळवून देणारे कुशल प्रशासन हा भारताला स्वातंत्र्योत्तर काळात बहुधा प्रथमच मिळालेला अनुभव असावा. सुशासन, कन्याजन्मास प्रतिष्ठा देणारी योजना, बेघरांच्या डोईवर छप्पर देणारी पंतप्रधान आवास योजना, गृहिणींना धूरमुक्त आणि आरोग्यसंपन्न जगणे सोपे व्हावे यासाठी उज्ज्वला योजना, घरे उजळणारी सौभाग्य योजना, बालकांच्या आरोग्याचा हक्क जपणारी इंद्रधनुष योजना, गोरगरिबांच्या आरोग्याची काळजी वाहणारी जनआरोग्य योजना, वृद्ध गरजूंची काळजी वाहणारी अटल पेन्शन योजना, जनधन योजना अशा अनेक योजनांतून सामान्यांच्या जगण्याला नवी ऊर्जा आणि ऊर्जितावस्था मिळू लागली आहे.

सामान्य माणूस, महिला, युवक, कष्टकरी, शेतकरी, उपेक्षित, अल्पसंख्यक, ज्येष्ठ नागरिक, अशा प्रत्येक समाजघटकाचे मोदी सरकारच्या कोणत्या ना कोणत्या योजनेशी थेट नाते जडले आहे. डिजिटल इंडिया, स्टार्टअप-स्टॅण्डअप इंडिया, आयुष्मान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन, किसान सन्मान योजना, मुद्रा योजना, कौशल्य विकास, स्वनिधी, कर्मयोगी अशा असंख्य योजनांनी देशाच्या विकासाला नवी चालना दिली आहे आणि विकासाच्या या वाटचालीत सहभागी होण्याची संधी प्रत्येकास मिळू लागली आहे. आर्थिक वृद्धी आणि विकास या हातात हात घालून पुढे जाणाऱ्या संकल्पना असतात. गेल्या काही वर्षांत या संकल्पना यशस्वी ठरलेल्या दिसत आहेत. भारत ही जागतिक आर्थिक शक्ती म्हणून ओळखली गेली पाहिजे, यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी देशवासीयास केले होते. त्यासाठी सरकारने नेमकी पावले टाकली आणि प्रत्येक योजनेतून या उद्दिष्टाची वाटचाल संकल्पपूर्तीकडेच राहील याचा आखणीबद्ध कार्यक्रम राबविला गेला. आता जर्मनीच्या अर्थव्यवस्थेस मागे टाकून भारताने जागतिक आर्थिक क्षेत्रातील नेतृत्वाच्या फळीतील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून नेतृत्व करण्यास भारत सिद्ध झाला आहे. येत्या सात वर्षांत, २०३२ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था १० ट्रिलियन डॉलर्सच्या उच्चांकी स्तरावर दाखल झालेली असेल आणि उत्पादनक्षेत्रात भारत जगाचे नेतृत्व करेल, असा दावा जागतिक संस्थांकडूनही केला जात आहे. गेल्या ११ वर्षांच्या वाटचालीत करण्यात आलेल्या मंथनातून प्राप्त झालेले हे विकासामृत असल्याने, मोदी सरकारच्या इतिहासातही, कारकीर्दीच्या तिसऱ्या पर्वाचे पहिले वर्ष हा अमृतकाळ म्हणून नोंदला जाईल, यात शंका नाही. पायाभूत सुविधांचा विकास ही मोदी सरकारची मोठी उपलब्धी म्हणून इतिहासात नोंदली जाणार आहे. स्मार्ट सिटी, अमृत योजना, भारतमाला, सागरमाला, राष्ट्रीय महामार्ग विकास आदी अभिनव योजनांतून शाश्वत विकासाच्या दिशेने सुरू केलेल्या वाटचालीची फळे देशाला अनुभवता येणार आहेत. देशांतर्गत विकास हे ध्येय सोबत घेऊन वाटचाल करताना, विदेश नीतीचा एक नवा आदर्श मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने प्रस्थापित केला आहे. इंटरनॅशनल सोलार अलायन्स, भारत, जपान, अमेरिका त्रिपक्षीय संवाद, उपखंडातील सुरक्षेसंबंधीची रोखठोक भूमिका, आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या विरोधात आंतरराष्ट्रीय मंचावर निर्भयपणे उमटलेला हुंकार, आदी अनेक बाबींचे दृश्य परिणाम आज भारत अनुभवत आहे आणि यामुळे देशाला प्राप्त झालेल्या प्रतिष्ठेमुळे प्रत्येक भारतीयाची मान अभिमानाने उंचावली आहे. देशात अस्थिरता माजविण्याचे आजवरचे सारे पाकिस्तानी प्रयत्न हाणून पाडण्याचा पराक्रम ही मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वातील ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. दहशतवादाच्या विरोधात शून्य सहनशीलता, हे भारताचे धोरण केवळ भाषणांतून किंवा कागदावरच्या भूमिकेतून राबविले जात नाही, तर कृतीतून दाखविले जाते, याची जाणीव जगाला तर झाली असेलच, पण पाकिस्तानला निश्चितच झाली असेल. देशातील माओवादाच्या नावाने सुरू असलेला हिंसाचार संपविण्याचा निर्धार अंमलात येईल, तेव्हा, म्हणजे येत्या मार्चपूर्वी मोदी सरकारच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या पर्वाने नव्या वर्षाच्या वाटेवर पाऊल टाकलेले असेल. अनेक योजना, मोहिमा आणि कार्यक्रमांनी पुढच्या वाटचालीचे रस्ते उजळलेले असतील. सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाची ११ वर्षे हा संकल्पातून सिद्धीकडे नेणारा काळ आहे, या भावनेतून उद्या मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या वर्षपूर्तीचा सोहळा देशभर साजरा केला जाणार आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### वटपौर्णिमा : एक पारंपरिक सण



हिंदू धर्मातील वटपौर्णिमेला खास करून महिला वर्गाद्वारे प्रथम पसंती दिली जाते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासह राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने तो मानला नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू- सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसांवर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराज गफलतीने तथास्तु म्हणाले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वटसावित्री व्रत आचरतात.

**प्रा. प्रशांत पंत**/मूर्तिजापूर

### जीवनमूल्य शिकविणारे व्यंकटेश स्तोत्र

आपण ईश्वरपूजा करतोच; बरोबरीने आपली आवडीची स्तोत्रं, पोथी वगैरेही वाचतो. बहुतेक सर्व पोथ्या, स्तोत्रे यात फलश्रुती थोड्या फार फरकाने सारखीच असते. अशी फलश्रुती वगळून व्यंकटेश स्तोत्राचा विचार केला तर आढळते की, यात फक्त ईश्वराचे रूप वर्णन नाही तर काही जीवनमूल्य शिकविणाऱ्या ओळीही आहेत. काही ज्ञान आहे. व्यंकटेशाचे वर्णन वाचताना आपसूकच ज्ञानात भर पडते.

'कटीवरचे नाभी स्थान, जेथून ब्रह्मा झाला उत्पन्न ।'

ईश्वर आहे. पूजा आहे. पूजा करताना अपराधीपणाची जाणीवदेखील आहे. ती किती? तर-

'माझ्या अपराधांच्या राशी भेदोनी गेल्या गगनाशी ।

समुद्र भरला मसी करोनी परी लिहिले न जाती । अपराध माझे ॥'

असे असले, तरी

'तू माझा अंगीकार केला पाहिजे । जाणता असता अपराधी नर ।

त्वा केला अंगीका । अंगीकारावरी अव्हेर तुज न केला पाहिजे ॥'

ही ओळ स्वतःसाठी जशी आहे, तशी पित्याच्या भूमिकेत असतानाही लागू आहे. मुलींसाठी स्थळ शोधताना काही वेळा केवळ पैसा-इस्टेट याचाच विचार केला जातो. होणाऱ्या जावयाचा स्वभाव, वर्तन याकडे डोळेझाक केली जाते आणि जेव्हा पश्चात्ताप करण्याची वेळ येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. अनुभवी लोक सांगतात, आता अव्हेर करून चालणार नाही. एकदा कन्या दिली की, कुळाचा विचार करून चालणार नाही.

'कन्या घेऊनिया कुळ, मग काय विचारावे ।

पुत्राचे सहस्र अपराध, माता काय मानी तयाचा दोष ॥'

ही ओळ ईश्वराच्या बरोबरच व्यवहारातही लागू पडते. मुलं चुकली तर त्यांना मातेच्या ममतेने समजावून सांगितले पाहिजे.

'द्रौपदीशी वस्त्रे अनंता । आम्हालाही कृपणता तुज कैसी ॥'

तिला तर मध्यरात्री अन्न पुरवून तिची चिंता मिटवलीस. ऋषिश्वरांना तृप्त करून तिची लाज राखलीस... आणि आम्हाला मात्र-

'अन्नासाठी दाहीदिशा । आम्हा फिरविशी जगदिशा ॥'

अशी तक्रार करत करुणा भाकली जाते. नाले-ओढे जेव्हा गंगेला मिळतात तेव्हा तेही गंगाजळ होऊन जातात. काकविष्ठेतून पिंपळ जन्मा येते तरीही ते निंद्य नसते; वंद्यच असते. मग मीही तसाच आहे. मला तुझे जवळ घे. मी अत्यंत आर्ततेने तुझी करुणा भाकतो आहे. माझ्यावर कृपा कर. असे हे व्यंकटेश स्तोत्र माझ्या अल्पबुद्धीनुसार मी यातले मूल्य तुम्हाला सांगितले. ॥ जय जय व्यंकटेश ॥

**मृणालिनी केळकर**/नागपूर

### हुंडाविरोधी समाज काळाची गरज

भारतीय समाजाची हजारो वर्षांची संस्कृती, परंपरा आणि मूल्यव्यवस्था अत्यंत समृद्ध आहे. या सांस्कृतिक वारशाने आपल्याला अनेक सकारात्मक गोष्टी दिल्या असल्या तरी काही रूढी, परंपरा मात्र कालौघात विषासारख्या ठरल्या आहेत. अशाच एका सामाजिक विघातक कुप्रथेचे नाव आहे हुंडा. लग्नासारख्या पवित्र संस्कारात जेव्हा पैशांची, संपत्तीची आणि वस्तूंची देवाणघेवाण अनिवार्य केली जाते, तेव्हा त्या नात्याची शुद्धता आणि प्रतिष्ठा हरवते. म्हणूनच आजच्या समाजात हुंडाविरोधी भूमिका घेणं हे केवळ आदर्श नव्हे तर काळाची अत्यावश्यक गरज बनली आहे.

हुंडा ही प्रथा मूलतः स्त्रीला विवाहानंतरच्या जीवनात स्थैर्य आणि सुरक्षितता मिळावी या हेतूने सुरू झाल्याचे सांगितले जाते. परंतु ही संकल्पना जसजशी आर्थिक व्यवहाराशी जोडली गेली, तसतशी तिचे स्वरूप विकृत होत गेले. आज ही प्रथा इतकी गढूळ झाली आहे की मुलीच्या विवाहाच्या वेळी तिच्या वडिलांना मुलाकडील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कर्जबाजारी होण्याची वेळ येते. घर, कार, दागिने, रोख रक्कम, व्यवसायात गुंतवणूक यासारख्या गोष्टींची मागणी सर्रास केली जाते. अशा प्रकारची जबरदस्ती हे केवळ आर्थिक शोषण नाही, तर स्त्रीच्या अस्तित्वाचंही दमन आहे. या प्रथेमुळे समाजात अनेक भयंकर घटना घडत आहेत. हुंड्याच्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास नववधूला छळणे, मारहाण करणे, आत्महत्येला प्रवृत्त करणे, अगदी जिवे मारणे यासारख्या बातम्या आपल्या दैनंदिन वर्तमानपत्रांत दिसतात. कायदे असूनही या घटनांची संख्या कमी होत नाही, याचे कारण म्हणजे लोकांच्या मनातील मानसिकता अजूनही बदललेली नाही. 'हुंडा न घेतल्यास मुलाचे कदाचित दर्जेदार लग्न होणार नाही' असा एक अंधश्रद्धेचा भाबडा समज समाजात पसरलेला आहे. दुसरीकडे 'हुंडा दिला नाही तर मुलीचा संसार टिकणार नाही' ही भीती मुलीच्या पालकांना सतावत असते. परिणामी, दोन्ही बाजूंनी या प्रथेला मूक संमती मिळत राहते.

वस्तुतः, कोणत्याही नात्यात प्रेम, विश्वास आणि समता या मूल्यांचा पाया असावा लागतो. विवाह ही दोन कुटुंबांची आणि दोन व्यक्तींची भावनिक, मानसिक व सामाजिक सांगड घालणारी संस्था आहे. तेथे पैशाचा व्यवहार आवश्यक आहे का? जर एखाद्या नात्याची सुरुवातच पैशावर, व्यवहारावर आणि अपेक्षांवर झाली, तर त्याचे भवितव्य किती सुरक्षित राहील, हा गंभीर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आज भारतात हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आहे. १९६१ मध्ये पारित झालेला हुंडा प्रतिबंधक कायदा म्हणजे या कुप्रथेवरचा एक मोठा बंधनकारक उपाय होता. पण कायदे हे केवळ कागदांवरच मर्यादित राहिल्यास उपयोग नाही. त्यांची अंमलबजावणी होताना जनजागृती, सामाजिक शिक्षण आणि बदलत्या मानसिकतेचा सहभाग आवश्यक आहे. शिक्षणसंस्था, समाजसेवी संस्था, युवक संघटना यांच्याकडून हुंडाविरोधी जागृतीसाठी मोठ्या प्रमाणात उपक्रम राबवले गेले पाहिजेत. माध्यमांचाही यात महत्त्वाचा वाटा असू शकतो. चित्रपट, मालिका, लघुपट, काव्य, नाटके यांच्या माध्यमातून समाजावर परिणाम करणाऱ्या संदेशांची गरज आहे. विवाहाच्या सोहळ्यांमध्ये मुलाकडील मंडळी जर जाहीरपणे हुंडा न घेण्याची घोषणा करतील, तर समाजात सकारात्मक बदल होईल. आपण ज्या मुलीला मुलगी, बहीण, पत्नी, सून म्हणून प्रेम करतो, तिच्या सन्मानासाठीच हुंडाविरोधात उभे राहायला हवे. विवाह ही देवाणघेवाण नव्हे, तर दोन आत्म्यांचा, दोन विचारधारांचा आणि दोन कुटुंबांच्या मनाचा सुंदर संगम आहे. म्हणूनच, हुंडाविरोधी समाज घडवणं ही काळाची गरज आहे.

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### शिक्षकाला छळछावणी, शिक्षण खात्याचा बडेजाव

शिक्षक हा शब्द उच्चारला की डोळ्यासमोर येतो एक असा माणूस, जो आपल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या कल्पनांमध्ये रंग भरत असतो. ज्याने स्वतःच्या पोटाच्या भुकेपेक्षा इतरांच्या बुद्धीच्या भुकेचा विचार आयुष्यभर केला. जो वाऱ्यावर झुलणाऱ्या झाडाखालीही वर्ग भरू शकतो आणि पावसाळ्यात गळक्या शाळेतही निरागस डोळ्यांना अक्षर ओळख करून देऊ शकतो. पण याच शिक्षकाला आज शिक्षण विभागाच्या बडेजावपणात आणि बेजबाबदार धोरणांमध्ये अक्षरशः छळछावणीत ढकललं जातंय. आणि दुर्दैव म्हणजे, या सगळ्याच्या नावावर 'समानानुभूती'चं झाकपाक केलं जातंय.

दहा-बारा वर्षे नाही, तर तब्बल २४ वर्षे इमानेइतबारे सेवा करणाऱ्या शिक्षकाला आपल्या सेवेला मान्यता मिळावी म्हणून 'वरिष्ठ श्रेणी' किंवा 'निवड श्रेणी' मिळवायची, तर आधी प्रशिक्षण पूर्ण करा, असं फर्मान काढलं जातं. यात काही गैर नाही. पण प्रश्न आहे, हे प्रशिक्षण कसं आणि कुठे? यावर्षी जे केलं गेलं त्याला 'प्रशिक्षण' म्हणणं म्हणजे छळाचं सौंदर्यीकरण होईल. कारण, ज्या जिल्हा-तालुका स्तरावर आधी ही प्रशिक्षणे पार पडायची, ती बंद करून यंदा थेट पुण्यात आयोजित करण्याचा निर्णय घेतला गेला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शिक्षकांनी आठशे-नऊशे किलोमीटरचा प्रवास करून पुण्यात हजर व्हायचं. वर '२००० रुपये प्रशिक्षण शुल्क स्वतःच्या खिशातून द्या, जेवण-निवासाची व्यवस्था स्वतः करा' अशा ऐटीत सूचना झोडल्या गेल्या.

एका बाजूला शिक्षक समाजाचा कणा आहे, म्हणायचं. शिक्षणाचा पाया मजबूत करायचा, देश घडवायचा, अशी फडफडणारी भाषणं द्यायची आणि दुसऱ्या बाजूला त्या शिक्षकाला पायाला जखडून, अपमानित करून, मानसिक छळ करून प्रशिक्षण पूर्ण करायला भाग पाडायचं. शिक्षक कुठल्या कंपनीचा वर्कर आहे? का कापड दुकानातला खरेदीदार? जो पैसे भरून वस्तू उचलून गप्प निघून जाईल? ही सगळी यंत्रणा नेमकी कोणासाठी? शिक्षकांच्या प्रगतीसाठी की त्यांच्या छळासाठी?

प्रशिक्षणाचा प्रकार तर आणखी भयावह. तास तासभर लेक्चर ऐकायचं, प्रत्येक तासिकेनंतर एक लिंक ओपन करून चाचणी द्यायची. पण त्या लिंक उघडणारच नाहीत. यंत्रणा कोलमडलेली शिक्षकांचं डोकं तापलेलं, हात थरथरताहेत आणि मेंदूवर दडपण एवढं की रात्री झोप लागत नाही. 'ही परीक्षा दिली नाही, तर श्रेणीचा निर्णय लांबेल' या विचाराने मानसिक छळ सुरू. या गोष्टीची कल्पना प्रशासनाला नाही? की आहे पण जाणूनबुजून दुर्लक्ष?

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात 'समानानुभूती' या मूल्याला मोलाचं स्थान दिलंय. शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि प्रशासन यांनी एकमेकांच्या मनःस्थितीची, परिस्थितीची जाण ठेवत शिक्षण प्रक्रियेत सामील व्हावं, असं सांगितलं जातं. पण या 'समानानुभूती'चं काय झालं? नुसतं कागदावर? की पुण्याच्या एसी ऑफिसमध्ये बसून ठरवलेल्या धोरणांपुरतं? एकीकडे मंत्रालयाच्या सन्मान सोहळ्यांमध्ये शिक्षकांचा गौरव केला जातो, तिथे मोठ्या मोठ्या वाक्यांत 'शिक्षकच समाजाचा पाया' असं बोललं जातं. आणि दुसरीकडे अशा बेजबाबदार, असंवेदनशील पद्धतीनं त्या शिक्षकाला अक्षरशः रस्त्यावर आणलं जातं.

हे फक्त शिक्षकांचं दु:ख नाही. हे तुमच्या-आमच्या मुलांचं भवितव्य आहे. उद्या हा मानसिक थकवा घेऊन वर्गात उभा राहणारा शिक्षक त्या निरागस मुलांमध्ये किती जिवंतपणा ठेवू शकेल? शिक्षण प्रशासनाच्या या दांभिकपणावर समाजाने आता आरसा दाखवला पाहिजे. एसी ऑफिसमध्ये बसून धोरणं करणाऱ्यांनी शिक्षणाच्या नावावर ढोंग करणं थांबवावं. शेवटी, धोरणं कागदावर बदलणं सोपं असतं, पण माणसाच्या अंतःकरणात जागा करणं कठीण. आणि ते व्यवस्थेनं शिकावं, हेच या व्यथित शिक्षकाच्या वेदनेतून सांगावं वाटतं.

**प्रा. भागवत भांगे**/७२७६४६९८००

### पहिलीपासून सैनिकी शिक्षण, एक स्वागतार्ह घोषणा

आजच्या बदलत्या जगात शिक्षणाच्या संकल्पना, अपेक्षा वेगाने बदलत आहेत. शिक्षण केवळ गुण मिळवण्यासाठी, फक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किंवा नोकरी मिळवण्यासाठी न राहता, ते विद्यार्थ्यांना जबाबदार, शिस्तबद्ध, आणि चारित्र्यवान नागरिक बनवण्यासाठी हवे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नाही तर आजचाच नागरिक आहे, ही भावना दृढ व्हायला हवी. याच पृष्ठभूमीवर महाराष्ट्र शासनाने विशेषतः शालेय शिक्षण विभागाने, इयत्ता पहिलीपासूनच प्राथमिक सैनिकी प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. ही शिक्षण क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाची आणि दूरगामी परिणाम घडवणारी घोषणा असून याची योग्य अंमलबजावणी झाल्यास याचे परिणाम सकारात्मक दिसतील यात दुमत नाही.

शालेय शिक्षणमंत्र्यांनी नाशिकमध्ये एका कार्यक्रमात ही घोषणा केली. राज्यात पहिलीपासूनच विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक दृष्टिकोनातून सक्षम बनवण्यासाठी सैनिकी शिस्तीचे प्रशिक्षण दिले जाईल. या प्रशिक्षणाचा उद्देश केवळ शरीराला घडविण्यापुरता न राहता, विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा, शिस्त, व्यायामाची सवय, एकतेची भावनाआणि राष्ट्राप्रति जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हाच आहे, असे शिक्षण मंत्र्यांनी सांगितले. लहान वयात केलेले संस्कार हे व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम करतात. या प्राथमिक वयात विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजली, तर ती पिढी भविष्यकालीन भारतासाठी अमूल्य ठरू शकते. म्हणूनच पहिलीपासून सैनिकी प्रशिक्षण देणे, हे एक मूल्याधिष्ठित आणि राष्ट्रहिताचे पाऊल आहे. सैनिकी प्रशिक्षण म्हणजे केवळ शिस्त आणि व्यायाम नव्हे, तर कठीण परिस्थितीत शांत राहण्याची सवय, सहकाऱ्यांशी समन्वय साधण्याची कला आणि आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण इमानेइतबारे पार पाडण्याची मानसिकता यातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल. लष्करी शिस्तीत आत्मसंयम, कर्तव्यनिष्ठा आणि संघटित कृती यांचा समावेश असतो. ही मूल्ये आजच्या काळात केवळ सैन्यात नव्हे, तर सर्वच क्षेत्रांत अत्यंत आवश्यक ठरतात. दरवर्षी अभाविपतर्फे सुद्धा संपूर्ण भारतभर व्यापक स्तरावर विद्यार्थिनींसाठी मिशन साहसी नावाने एक प्रशिक्षण राबविण्यात येते. या सैनिकी प्रशिक्षण उपक्रमात राज्यातील अडीच लाख माजी सैनिक सहभागी होणार असून, त्यांच्या प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवातून व देशासाठी बजावलेल्या जबाबदारीच्या अनुभवातून शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. केवळ पुस्तकी अभ्यासातून नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून शिस्त आणि राष्ट्रसेवा शिकवण्याचा हा निर्णय आहे. याशिवाय आधीपासूनच अस्तित्वात असलेले एनसीसी, स्काऊट गाईड्स, क्रीडा शिक्षक यांचाही सक्रिय सहभाग असणार अशी माहिती देण्यात आली आहे. यामुळे शाळांमध्ये एक सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण तयार होईल. जे विद्यार्थ्यांना प्रचंड आत्मविश्वासाठी प्रेरणादायी असणार आहे. एकविसाव्या शतकातील शिक्षण हे केवळ माहिती देणारे नसून, ते विद्यार्थ्यांना मूल्य, शिस्त आणि समाजभान देणारे असले पाहिजे अशी सर्व पालकांची अपेक्षा असते. महाराष्ट्र शासनाने घेतलेला पहिलीपासून सैनिकी प्रशिक्षण देण्याचा निर्णय हा त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. शिक्षण आणि राष्ट्रनिर्माण यांचा सेतू आजचा विद्यार्थी हा उद्याचा कर्मचारी, शास्त्रज्ञ, शेतकरी, सैनिक आणि नेता असेल. त्याला लहानपणीच जर देशाप्रति जाणीव, सामाजिक जबाबदारी आणि मूल्याधिष्ठित आचारधर्म शिकवले गेले, तर तो देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावेल. म्हणूनच हा निर्णय शिक्षण आणि राष्ट्रनिर्माण यांच्यातला एक भक्कम सेतू ठरेल. शिक्षणात आधुनिकता जितकी आवश्यक आहे, तितकीच गरज मूल्यशिक्षणाची देखील आहे. सैनिकी शिक्षणाचा निर्णय योग्य व सर्वसंमतीने लागू झाल्यास ही फक्त शाळेपुरती मर्यादित न राहता, एक व्यापक सामाजिक चळवळ म्हणून उभी राहू शकते. जर शासन, शाळा, पालक आणि समाज या सर्वांनी एकत्रितपणे या निर्णयाची अंमलबजावणी केली, तर हा उपक्रम महाराष्ट्र व देशाला अधिक उज्ज्वल आणि सुरक्षित भविष्य देणारा ठरेल.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

### ज्येष्ठ नागरिकांची नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान सहल



नुकतीच आमच्या त्रिमूर्तीनगर गार्डन, ज्येष्ठ नागरिक मित्र मंडळाची नवेगांवबांध राष्ट्रीय उद्यान सहल झाली. २८ आणि २९ एप्रिल असे दोन दिवस सहलीचे नियोजन होते. एकूण १६ सदस्य होते. सर्वप्रथम रिसॉर्ट बुकिंग, जाण्याकरिता एसी बस, नाश्ता, दुपारचे व रात्रीचे जेवण, खर्चाचा अंदाज घेण्यात आला. या ग्रुपमध्ये सर्व उत्साही ज्येष्ठ आहेत. काहींना घरच्यांचा विरोध होता, पण सकारात्मक विचार असल्याने शक्य झाले. सोमवारी जाण्याचे निश्चित झाले. प्रवास ४ ते ४.३० तासांचा होता. महामार्ग असल्याने साकोली गावापर्यंत लवकर पोहोचलो. पुढे जंगल परिसर असल्याने निसर्ग सौंदर्य, तलाव अभयारण्य होते. त्याचा आनंद घेत नवेगाव रिसॉर्टला केव्हा पोहोचलो समजलेच नाही.

रिसॉर्ट १६ एकर परिसरात आहे. समोर सुंदर मोठा तलाव. या परिसरात पक्षी अभयारण्य आहे. या राष्ट्रीय उद्यानात विविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. ज्यामध्ये कोरड्या मिश्र जंगलापासून ते ओलसर जंगलापर्यंत विविध प्रकारची वनस्पती आढळते. या राष्ट्रीय उद्यानात पक्ष्यांच्या २०९ प्रजाती, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ९ प्रजाती आणि अन्य प्राण्यांच्या २६ प्रजाती आहेत. ज्यामध्ये वाघ, लांडगा, जंगली मांजर यासह इतर प्राण्यांचा समावेश आहे.

रिसॉर्टपासून ३ कि. मी. नवेगाव एक छोटे गाव आहे. तेथे आवश्यक सर्व वस्तू मिळतात. येथून १२ कि. मी. आंतरावर इटीयाडोह सुंदर तलाव आहे. सकाळी फिरताना निसर्ग सौंदर्य, सूर्योदय, नैसर्गिक विशाल तलाव बघून मन भारावून गेले. सर्व ज्येष्ठ नागरिकांनी बोटिंगचा आनंद लुटला. सोबत जंगल सफारी केली. आमच्या सहलीचे सूत्रधार, आमच्या मंडळाचे अध्यक्ष अनिल अपराजित होते. त्याचा या वयात उत्साह तरुणांना लाजवणारा आहे. ग्रुपमध्ये प्रत्येकाचा स्वभाव भिन्न असतो, त्या सर्वांना एकत्र आणणे ही कला आहे. सर्व ज्येष्ठांनी दोन दिवस सहलीचा मनमुराद आनंद लुटला.

**सुधीर वाराणशीवार**/९७६६३४४४३२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### प्रभाग २२मध्ये रस्ता काँक्रिटीकरण; किसन जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

**सोलापूर, दि. ७ जून-**

सोलापूर महानगरपालिका क्रमांक २२ मधील नागरिकांना मूलभूत सुविधांसह सर्व विकासकामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्नशील असल्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी प्रभाग क्रमांक २२ रामवाडी पोगुल मळा येथील रस्ता काँक्रिटीकरण कामाच्या उद्घाटन प्रसंगी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यातून माजी नगरसेवक नागेश गायकवाड आणि किसन जाधव यांच्या विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर अंतर्गत रक्कम १५ लाख ५० हजार १०३ रुपये खर्चित रस्ता काँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी नागेश अनिस जाधव , दशरथ गायकवाड, आकाश जाधव,अनिल सुरवसे, जावेद शेख, श्रीकांत पाटील, तौफिक शेख,रेशव गायकवाड, अब्बास बागवान, आयुष्य प्रथमेश गायकवाड, शकील चौधरी,जावेद चौधरी, पुष्पा जाधव, कोमल जाधव,मंगल रुपनर, रेणुका गायकवाड, सरस्वती बनसोडे, आयुष्या खान,मनीषा गायकवाड, अनिता शिंदे, लक्ष्मी बनसोडे, राबिया शेख, शांताबाई शिंगे आदी उपस्थित होते.

### सुट्टे पैशाच्या कारणावरून एसटी बसच्या महिला वाहकास मारहाण

**अक्कलकोट दि. ७ जून-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथे एसटी बसच्या महिला वाहकास एका प्रवाशी महिलेने सुट्टे पैशाच्या कारणावरून मारहाण केली. ही घटना ३ जून रोजी दुपारी २ वाजता घडली. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळ्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीचा जामीन नाकारल्याने तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे. फिर्यादी अश्वीनी राजेश बडजे (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदर दिवशी अक्कलकोट ते उमरगा बसचे चालक म्हणून गोविंद इंगळे होते. बस (एम एच १४ बी टी ३२६५) सर्व प्रवाशांचे तिकीट काढल्यानंतर प्रवास झाला. महिला आरोपी रुपाली राजेंद रणदिवे (रा. केम ता. करमाळा) ह्या त्या बसमध्ये प्रवास करीत होत्या. दोन महिलाना त्यांचे पैसे आपसात घेणेसाठी पैसे दिले असता आरोपी मी इतरांना पैसे का मागु, मी तुम्हाला पैसे दिले आहेत माझे उरलेले सुझे पैसे मला तुम्हीच परत द्या म्हणून जोरात मोठ्याने बोलु लागली. त्यावेळी समोरील महिला हिने तुमचे हे काय म्हणत माझ्या अंगावर येवुन माझे अंगावरील ड्रेस ओढुन फाडला.पायातील वहाण चप्पल काढुन मारुन जखमी केले. म्हणून तिच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शाळेच्या पहिल्या दिवशी मिळणार गणवेश, बूट, अन् सॉक्स

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून -**

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७७७ शाळा असून त्याअंतर्गत दोन लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी म्हणजे १६ जून रोजी एक गणवेश, बुटाचा एक जोड व सॉक्सच्या दोन जोडी मिळणार आहेत. त्यासाठीचा निधी शासनाकडून वितरित झाला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश दिवाळीपूर्वी मिळणार आहे. त्यामुळे दुसऱ्या गणवेशासाठी काही महिन्यांची वाट पहावी लागणार आहे.

शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून सध्या पहिल्या गणवेशाची शिलाई युद्धपातळीवर सुरू आहे. २० दिवसांपूर्वी शासनाकडून आलेला गणवेश, सॉक्स, बुटासाठीचा निधी तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आला आहे. आता गणवेशाची शिलाई पूर्ण झाल्यानंतर व सॉक्स, बूट खरेदी केल्यानंतर त्याची पावती जोडून गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे द्यायची आहे.

### पहिलीच्या विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभाग २०२५-२६ या वर्षापासून करणार आहे. त्यानुसार पहिलीच्या वर्गासाठी नवीन अभ्यासक्रम असणार आहे. त्या पुस्तकांची बालभारतीकडून छपाई सुरू असून विद्यार्थ्यांना ती नवीन पुस्तके शाळेच्या पहिल्याच दिवशी मिळणार नाहीत. त्यासाठी जूनअखेरपर्यंत वाट पहावी लागणार आहे. इयत्ता दुसरीपासूनच्या पुढील वर्गातील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके मिळतील. विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश शाळेच्या पहिल्या दिवशी मिळणार आहेत.

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी एक गणवेश, दोन सॉक्स जोडी आणि बूट मिळेल. त्यादृष्टीने नियोजन केले असून गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापकांना तसे निर्देश दिले आहेत. शाळा व्यवस्थापन समितिकडून गणवेश खरेदी करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांची रक्कम शाळांकडे पाठविण्यात आला आहे.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**



त्यानंतर त्यांच्याकडून संबंधितांना तो निधी वितरित होईल. शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेश मिळायलाच हवा, असे निर्देश शिक्षणाधिकाऱ्यांनी गटशिक्षणाधिकारी व सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना दिले आहेत.

पहिला गणवेश शाळेच्या पहिल्या दिवशी तर दुसरा गणवेश दिवाळीपूर्वी मिळणार आहे. त्यामुळे पहिला गणवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना आठवडाभर तोच गणवेश घालून शाळेत यावे लागणार आहे.

निधीअभावी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना दुसऱ्या गणवेशासाठी काही महिन्यांची वाट पहावी लागणार आहे.

### मंद्रुप केंद्रातील शाळांना गणवेश निधी वाटप

शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश , बूट व सॉक्स देण्यात येणार असून शासनाकडून गणवेशाची रक्कम पंचायत समितीकडे जमा करण्यात आली आहे. मंद्रुप केंद्रातील १८ शाळांना पहिल्या गणवेशासाठी रक्कम देण्यात येणार आहे. शाळा व्यवस्थापन समितिकडून गणवेश खरेदी पावती दिल्यानंतर गणवेश रक्कम मिळणार आहे. **- कलप्पा हेळवी, केंद्रप्रमुख, मंद्रुप**

### दुसरा गणवेश दिवाळीपूर्वी

विद्यार्थ्यांना दरवर्षी शासनाकडून दोन गणवेश दिले जातात. त्यासाठी शासनाकडून प्रत्येकी ६०० रुपयांचा निधी दिला जातो. एक गणवेश शाळेचा तर दुसरा गणवेश स्काऊट गाइडच्या धर्तीवर मिळणार आहे. तो गणवेश दिवाळीपूर्वी मिळेल, असे नियोजन आहे. सध्या पहिल्या गणवेशाचा निधी शासनाकडून वितरित झाला आहे. हा गणवेश देखील यंदा शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातूनच दिला जाणार आहे.

# प्रतिकूल परिस्थिती ही आव्हान म्हणून स्वीकारा

## कॉ. कामिनी आडम यांचा विद्यार्थ्यांना संदेश; सिटूच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

ज्ञानमंदिरांची निर्मिती झाली, तर हजारो अधिकारी निर्माण होतील.' शिक्षणाची हीच खरी ताकद आहे. अनेक विद्यार्थी प्रतिकूल परिस्थितीतही उज्वल यश संपादन करत आहेत. ही परिस्थिती आव्हान म्हणून स्वीकारल्यास यश तुमचा पाठलाग नक्कीच करेल, असे प्रेरणादायी विचार माजी नगरसेविका कॉ. कामिनी आडम यांनी व्यक्त केले.

दत्तनगर येथील लाल बावटा कार्यालयात, बापूजी नगर मागासवर्गीय सहकारी गृह निर्माण संस्था आणि सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सिटू) यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते, माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर होते.कार्यक्रमात सिटूचे राज्य महासचिव ॲड. एम. एच. शेख यांनी मार्गदर्शन करताना सरकारच्या बदलत्या शैक्षणिक धोरणावर भाष्य केले. दरवर्षी लाखो विद्यार्थी पदव्या घेऊन बाहेर पडतात, परंतु रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने शिक्षण व्यर्थ ठरत आहे. पूर्वी केंद्र सरकारमार्फत विडी कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळत होती, ती योजना आता थांबविण्यात आली आहे. शिक्षणाचे खाजगीकरण व बाजारीकरण थांबवण्यासाठी विद्यार्थ्यांनीच सजग आणि जागरूक व्हावे,'' असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास माकपचे जिल्हा सचिव कॉ. युसूफ शेख, कॉ. श्रीनिवास म्हेत्रे, कॉ. नलिनीताई कलबुर्गी, कॉ. शेवंताताई देशमुख, कॉ. सुनंदाताई बल्ला, प्रा. अब्राहम कुमार, कुरमय्या म्हेत्रे, ॲड. अनिल वासम, कॉ. शकुंतला पाणीभाते, कॉ. लिंगवा सोलापुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ॲड. अनिल वासम



### या विद्यार्थ्यांचा झाला गौरव

कार्यक्रमात लक्ष्मी म्हेत्रे, सानिया शेख, लक्ष्मी नाईक, स्तुती आडम, आराधना मेकेंजी, विद्या कटमे, सुवर्णा म्हेत्रे, रोशनी गड्डम, कुरमेश म्हेत्रे, राजेश्री म्हेत्रे या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ, दप्तर व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.

# मंगळवेढ्यात एकाच रात्री दोन घरफोड्या; २ लाख ८० हजाराचा मुद्देमाल पळविला

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.७ जून-**

मंगळवेढा शहर परिसरात अज्ञात चोरट्यांनी दोन घराची कुलपे तोडून कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा २ लाख ८० हजार रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेल्याचा प्रकार घडला असून याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या घटनेनंतर सोलापूरहून श्वान पथक मागविण्यात आले. मात्र, श्वान पथक हे घराभोवतीच घुटमळल्याचे सांगण्यात आले.

पोलीस सुत्रांनुसार फिर्यादी इकबाल मुलाणी हे फळविक्रेते असून दि.६ रोजी रात्री १०.३० वाजता सर्वजण जेवण करुन घरात झोपले होते. पहाटे ४.३० दरम्यान फिर्यादीचे वडिल हे लघुशंकेसाठी उठले असता त्यांना घराचा व बेडरुमचा दरवाजा व कपाटही उघडे दिसले. फिर्यादीने कपाटाची पाहणी केली असता बहिण यास्मीन हिने फळविक्री व्यवसायातून मिळविलेले ६० हजार रुपये, तसेच सोन्याचे नेक्लेस असा एकूण फिर्यादीचा १ लाखाचा मुद्देमाल चोरुन नेला आहे. त्याचबरोबर पांडुरंग वेताळ नागणे यांच्या बंद घराचे कुलूप चोरट्याने तोडून कपाटात ठेवलेले ५० हजार रुपये रोख व विविध सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ८० हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. अन्य एका व्यक्तीच्या घरातही चोरट्याने चोरीचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले. नागणे यांच्या कुटूंबियातील कुटूंबकर्त्याचे निधन झाल्यामुळे ते घराला कुलूप लावून दुसरीकडे रहावयास होते. या संधीचा चोरट्यांनी फायदा घेतला. या दोन्ही घटनेनंतर शहरवासीय धास्तावले असून पोलीसांची गस्त वाढविण्याची मागणी होत आहे. मार्केट जवळून एका वाहनातून १० लाख रुपयाची बॅग पळविण्याचा प्रकार काही महिन्यापुर्वी घडला होता. याचा तपास अपयशी ठरल्याने चोरट्यांना बळ आले आहे. चोरटे तात्काळ जेरबंद केले असते तर या चोरीच्या घटना घडल्याच नसत्या अशा प्रतिक्रीया व्यक्त होत आहेत. सोलापूरहून श्वान पथक आले मात्र श्वान हे घरामागील बाजूस चोरट्याने घरात प्रवेश केला तिथपर्यंत गेले व पुढे घुटमळले. यामुळे चोरटे नेमके कोणत्या दिशेने गेले याबाबत संभ्रम आहे. फिंगर प्रिंटसवाले यांनी चोरट्यांचे ठसेही घेतल्याचे सांगण्यात आले. चोरट्याने तोडलेले कुलूपही जाताना घेवून गेले आहेत. अन्य एका घराचे कुलूप नागणे यांच्या बंगल्याजवळ आणून टाकले आहे. या दोन्ही चोरींचा तपास लावणे पोलीसांना एक आव्हान आहे.

मुलाणी कुटूंबियाने बकरी ईद झाल्यानंतर हज यात्रेला जाण्यासाठी कपाटात ६० हजार रुपये ठेवले होते. चक्क चोरट्याने त्या पैशावर डल्ला मारल्याने मुलाणी कुटूंबाच्या दर्शनाचे स्वप्न हे अधुरेच राहिले आहे.

# ए आय जादू आहे पण परिणाम गंभीर असणार : अच्युत गोडबोले

## मसाप दक्षिणच्या या कार्यक्रमास अबालवृध्दांची ॲम्फी थिएटरमध्ये तुडुंब गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

वेगाने बदलत असलेल्या युगात कृत्रिम बुध्दीमत्ता अर्थातच ए आय चा वापर सर्वच क्षेत्रात होत आहे. ए आय हे जादू असले तरी त्याचे परिणाम भविष्यात गंभीर असणार आहेत असे प्रतिपादन जगप्रसिध्द लेखक आणि माहिती तंत्रज्ञान अभ्यासक अच्युत गोडबोले यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित ए आय ची जादू आणि उद्याचे जग या विषयावर शनिवार दि. ७ जून रोजी लोकमान्य टिळक सभागृह ॲम्फी थिएटर मध्ये व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, अध्यक्षा रेणुका महागांवकर, प्रशांत बडवे, प्रा.दिपक देशपांडे, अमोल धाबळे, पृथा हलसगीकर, अविनाश महागांवकर आदी मान्यंवर उपस्थित होते.

एआयची भिती आणि कुतुहल मोठ्याप्रमाणात आहे. सन २०१० पासून सुरू झालेल्या एआयचा प्रवास आजच्या काळात प्रचंड वेगाने आणि सर्वच क्षेत्रात होत आहे. मानवाला जे आवश्यक आहे ते सर्व एआय, रोबोट यांच्या माध्यमातून होत आहे. माणूस संगणकाच्या माध्यमातून जी माहिती फिड करेल त्यापेक्षाही अधिक काम एआयच्या माध्यमातून सुरू झाले आहे. हॉटेल, हॉस्पिटल, कृषी, मनोरंजन पासून सर्वच क्षेत्रात एआयचा वापर वाढलेला आहे. त्याचे कुतुहल अधिक असतानाच त्याचे परिणामही गंभीर राहणार आहेत. अवघ्या काही वर्षातच त्याचे परिणाम दिसू लागतील. अनेकांच्या नोकऱ्या यामुळे जाणार आहेत. त्यातच विषमता वाढणार आहे. कार्पोरेट कंट्रोल सुरू होणार असेही गोडबोले यांनी सांगितले. भविष्यात एआय चा वापर तळागाळातील लोकांसाठी झाला पाहिजे विषमता दूर झाली पाहिजे आणि मानवी जीवनाचे कल्याण होण्यासाठी एआयचा वापर झाला तरच खऱ्या अर्थाने प्रगती होणार आहे असेही अच्युत गोडबोले यांनी सांगितले.

प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी प्रास्ताविक करीत कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती दिली. त्यानंतर अमोल धाबळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बारावीच्या सीबीएसई बोर्डात सुयश ज्युनिअर कॉलेज मध्ये तिसऱ्या क्रमांक घेवून उत्तीर्ण झालेल्या आर्यन विनायक होटकर आणि दहावी मध्ये सिध्दनाथ जोशी याने यश संपादन केल्याबद्दल दोघांचा सत्कार अच्युत गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेश कुलकर्णी यांनी केले तर आभार पृथा हलसगीकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मसापचे प्रसिद्धीप्रमुख विनायक होटकर; अभय जोशी, प्रकाश मोकाशे आदींनी परिश्रम घेतले तब्बल दोन तास सुरू असलेल्या या व्याख्यानाला रसिक श्रोत्यांनी मोठ्याप्रमाणात गर्दी केली होती.





सोलापूर : लोकमान्य टिळक सभागृहात शनिवारी महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने जादू आणि उद्याचे जग या विषयावर अच्युत गोडबोले व्याख्यान झाले. (छायाचित्र : केवल तिवारी)

## पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर. जि. सोलापूर
### खरेदी व भांडार विभाग

**फेर वार्षिक ई-निविदा सुचना क्र.१ सन २०२५-२६**

**http://mahatenders.gov.in**

सर्व मक्तेदार पुरवठादार यांना कळविणेत येते की, पंढरपूर नगरपरिषदेच्या खरेदी व भांडार विभागाकडील निरनिराळ्या साईजमध्ये डिजीटल व इतर विविध प्रकारचे फलक तयार करणे, लावणे व काढणे, या कामासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी नमूद कामासाठी फेर ई-निविदा मागविणेत येत आहे. या कामी कोऱ्या निविदेचा नमुना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९/०६/२०२५ ते दि. १६/०६/२०२५ या कालावधीमध्ये उपलब्ध राहील. सदर निविदा शक्य झाल्यास दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता उपस्थित मक्तेदार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचेसमक्ष उघडणेत येईल.

शिक्का

सही/-
(महेश रोकडे)
मुख्याधिकारी
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा राज्यव्यापी मेळावा बालेवाडीत

## सोलापुरातून हजारो कार्यकर्त्यांचा सहभाग : शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २६वा वर्धापन दिन मंगळवार १० जून रोजी पुणे बालेवाडी स्टेडियम येथे मेळाव्याच्या स्वरूपात साजरा होणार आहे. या मेळाव्यास शहर व जिल्ह्यातून असंख्य कार्यकर्ते पुणे येथे रवाना होणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांनी दिली.

राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ तसेच राष्ट्रवादीचे मंत्री मंडळातील मंत्री आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना लाभणार आहे. शहर जिल्हास्तरावर या मेळाव्याची पूर्व तयारी सुरू असून राज्याचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मीटिंग घेऊन सर्व जिल्हाध्यक्षांना नियोजनाची तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत बालेवाडी येथे होणाऱ्या राष्ट्रवादीच्या मेळाव्यास शहरातून सर्व ज्येष्ठ नेते, प्रदेश पदाधिकारी, सर्व फ्रंटल सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष,विधानसभा अध्यक्ष व शहर पदाधिकारी आणि कार्यकारणी यांनी हजारोंच्या संख्येने मेळाव्यास कार्यकर्ते घेऊन जाण्यासाठी तयारीला लागावे असे आवाहन कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी केले आहे. यावेळी सरचिटणीस फारुक मटके,कुमार जंगडेकर जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले जेष्ठ नेते बाबाभाई सालार सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, युवक अध्यक्ष सुहास कदम युवती अध्यक्ष किरण माशाळकर अल्पसंख्यांक अध्यक्ष आमिर शेख शहर उपाध्यक्ष शकील आदींची उपस्थिती होती.



### प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली तयारीची बैठक

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ येथे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील कार्यकर्ता आणि भीमसैनिकांच्या बैठक झाली. श्री. चंदनशिवे यांनी पक्षाच्या २६व्या वर्धापन दिनानिमित्त मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी गणेश पुजारी, भारत बाबरे, सुखदेव इंगळे, गौतम इंगळे, गौतम चंदनशिवे, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमंत जाधव, आदित्य चंदनशिवे, धम्मपाल मैंदर्गीकर, बापू शिंदे, प्रा.अविनाश शिंदे, धीरज वाघमोडे, नितीन बंदपट्टे, अरविंद गायकवाड, सुनील गायकवाड, अण्णा वाघमारे, बाबा गायकवाड, रवी काकडे, मनोज थोरात, राम सर्वगोड, अनिस सय्यद, अमोल बनसोडे, गौतम नागटिळक, गौतम शिंदे, सिद्धांत तळभंडारे आदी उपस्थित होते.

### मध्य रेल्वे
**निर्देशांक**

उप-सीएसटीई प्रकल्प बीएसएल, पहिला मजला, डीआरएम कार्यालय मध्य रेल्वे, भुसावळ-४२५२०१, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, ई-निविदा सूचना क्रमांक **बीएसएल-एसएनटी-प्रोज-०१-पीएसएसए-२०२५** दिनांक ०१/०५/२०२५ साठी शुद्धिपत्रक जारी करण्यात आले आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १७.०६.२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता आहे आणि ती त्याच दिवशी दुपारी ३:१५ वाजता उघडली जाईल. बोली ०३.०६.२०२५ रोजी सुरू झाली. शुद्धीपत्रकाचे तपशील खालीलप्रमाणे आहेत: **शुद्धीपत्र क्रमांक १, शुद्धीपत्र तारीख** २३/०५/२०२५, **मोठे बदल अंतिम तारीख** १०.०६.२०२५ वरून १७.०६.२०२५ पर्यंत वाढवली, **शुद्धीपत्र क्रमांक - २, शुद्धीपत्र तारीख -** ३०/०५/२०२५, मोठे बदल सामान्य स्थिती जोडली, निविदा दस्तऐवज अद्यतनित आणि अपलोड केले, आणि बोलीपूर्व प्रश्न आणि प्रतिसाद अपलोड केले.

SUN 153

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

### मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर यांनी राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत.

| निविदा सूचना क्रमांक | निविदा सूचना क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजे किंमत | सर्वात कमी खर्च काम पूर्ण करण्याचा कालावधी | देखभाल खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १५-२०२५-SrDENC | ट्रॅक मशीन साइडिंग सुविधांचा विकास | रु. २,९९,६३,२९३.८५ | रु. २,९९,८००.०० | १२ महिने | १२ महिने |
| www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. | | | २६.०६.२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत | | |
| www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ | | | २६.०६.२०२५ दुपारी ३:३० वाजेपर्यंत | | |

संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाईटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.Ireps.gov.in.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर**

SUN 77

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – १६

## ग्लायकोजेन आणि धावणे: एक महत्त्वपूर्ण नातं

**ग्लायकोजेन म्हणजे काय?**

ग्लायकोजेन हे शरीरात साठवलेले कार्बोहायड्रेटचे एक सुलभ आणि जलद उपलब्ध होणारे रूप आहे. यकृत (लिव्हर) आणि स्नायूंमध्ये (मसल) जमा होणारा ग्लायकोजेन शारीरिक क्रियांसाठी, विशेषतः धावण्यासारख्या उच्च-ऊर्जेच्या हालचालींसाठी, तात्काळ इंधन म्हणून वापरला जातो.

**धावपटूंसाठी ग्लायकोजेनचं महत्त्व**

मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या धावण्यादरम्यान ग्लायकोजेन मुख्य ऊर्जा स्रोत असतो. लांब धावांमध्ये (विशेषतः ९० मिनिटांहून जास्त) ग्लायकोजेन संपल्यावर धावपटूंना थकवा, पायात जडपणा, गती कमी होणे आणि "हिटिंग द वॉल" सारखी स्थिती अनुभवावी लागते. शिवाय, धावण्यानंतर ग्लायकोजेनचे पुर्नसंचयन आवश्यक असते, जेणेकरून स्नायू दुरुस्त होऊन पुढील सेशन्ससाठी शरीर तयार राहील.

**धावताना ग्लायकोजेन कसं काम करतं?**

सुरुवातीचे ६०९० मिनिटे स्नायूंमधील ग्लायकोजेन ऊर्जा पुरवतो. त्यानंतर त्याचा साठा कमी होऊ लागतो आणि शरीर चरबीचा वापर सुरू करतं ज्यामुळं ऊर्जा निर्माणाचा वेग कमी होतो. दुसरीकडे, यकृतातील ग्लायकोजेन रक्तातील साखर स्थिर ठेवतो, जे मेंदूच्या कार्यासाठी आणि सहनशक्तीसाठी आवश्यक आहे.

**ग्लायकोजेन साठवण्यासाठी उपाय**

**कार्ब लोडिंग:** लांब रेसपूर्वी २३ दिवस अधिक कार्बोहायड्रेटचा आहार घ्या (वजनाच्या किलोमागे ७१० ग्रॅम/दिवस).

**पूर्व धावण्या आधीचं जेवण:** धावण्याच्या २३ तास आधी कार्बयुक्त, हलकं पण पोषक जेवण घ्या.

**धावताना कार्ब घेणं:** ७५ मिनिटांहून अधिक धावणं असल्यास दर तासाला ३०६० ग्रॅम कार्ब्स (जसे की स्पोर्ट्स ड्रिंक, एनर्जी जेल्स) घ्या.

**धावण्यानंतरचं पोषण:** धावण्यानंतर ३०६० मिनिटांत कार्ब:प्रोटीन ३:१ किंवा ४:१ च्या प्रमाणात आहार घ्या (जसे की चॉकलेट दूध, फळे + प्रोटीन शेक).

**ग्लायकोजेन संपल्याची लक्षणं**

अचानक थकवा किंवा पायात जडपणा गती टिकवणं कठीण होणं चक्कर येणे, तीव्र भूक, मानसिक गोंधळ "हिटिंग द वॉल" विशेषतः मॅरेथॉनमध्ये ३२ किमीच्या आसपास

**निष्कर्ष:** धावपटूंसाठी ग्लायकोजेन म्हणजे शरीरातलं बॅकअप इंधन. याची योग्य तयारी, पूर्तता आणि वापर यामुळेच शर्यतीतील कामगिरी आणि पुनर्बलन सुधारू शकतं. (क्रमशः)

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# इंग्लंड लॉयन्सचे चोख प्रत्युत्तर

### टॉम हेन्स, एमिलिओ गे यांची अर्धशतके

◆ **नॉर्दम्पटन, ७ जून**

येथे भारत आणि इंग्लंड लॉयन्स संघादरम्यान सुरु असलेल्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी क्रिकेट सामन्यात भारत अ संघाच्या ३४८ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंड लॉयन्सने चोख प्रत्युत्तर दिले सलामीवीर टॉम हेन्स (५४) व एमिलिओ गे (७१) यांच्या अर्धशतकी खेळाच्या बळावर . इंग्लंड लॉयन्सने अंधुक प्रकाशामुळे खेळ थांबला तोपर्यंत ४६ षटकांत ३ बाद १८१ धावांपर्यंत मजल मारली होती. त्यावेळी जॉर्डन कॉक्स नाबाद ३१ धावांवर, तर कर्णधार जेम्स रिव शून्यावर खेळत होते. भारत अ संघाकडून अंशुल कम्बोज, तुषार देशपांडे व तनुष कोटियानला प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळाले होते.

भारत अ संघाने ७ बाद ३१९ धावांवरुन पुढे आपल्या दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केल्यानंतर २९ धावांची भर घातली. तुषार देशपांडे (११) धावबाद होताच भारताचा पहिला डाव ८९.३ षटकांत ३४८ धावांवर आटोपला. इंग्लंड लॉयन्सकडून ख्रिस वोक्सने ३ बळी, जोश टंग व जॉर्ज हिलने प्रत्येकी २ बळी, तर फरहान अहमद व टॉम हेन्सने प्रत्येकी १ बळी टिपला.



टॉम हेन्स : धावा ५४, चेंडू ८८, चौकार ९

पहिल्या डावात भारत अ संघाकडून केएल राहुलने शतक झळकावून इंग्लंड दौऱ्याची शानदार सुरुवात केली. करुण नायर (४०), ध्रुव जुरेल (५२) व नितीश कुमार रेड्डीनेही (३४) आपल्या बॅटची चमक दाखविली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल (१७) व कर्णधार अभिमन्यू ईश्वरन् (११) लवकरच बाद झाले. मात्र त्यानंतर केएल राहुलवर संघाचा डाव सावरण्याची जबाबदारी उत्तमपणे सांभाळली. २०२१ मध्ये राहुलने काउंटी सिलेक्ट इलेव्हनविरुद्धच्या सराव सामन्यात शतक झळकावून दौऱ्याची सुरुवात केली होती.

प्रत्युत्तर देताना टॉम हेन्स व बेन मॅकिनीने इंग्लंड लॉयन्सच्या डावाची सुरुवात केली. संघाच्या २९ धावा झाल्या असतानाच कम्बोजने आठव्या षटकांत लॉयन्सला पहिला धक्का दिला. कम्बोजने बेन मॅकिनीला (१२) ध्रुव जुरेलकडून झेलबाद केले. मात्र त्यानंतर टॉम हेन्स व एमिलिओ गेने भारतीय गोलंदाजांचा दैर्याने सामना करत आपल्या संघाच्या धावसंख्येला आकार दिला. दरम्यान टॉम हेन्सने आपले अर्धशतकही साजरे केले. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ९४ धावांची भागीदारी केली. खेळपट्टीवर ही जमलेली जोडी तुषार देशपांडेने फोडली. तुषारने हेन्सला जुरेलकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. टॉम हेन्सने ८८ चेंडूंचा सामना करत ८४ धावाची खेळी केली, यात त्याने ९ चौकार हाणले.

पुढे एमिलिओ गे व जॉर्डन कॉक्सनेही भारतीय गोलंदाजांना भंडावून सोडले. या दोघांनी चहापानापर्यंत संघाला ३३ षटकांत २ बाद १४६ धावा रचून दिल्या. याचदरम्यान पावसाच्या हलक्याशा सरीमुळे थोडा वेळ खेळ थांबला होता. पाऊस थांबल्यानंतर पुन्हा खेळाला सुरुवात केली. तनुष कोटियाने पायचित करण्यापूर्वी एमिलिआ गे याने ११७ चेंडूंत ७ चौकारांच्या मदतीने ७१ धावा ठोकल्या. (वृत्तसंस्था)

# याराजी, पूजा, अबूबकरला सुवर्ण

### तैवान ॲथ्लेटिक्स ओपन
### शिरसे, रिले संघांनीही जिंकले सुवर्ण


◆ **तैपेई शहर, ७ जून**

येथे आयोजित तैवान ॲथ्लेटिक्स ओपन २०२५ स्पर्धेत पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंनी सरस कामगिरी बजावून सहा सुवर्णपदके जिंकलीत. पूजाने भारतासाठी पहिले सुवर्ण जिंकून दिल्यानंतर ज्योती याराजी, अबूबकर, शिरसे व पुरुष महिलांच्या रिले संघाने सुवर्णपदावर आपले नाव कोरले.

पूजाने महिलांच्या १५०० मीटर स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून भारतासाठी खाते उघडले. तिने ४:११.६५ वेळ नोंदवून अव्वल स्थान पटकावले. गत महिन्यात, दक्षिण कोरियातील गुमी येथे झालेल्या आशियाई ॲथ्लेटिक्स स्पर्धेत तिने याच स्पर्धेत ४:१०.८३ वेळेसह रौप्यपदक जिंकले. २२ वर्षीय खेळाडूने या स्पर्धेत ८०० मीटर शर्यतीतही कांस्यपदक जिंकले होते.

पुरुषांच्या तिहेरी उडीत अव्वल स्थान मिळवणाऱ्या अब्दुल्ला अबूबकरने तिसऱ्या प्रयत्नात १६.२१ मीटरची उडी मारून भारताला या स्पर्धेत दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले.

भारताने १०० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत आणखी दोन



सुवर्णपदकप्राप्त ज्योती याराजी



रिले शर्यतीतील अव्वल धावपटू

सुवर्णपदके जिंकली. ज्योती याराजीने महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत १२.९९ सेकंदांच्या वेळेसह विजय मिळवला. भारतीय अडथळा शर्यतीत दुसऱ्या स्थानावर राहून अंतिम अडथळा शर्यतीत गेल्यानंतर विजय मिळवण्यासाठी अत्यंत प्रयत्नशील असलेल्या या धावपटूने अंतिम फेरीत प्रवेश केला.

तेजस शिरसेने पुरुषांच्या ११० मीटर धावण्याच्या शर्यतीत १३.५२ सेकंदांच्या हंगामातील सर्वोत्तम वेळेसह सुवर्णपदक जिंकून दुहेरी कामगिरी केली. बहुतेक शर्यतीत तो नियंत्रणात होता आणि काही चुकीच्या अडथळा क्लिअरन्सशिवाय तो स्वतःचा राष्ट्रीय विक्रम (१३.४१ सेकंद) करू शकला असता.

सुधीक्षा व्ही., अभिनया राजराजन, स्नेहा एसएस आणि नित्या गंधे यांचा समावेश असलेल्या महिला ४१०० मीटर रिले संघाने ४४.०७ सेकंदांसह दुसऱ्या स्थानावर असलेल्या व्हिएतनामच्या (विजेतेपदाचा विक्रम) सहजतेने पूर्ण केला. पुरुष संघ - गुरिंदरवीर सिंग, अनिमेश कुजूर, मणिकांत होबलीधर आणि अमलन बोरगोहेन - यांनी ३८.७५ सेकंदांची वेळ नोंदवली. त्यांनी केवळ सुवर्णपदक जिंकले नाही, तर या वर्षीची ही त्यांची दुसरी सर्वोत्तम कामगिरी देखील होती. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियासाठी डब्ल्यूटीसी अंतिम सामना एक आव्हान : नॅथन लियोन

◆ **लंडन, ७ जून**

सर्व प्रकारच्या क्रिकेटमधील आयसीसी चषक जिंकण्याचा अनुभव असूनही ऑस्ट्रेलियासाठी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना करणे हे एक वेगळे आव्हान असेल, कारण ऑस्ट्रेलियाचा संघ ड्यूक बॉलसह परदेशी परिस्थितीत स्पर्धा करेल, असे मत नॅथन लियोनने व्यक्त केले आहे.

ऑस्ट्रेलिया ११ जून रोजी लॉर्ड्सवर होणाऱ्या अंतिम सामन्यात केवळ गतविजेता म्हणून खेळणार नाही, तर त्यांच्या संघात २०१५ एकदिवसीय विश्वचषक, २०२१ टी-२० विश्वचषक व २०२३ एकदिवसीय विश्वचषक जिंकणारे खेळाडू सुद्धा आहेत.



तीन वन-डे विश्वचषक व टी-२० विश्वचषक आणि अर्थातच काही वर्षांपूर्वी जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना जिंकणाऱ्या खेळाडूंचा अनुभव असल्यामुळे त्या उच्च सामन्यांमध्ये तो अनुभव व दबाव, तो आमच्या बाजूने असेल, पण जेव्हा वास्तविकपणे तुम्ही खेळायला याल तेव्हा त्याचा काही अर्थ नाही, असे लियोनने म्हटले आहे.

दक्षिण आफ्रिकेकडे काही जागतिक दर्जाचे फलंदाज व अविश्वसनीय गोलंदाज आहेत, त्यामुळे हे ऑस्ट्रेलियासाठी एक कडवे आव्हान असणार आहे.

इंग्लिश परिस्थितीत गोलंदाजांना चांगला स्विंग मिळतो, तर ऑस्ट्रेलियात वेगवान गोलंदाजांना उसळी मिळते. ऑस्ट्रेलियातील खेळाडू घरच्या परिस्थितीत कुकाबुरा चेंडू वापरतात, जे सीम गमावल्यानंतर फिरकी गोलंदाजांना चांगली पकड देतात.

परदेशी परिस्थितीत व ड्यूक्स चेंडूमुळे हे वेगळे आव्हान असणार आहे. हे दोन सर्वोत्तम गोलंदाजी आक्रमण एकमेकांवर चढणार आहेत, ही आणखी एक रोमांचक गोष्ट आहे, त्यामुळे सर्व फलंदाजांसाठी हे एक चांगले आव्हान असणार आहे," असे तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत ईगल नाशिक टायटन्सची विजयी मालिका

### अक्षय वाईकर सामनावीर; अर्शीन कुलकर्णीची जोरदार फटकेबाजी

**पुणे, ७ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेत चौथ्या दिवशी अक्षय वाईकर (२-१३)याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर ईगल नाशिक टायटन्स संघाने सातारा वॉरियर्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत ईगल नाशिक टायटन्स संघाने नाणेफेक जिंकून सातारा वॉरियर्स संघाला प्रथम फलंदाजीस आमंत्रित केले. सलामवीर पवन शहाने ३२ चेंडूत ४० धावांची आक्रमक खेळी




केली. त्यात १ चौकार व ३ षटकारांचा समावेश होता. सौरभ नवले १२ धावा काढून बाद झाला. त्यानंतर पवन शहा व हर्षल काटे(२१धावा)या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ३३ चेंडूत ५० धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. ९व्या षटकात अक्षय वाईकरने पवन शहाला झेल बाद करून हि जोडी फोडली. त्यानंतर हर्षल काटे जोरदार फटका मारण्याच्या प्रयत्नात अक्षय वाईकरच्या गोलंदाजीवर त्रिफळा बाद करून सातारा संघाच्या धावगतीला ब्रेक लावला. ओम भोसले २५ धावा काढून तंबूत परतला. सातारा वॉरियर्स संघ १५ षटकात ४ बाद ११६ धावा अशा स्थितीत असताना पाऊस सुरु झाला.

**संक्षिप्त धावफलक**

**सातारा वॉरियर्स:** १५षटकात ४ बाद ११६धावा (पवन शहा ४०, हर्षल काटे २५, ओम भोसले २५, सौरभ नवले १२, अक्षय वाईकर २-१३, मनोज इंगळे १-१५) पराभूत वि.**ईगल नाशिक टायटन्स:** ४.३ षटकात २बाद ५४धावा(अर्शिन कुलकर्णी १९, साहिल पारीख नाबाद ९, अथर्व काळे नाबाद ८, विवेक शेलार १-१९); सामनावीर -अक्षय वाईकर.

पावसाच्या विश्रांतीनंतर ईगल नाशिक टायटन्स संघाला विजयासाठी ५ षटकात ५४ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले. हे आव्हान ईगल नाशिक टायटन्सने ४.३ षटकात २ गड्यांच्या बदल्यात ५४धावा करून पूर्ण केले. राजवर्धन हंगरगेकरच्या पहिल्याच षटकात अर्शीन कुलकर्णीने जोरदार फटकेबाजी करत संघाला बिनबाद २२ धावा उभारून दिल्या. यात त्याने तीन उत्तुंग षटकार मारले. पण पुढच्याच षटकात वैभव दारकुंडेने शेवटच्या चेंडूवर अर्शिनला झेल बाद केले. मंदार भंडारी(९)ला विवेक शेलारने झेल बाद करून नाशिकला दुसरा धक्का दिला. ओम भोसलेने त्याचा सुंदर झेल टिपला. त्यानंतर साहिल पारीख नाबाद ९, अथर्व काळे नाबाद ८ यांनी धावा काढून संघाचा विजय सुकर केला.

# भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ युरोपमध्ये सामने खेळणार

◆ **नवी दिल्ली, ७ जून**

भारतीय कनिष्ठ महिला हॉकी संघ यावर्षी चिलीतील सॅण्टियागो येथे होणाऱ्या एफआयएच कनिष्ठ महिला विश्वचषकाच्या तयारीचा एक भाग म्हणून ८ ते १७ जून दरम्यान बेल्जियम, ऑस्ट्रेलिया आणि नेदरलॅण्डविरुद्ध पाच परदेशी सामने खेळणार आहे.

भारतीय संघाने अलीकडेच अर्जेंटिनातील रोसारियो येथे झालेल्या चार राष्ट्रांच्या हॉकी स्पर्धेत आशादायक कामगिरी केली. या स्पर्धेनंतर भारतीय कनिष्ठ महिला संघ थेट बेल्जियमला रवाना झाला.

भारताचा दौरा ॲण्टवर्पमधील हॉकी सेंटर ऑफ एक्सलन्स, विलिजक्से प्लेन येथे बेल्जियमविरुद्ध तीन सामन्यांनी सुरू होईल. त्यानंतर भारतीय संघ कोंटिचमधील बिअरशॉट टेनिस हॉकी पॅडेल क्लब येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना खेळेल व त्यानंतर उट्रेचमधील हॉकी क्लब कॅम्पोंग येथे नेदरलॅण्ड विरुद्धच्या सामन्याने दौरा संपवेल.

अर्जेंटिनामध्ये, भारतीय संघाने दर्जेदार प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध दमदार कामगिरी केली. भारताने चिलीविरुद्ध २-१ असा विजय आणि २-२ (२-३ ) असा पराभव नोंदवला, यजमान अर्जेंटिनाविरुद्ध १-१ (२-० ) असा विजय आणि २-४ असा पराभव केला आणि उरुग्वेचा ३-२ आणि २-२ (३-१ )असे दोनदा पराभव केला. (वृत्तसंस्था)

# सिनरकडून जोकोविचला पराभवाचा धक्का

### फ्रेंच ओपन टेनिस
### अंतिम गाठ कार्लोस अल्काराझशी

◆ **पॅरिस, ७ जून**

जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा खेळाडू जॅनिक सिनरने पिढ्यांच्या संघर्षात विक्रमाचा पाठलाग करणाऱ्या नोवाक जोकोविचला ६-४, ७-५, ७-६(३) असा पराभवाचा धक्का दिला आणि फ्रेंच ओपन टेनिसच्या अंतिम फेरीत धडक मारली. आता विजेतेपदासाठी सिनरचा निर्णायक सामना गतविजेत्या स्पेनच्या कार्लोस अल्काराझशी होणार आहे.

या पराभवाबरोबरच पुन्हा एकदा ३८ वर्षीय जोकोविचचे विक्रमी २५ वे ग्रॅण्ड स्लॅम जिंकण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले. कोर्ट फिलिप चॅटियरवर उपांत्य सामन्यात खेळताना सिनरने जोकोविचला चांगलेच झुंजविले. सिनरने आपल्या फोरहॅण्डचा वापर करून सर्बियाच्या खेळाडूला डावीकडे, उजवीकडे व मध्यभागी चेंडूचा पाठलाग करण्यास भाग पाडले. पण माजी प्रथम विश्वमानांकित जोकोविचने तिसऱ्या सेटमध्ये तीन सेट पॉइंट गमावूनही जोरदार मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला व त्याचे प्रयत्न व्यर्थ ठरले.

तत्पूर्वी, गतविजेता कार्लोस अल्काराझने फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत प्रवेश करताना इटलीचा आठवा मानांकित लॉरेन्झो मुसेट्टीला मागे टाकले. मुसेट्टी ४-६, ७-६(३), ६-०, २-० असा पिछाडीवर असताना त्याने दुखापतीमुळे सामन्यातून निवृत्त पत्करली.

राफेल नदाल व गुस्तावो कुएर्टेन यांच्यानंतर या शतकात रोलॅण्ड गॅरोसचे विजेतेपद राखणारा अल्काराझ हा तिसरा खेळाडू होण्याचा प्रयत्न करत आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापूर स्मॅशर्सचा पहिला विजय

### महाराष्ट्र महिला प्रीमियर लीग क्रिकेट : शरयू कुलकर्णी सामनावीर

**पुणे, दि. ७ जून -**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) २०२५ स्पर्धेत तिसऱ्या दिवशी चौथ्या लढतीत आरती केदार(३-१०), मुक्ता मगरे(२-१७), शरयू कुलकर्णी(२-३३) यांनी केलेल्या सुरेख गोलंदाजीसह तेजल हसबनीस(नाबाद ४३धावा), ईश्वरी अवसरे(३७धावा) यांनी केलेल्या खेळीच्या जोरावर सोलापूर स्मॅशर्स संघाने रत्नागिरी जेट्स संघाचा ८ गडी राखून पराभव करत पहिला विजय नोंदवला.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत सोलापूर स्मॅशर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराने घेतलेला निर्णय सोलापूरच्या गोलंदाजांनी अचूक ठरवला. सलामवीर स्म्रिती मंधाना(१)ला यष्टीच्या मागे शरयू कुलकर्णीने झेल बाद केले व रत्नागिरी संघाला पहिला धक्का दिला. काल अर्धशतकी खेळी करणारी गौतमी नाईक २० धावांवर तंबूत परतली. शरयू कुलकर्णीने तिला झेल बाद केले. शिवाली शिंदे(२५धावा), अनुश्री स्वामी(२०धावा), ज्ञानदा कदम



**संक्षिप्त धावफलक**

रत्नागिरी जेट्स: १९.३ षटकात सर्वबाद १२०धावा(शिवाली शिंदे २५(१८,२४,१६), अनुश्री स्वामी २०(२३,१४), गौतमी नाईक २०, ज्ञानदा कदम १५, आरती केदार ३-१०, मुक्ता मगरे २-१७, शरयू कुलकर्णी २-३३) पराभुत वि.सोलापूर स्मॅशर्स: १६ षटकात २ बाद १२३ धावा(तेजल हसबनीस नाबाद ४३(२३,६४,१६), ईश्वरी अवसरे ३७(३३,५४,१६), मुक्ता मगरे नाबाद १६, नंदिनी सोनावणे १-२१); सामनावीर - शरयू कुलकर्णी.

(१५धावा) प्रियांका घोडके(१७धावा) यांना फारशी मोठी खेळी करता आली नाही. सोलापूर स्मॅशर्सकडून आरती केदारने १० धावात ३ गडी, मुक्ता मगरे(२-१७), शरयू



कुलकर्णी(२-३३) यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून रत्नागिरी जेट्स संघाला १२० धावांवर रोखले.

हे आव्हान सोलापूर स्मॅशर्स संघाने १६ षटकात २बाद १२३ धावा काढून पूर्ण केले. ईश्वरी अवसरे व ईश्वरी सावकार या सलामी जोडीने ५४चेंडूत ५६ धावांची सलामी दिली.

ईश्वरी सावकार १६ धावांवर असताना धावबाद झाली. त्यानंतर ईश्वरी अवसरेने ३३ चेंडूत ३७ धावा केल्या. त्यात तिने ५चौकार व १ षटकार मारला. त्यानंतर तेजल हसबनीसने २३ चेंडूत नाबाद ४३ धावांची खेळी सुरेख खेळी केली.

तिने आपल्या खेळीत ६ चौकार व १ षटकार मारला. तेजलने मुक्ता मगरे(नाबाद १६धावा)च्या समवेत ३५ चेंडूत ५७ धावांची भागीदारी करून संघाचा विजय सुकर केला.

# बार्शीची हाय परफॉर्मन्स क्रिकेट अकादमी उपांत्य फेरीत

### बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट : हर्ष जगताप सामनावीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ जून-**

बार्शीच्या हाय परफॉर्मन्स क्रिकेट अकादमीने बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

मास्टर्स अकादमीने आयोजित केलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू आहे. शनिवारी झालेल्या साम न्यात बार्शीने युनायटेड क्रिकेट क्लबवर २ गडी राखून मात केली. हर्ष जगताप सामन्याचा मानकरी ठरला. त्यास विनोद दिडी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक नारायण बनसोडे, विकी पवार, राजेश येमुल, दत्ता बडगू व राजवर्धन जिल्हा उपस्थित होते.



**संक्षिप्त धावफलक**

**युनायटेड क्रिकेट क्लब :** २३.३ षटकात सर्व बाद १२६ (हर्षदीप साठे ५७, दर्शन काळे ३-१४, हर्ष जगताप २-१४) पराभूत विरुद्ध **हाय परफॉर्मन्स, बार्शी :** २७.४ षटकात ८ बाद १३० (तन्मय वाघमोडे ४४, आदित्य चटके नाबाद १८, नयनिश गारमपल्ली २-१५)

**असे होणार आजचे उपांत्य सामने**

-मास्टर्स क्रिकेट अकॅडमी विरुद्ध विहान क्रिकेट अकॅडमी
-नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमी पंढरपूर विरुद्ध हाय परफॉर्मन्स क्रिकेट अकादमी बार्शी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पंढरपुरातील वाढती अतिक्रमणे अन् बेशीस्त वाहतूक

## पालिका तसेच पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भाविकांबरोबरच शहरवासीय त्रस्त





**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. ७ जून -**

पंढरपूर शहरातील वाढती अतिक्रमणे, शहरातील बेशीस्त वाहतूक, पार्किंग सोडून शहरातील प्रमुख मार्गांवर भाविकांकडून सर्रास लावलेल्या चारचाकी गाड्या यामुळे तिर्थक्षेत्र पंढरीची अक्षरशः बजबजपुरी झाली आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्थेचा अक्षरशः फज्जा उडाला आहे. शनिवारी एकादशी दिवशी तर मंदिर परिसरात फेरीवाल्यांच्या प्रचंड अतिक्रमणामुळे मंदिर परिसरातील अतिक्रमण न केलेल्या कायमस्वरुपी व्यापारी वर्गाचे तसेच भाविकांचे कमालीचे हाल होताना दिसत होते. त्यामुळे पालिकेचे अधिकारी, कर्मचारी नेमके कोणते काम करतात या बाबत सांशकता निर्माण होते आहे. या बरोबरच शहरातील प्रमुख रस्त्यांवर अक्षरशः भाविकांच्या गाड्या पार्किंग केल्यामुळे जणू गाड्यांचा महापूर आला की काय असे चित्र दिसत होते. वाहतूकीची वारंवार कोंडी होत असल्यामुळे वाहतूक पोलिस खरोखर वाहतूकीचे नियोजन करतात का ? असा देखील सवाल शहरवासियांकडून उपस्थित केला जात आहे.

पंढरपूर शहरात वाहतूक पोलिस आहेत की नाहीत अशी परिस्थिती निमाण झाल्याचे गेल्या काही महिन्यांपासून दिसत आहे. शहरातील सर्वच रस्त्यांवर प्रचंड अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत. शहरातील वाढत्या अतिक्रमणाकडे लक्ष वेधत शुक्रवारी (ता.६) पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी देखील प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत. मात्र शनिवारी (ता.७) एकादशीच्या दिवशी पालकमंत्र्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्या ऐवजी चक्क त्याला अक्षरशः पोलिस, पालिका तसेच अन्य शासकीय यंत्रणांकडून हरताळ फासल्याचे दिसत होते. मंदिर परिसरात पालिकेची अतिक्रमणे काढण्यासाठी गाडी आली की रस्त्यांवरील फेरीवाले हे मंदिर परिसरातील छोट्या बोळांचा (गल्यांचा) आसरा घेताना दिसत होते. पालिकेची गाडी गेली पुन्हा मंदिर परिसरातील मुख्य रस्त्यांवर जैसे थी परिस्थिती होत होती. दरम्यान तुळजापूर, अक्कलकोट आदी तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जी पार्किंगची ठिकाणे आहेत त्या ठिकाणीच भाविकांना आपल्या चारचाकी गाड्यांचे पार्किंग करावे लागते. मात्र पंढरपूरात नेमकी परिस्थिती उलटी दिसत आहे. कारण शहरातील तांबडा मारुती, गजानन महाराज मंदिर, भक्तीमार्ग, स्टेशन रस्ता, प्रदक्षिणा मार्ग, जूना दगडीपूल, अंबाबाई पटांगणा समोरील रस्ता आदी ठिकाणी भाविकांच्या गाड्या पार्किंग एवजी सर्रास रस्त्यांवर लावल्याचे दिसून येतात. त्या मुळे शनिवारी एकादशी दिवशी या भागात अक्षरशः गाड्यांचा महापूर आला की काय असे चित्र दिसत होते.

### चौफाळ्यातील पार्किंग हटविले पाहिजे

शहरातील मध्यवर्ती भाग असलेल्या चौफाळ्यातील गोपाळकृष्ण मंदिर परिसरात गेल्या दोन, तीन वर्षापासून एका इमारतीच्या खालच्या भागात खासगी पार्किंग सुरु करण्यात आलेले आहे. शहरातील चौफाळा हा भाग वाहतूकीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा मानला जात आहे. या भागात जर वाहतूकीची कोंडी निर्माण झाली तर त्याचे पडसाद अगदी विठ्ठल मंदिरापर्यंत उमटलेले दिसतात. कारण चौफाळ्यापासून विठ्ठल मंदिर हे हाकेच्या अंतरावर आहे. एकादशी दिवशी किंवा अन्य दिवशी नगरप्रदक्षिणा करणारे भाविक देखील चौफाळ्यातील गोपाळकृष्ण मंदिराच्या बाजूस उभे राहून विठ्ठल मंदिराच्या कळसाचे दर्शन घेत असतात. त्यामुळे या भागात सतत गर्दी असते. त्यामध्येच या भागातील खासगी पार्किंगमुळे वाहतूकीची वारंवार कोंडी होताना दिसते. त्यामुळे पालिका, पोलिस आणि पोलिसांच्या वाहतूक शाखेने चौफाळ्यातील खासगी पार्किंग बंद करावे, अशी मागणी परिसतील नागरिकांतून सातत्याने केली जात आहे.

### कॉरिडोरचे भूत मानगुटीवर

मंदिर परिसरातील बऱ्याच व्यापाऱ्यांनी देखील आपल्या दूकानांचे अतिक्रमण हटविल्यास रस्त्यांची नेमकी रुंदी प्रशासनाला दिसून येईल. रस्ते प्रशस्त झाल्यावर मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी दिसणार नाही. वाहतूकीची कोंडी होणार नाही. मात्र व्यापारी देखील याकडे कानाडोळा करतात. मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांच्या याच आडमुठ्या भूमिकेमुळे प्रशासनाला कॉरिडोरचा निर्णय घेण्यास भाग पडले आहे आणि आता कॉरिडोरचे भूत मानगुटीवर बसल्यानंतर त्याला विरोधाची भूमिका व्यापारी वर्गांकडून घेतली जात आहे असे उच्चपदस्थ शासकीय अधिकारी खासगीत बोलताना ऐकावयास मिळते आहे.

## महत्वाचे...



### टेंभूर्णीत संभाजी ब्रिगेडतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**टेंभूर्णी, दि. ७ जून-**

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त संभाजी ब्रिगेड व समस्त समाज बांधवांच्या वतीने शिवस्मारक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास व छत्रपती संभाजी यांच्या पुतळ्यास संजय देशमुख व प्रताप देशमुख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा जयजयकार करून घोषणा देण्यात आल्या. करमाळा येथील अतुल वारे यांनी मराठा बिझनेस फाउंडेशन' च्या माध्यमातून व्यापाराची आदान-प्रदान करण्यासाठी व समन्वयातून व्यापार वृद्धी व्हावी यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. तसेच मराठा बिझनेस पत्रकाचे उपस्थितांना वितरण केले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, दत्ता ढवळे सरपंच, दिलीप केचे, गोरख देशमुख, भाऊ महाडिक, पपेश पाटील, हनुमंत चव्हाण, कल्याण पाटील, प्रशांत देशमुख, राजू पाटील, योगेश मुळे, नितीन मुळे, जॉकी पवार, मृणाल देशमुख, संभाजी वाघे, भाऊ देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



### शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अक्कलकोटमध्ये व्याख्यानमालेचे उद्घाटन

**अक्कलकोट, दि. ७ जून-**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यानमालेचे उद्घाटन ऑनलाईन व्हिडिओ पद्धतीने मुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे आयएमसी चेअरमन राजशेखर हिप्परगी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. संविधान प्रचारक सागर सोनकांबळे, प्रभारी प्राचार्य दिलीप कुमार गायकवाड यांची प्रमुख उपस्थित होते.यावेळी कौशल्य गीत सादर करण्यात आले. यावेळी आयएमसी सदस्य कमलाकर सोनकांबळे, विजय इंगळे, अमरनाथ पोतदार, शिवशंकर स्वामी, शरणय्या मसुती, व्याख्यानमालेमध्ये प्रमुख वक्ते संतोष वगाले यांनी स्वदेशी विचारांचा प्रसार या विषयावर मार्गदर्शन केले व प्रमुख वक्ते सागर सोनकांबळे यांनी पर्यावरण संरक्षण या विषयावर मार्गदर्शन केले. संस्थेमध्ये विशेष कार्य केल्याबद्दल निलेश घोडके, विजय बोगाळे, स्वामी, गेजले व भांडारपाल सोनद यांचा सत्कार करण्यात आले शेवटी राज्य गीताने सदर व्याख्यानमालेची सांगता झाली. सूत्रसंचालन एम. जी. नदाफ यांनी केले तर आभार प्रदर्शन, दिनेश मंठाळे यांनी केले.

### 'सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह' या थीमखाली एन्व्हायर्नमेंट मंथची सुरुवात

**सोलापूर, दि. ७ जून-**

टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज एन्व्हायर्नमेंट मंथ २०२५ अर्थात पर्यावरण महिना ची सुरुवात केली असून,सस्टेनेबल रिसोर्स मॅनेजमेंट ड्राईव्ह या थीमच्या माध्यमातून टिकाऊपणा (सस्टेनेबिलिटी) या दिशेने आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे. हा उपक्रम टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० आणि ग्लोबल थीम इन्हानसिंग अवेयरनेस टूवर्ड्स रियलायजिंग टोयोटा ग्लोबल व्हिजन २०५० सोबत सुसंगत आहे. या मोहिमेचा उद्देश कंपनी आणि तिच्या मूल्यसाखळीत (व्हॅल्यू चेन) शाश्वततेची संस्कृती(सस्टेनेबिलिटी कल्चर) अधिक बळकट करणे आहे.याप्रसंगी टीकेएमचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट व डायरेक्टर-मॅन्युफॅक्चरिंग,बी.पद्मनाभा म्हणाले,टीकेएममध्ये पर्यावरण संवर्धन ही केवळ कॉर्पोरेट धोरणाचा भाग नसून,ती आमच्या कामकाजात खोलवर रुजलेली मूल्य आहे.पर्यावरण महिना हा केवळ कॅलेंडरवर येणारा कार्यक्रम नसून,आपल्या मूल्यसाखळीतील प्रत्येक व्यक्तीला हरित भविष्यासाठी कृती करण्यास प्रवृत्त करणारे आवाहन आहे.

## बार्शीत नगरपरिषदेच्यावतीने पाच हजार कापडी पिशव्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जून-**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिकमुक्त बार्शी अभियानाअंतर्गत नगरपरिषदेच्यावतीने गुरुवार दि. ५ रोजी पांडे चौक येथे सर्वसामान्य नागरिकांना ५ हजार कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. तसेच उपळाई रस्त्यावरील ईदगाह मैदानाजवळ नगरपरिषदेच्यावतीने सुमारे २५० झाडे लावण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, नगर अभियंता विवेक देशमुख, आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद यांच्यासह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बार्शी शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी देखील प्लास्टिकचा वापर न करता यापुढे पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन यावेळी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण व आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद यांनी केले. प्लास्टिक वापर कमी केल्यास निसर्ग देखील साथ देईल, असे मत चव्हाण यांनी व्यक्त केले.



## बाळीवेस येथून वेल्डींग मशीन चोरीस

**सोलापूर, दि.७ जून-**

बाळीवेस येथून चोरट्याने १२ हजार ५०० रुपये किंमतीची वेल्डींग मशीन चोरून नेली. याबाबत वसीम अकबर नाईकवाडी (वय ३८, रा. मौलाली चौक, उत्तर सदर बझार, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसीम नाईकवाडी हे बाळीवेस येथील एचडीएफसी बँकेच्या वॉल कंम्पौडच्या आतील गेटच्या बाजूला उघड्या जागेवरती वेल्डींगचे काम करीत होते. ५ जून रोजी दुपारच्या सुमारास नाईकवाडी यांची वेल्डींग मशिन व इतर साहित्य असा १२ हजार ५०० रुपयांचे साहित्य चोरट्याने चोरून नेले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

## दिशा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू

### डॉ.सचिन गवळी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.७ जून-**

सांगोला शहरातील कडलास नाका येथील दिशा हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू झाली असून याचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन डॉ.सचिन गवळी यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाची ही एक आरोग्य योजना आहे जी राज्यातील सर्व कुटुंबांना परवडणाऱ्या आरोग्य सेवा पुरवते. या योजनेत प्रति कुटुंब प्रति वर्षी ५ लाख आरोग्य संरक्षण मिळते. ही योजना सर्वसमावेशक असून विविध प्रकारच्या आजारांवर उपचार, शस्त्रक्रिया आणि आवश्यक वैद्यकीय सेवा यांमध्ये मदत करते.



यावेळी डॉ.सचिन गवळी यांनी अधिक माहिती देताना सांगितले, सांगोला येथील दिशा हॉस्पिटलमध्ये पूर्वीपासूनच मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजना सुरू असून सर्व प्रकारच्या फॅक्चर, क्सिडेंट आणि ट्रॉमा केअर, आर्थोस्कोपी (खांदा, गुडघा निसटणे उपचार) प्लास्टिक सर्जरी, कृत्रिम सांधारोपण शस्त्रक्रिया, स्पइन सर्जरी, जबड्याची शस्त्रक्रिया, मणक्याचे सर्व आजाराचे निदान व उपचार केले जातात.

## वटवृक्ष छायेखाली स्वामींचे आशीर्वाद : उपमुख्यमंत्री शिंदे

### श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जून-**

येथील श्री वटवृक्ष मंदिरातील वटवृक्षाच्या छायेतील स्वामी समर्थांचा अनुभव व आशिर्वाद माझ्यासह राज्यातील जनतेला लाभत राहो. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे या ब्रीद वाक्याची प्रचितीसह वटवृक्षाच्या छायेतील स्वामींचे आशीर्वाद पाठीशी असल्याचे जाणवले असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात त्यांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी विधान परिषदेचे उपसभापती नीलमताई गोऱ्हे, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचाही सन्मान केला. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, मंगेश चिवटे, अमोल बापू शिंदे, मा.आमदार ज्ञानराज चौगुले, रमेश बारस्कर, जिल्हा संपर्क प्रमुख महेश साठे, मनीष काळजे, शंकर म्हेत्रे, तालुका प्रमुख संजय देशमुख, रामचंद्र समाणे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, व्यंकटेश पुजारी, सागर गोंडाळ, नागनाथ गुंजले, संतोष जमगे, दर्शन घाटगे, आदीत्य गवंडी, प्रसाद सोनार, भिमा मिनगले, अविनाश क्षीरसागर उपस्थित होते.



## निधन वृत्त...

### संजय भंडारी



**सोलापूर, दि. ७ जून-**

संजय मनोहर भंडारी (वय ५८) यांचे दि. ७ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवारी (दि.८) सकाळी १० वाजता अक्कलकोट रस्त्यावरील श्रद्धा एम्पायर येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### नवनाथ वसव



**अकलूज, दि. ७ जून-**

नवनाथ ज्ञानेश्वर वसव (वय ५०) यांचे शनिवार ७ जून रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ, पुतणी, पुतण्या असा परिवार आहे. ते अखिल भारतीय गाडी लोहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचे ते स्वियसहाय्यक म्हणूही त्यांनी काम पाहिले होते. ते शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूल येथे कार्यालय अधिक्षक म्हणून कार्यरत होते.

### पुरुषोत्तम करवा



**सोलापूर, दि. ७ जून-**

भवानी पेठेतील रहिवासी पुरुषोत्तम शिवनारायण करवा यांचे दि. ७ जून रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते. मारवाडी गुर्जर स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. टॉवेल उत्पादक गोपीकिशन, ओमप्रकाश, नितीन करवा यांचे ते वडील होत

## पंढरपूरातील ६५ एकर परिसरात आ. आवताडेंनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ जून-**

आषाढी वारीच्या निमित्ताने आपल्या पंढरपूर शहरात संपूर्ण राज्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी व भाविक येणार आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारच्या गैरसोयींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाकडून व्यापक स्वरूपातील तयारी केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे यांनी ६५ एकर परिसराची पाहणी केली.

यावेळी युवा नेते प्रणव परिचारक, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, समाज कल्याण सहायक आयुक्त सुलोचना सोनवणे, प्रांत अधिकारी सचिन इथापे, पंढरपूरचे मुख्याधिकारी महेश रोकडे, आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश नवले, भाजपा जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चा सचिव माऊली हळणवर यांच्यासह विठ्ठल रुक्मिणी मंदीरे समितीचे पदाधिकारी, सोलापूर जिल्ह्यातील संबंधित अधिकारी, आणि पंढरपूर भाजपा शहराध्यक्ष व पदाधिकारी अन्य मान्यवर उपस्थित होते.



### आ. आवताडे यांनी यात्रेच्या अनुषंगाने काही महत्वाचे मुद्दे मांडले

६५ एकर परिसरात पावसामुळे चिखल होऊ नये, यासाठी मुरुम टाकण्याची व पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी. वारकऱ्यांना आरोग्य सेवा मिळावी व स्वच्छतागृहे स्वच्छ राहावीत यासाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत. नदीच्या वाळवंटात कचरा व प्लास्टिकचा प्रश्न टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. वाखरी-पंढरपूर पालखी मार्गाचे काम मंद गतीने सुरू आहे, ते वारीपूर्वी पूर्ण करण्यात यावे. पंढरपूर शहरातील रस्त्यांची साफसफाई नियमित करण्यात यावी. रस्त्याच्या दुभाजकांना आकर्षक रंग देण्यात यावेत.यासोबतच, पंढरपूरमध्ये येणाऱ्या सर्व वारकऱ्यांना आणि भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भक्त-भाविकांना पालखी मार्ग, पालखी तळ, विसावा आणि रिंगणाच्या ठिकाणी पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही आमदार आवताडे यांनी केल्या.

## महत्वाचे...

### मंगळवेढ्यात महसूल सहाय्यकाच्या कामास अटकाव; एकाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा, दि.७ जून-**

मंगळवेढा तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात एका तरुणाने येऊन प्राप्त अर्जांची संख्या व निर्गती अर्जांच्या संख्येची माहिती तात्काळ द्या असे म्हणून तेथे संगणकावर काम करणार्या लोकसेवक महसूल सहाय्यक यास अटकाव केल्याप्रकरणी राजकुमार शिवशंकर स्वामी (रा.बोराळे) याच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.२० मे रोजी ४.३० वाजता तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात वरील आरोपीने येवून साक्षीदार नामे महसूल सहाय्यक आनंद गायकवाड हे शासकीय कामकाज संगणकावर करीत असताना त्यांना अरेरावीची भाषा करत संगणकाच्या की बोर्डावर हात मारुन तसेच संगणकाची वायर काढून संगणक बंद करण्याचा प्रयत्न करुन तुझ्याकडे प्राप्त अर्जांची संख्या व निरगती अर्जांच्या संख्येची माहिती तात्काळ दे असे म्हणून त्याचा त्या कामाशी काहीही संबंध नसताना लोकसेवक त्यांचे कार्य पार पाडत असताना त्यांना अटकाव केला असल्याची फिर्याद निवडणूक नायब तहसिलदार जयश्री विरभद्र स्वामी (वय ५६) यांनी मंगळवेढा पोलीसात दिल्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला असून याचा अधिक तपास पोलीस नायक कृष्णा जाधव हे करीत आहेत.

### मावा खाऊन थुंकू नका म्हणल्याने मारहाण

**सोलापूर, दि.७ जून-**

मावा खाऊन घरासमोर थुंकू नका म्हणाल्याने दोघांनी एकास लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास नई जिंदगी येथील सिध्देश्वर नगर भाग दोन व तीनमध्ये घडला. असमद हुसेन शेख (वय ४३) असे मारहाण करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. असमद यांच्या घरासमोर शुक्रवारी रात्री ९च्या सुमारास खलिल मशाक गब्बुरे व इलियास गब्बुरे असे दोघे बसून मावा चघळत होते. तेव्हा असमद हे त्यांना मावा खाऊन घरासमोर थुंकू नका असे म्हणाले. यावरून चिडलेल्या इलियास व खलिल या दोघांनी असमद यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत असमद यांच्या ओठाला जखम झाली आहे. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री दहा वाजता ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### पैशाच्या कारणातून बिअर बाटलीने मारहाण

**सोलापूर, दि.७ जून-**

पैशाच्या कारणातून शहरातील जय भवानी शाळेजवळ बिअररची बाटली डोक्यात मारूण एकाला जखमी केले. ही मारहाण शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास झाली. नितीन किरण माने (वय ३६, रा. अभिमानश्री नगर, मुरारजी पेठ) असे मरहाण झालेल्याचे नाव आहे. यातील जखमी नितीन आणि अतुल भडंगे यांच्यात पैशाचा व्यवहार आहे. यातूनच जय भवानी शाळेजवळ त्यांची भेट झाल्यानंतर शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. यानंतर अतुल भडंगे याने त्याच्याजवळील बिअरची बाटली नितीनच्या डोक्यात मारली. यामुळे नितीनच्या डोक्यात जखम झाली आहे. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने राहुल जाधव याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रक्तदान कर म्हणून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि.७ जून-**

जयंतीच्या निमित्ताने रक्तदान कर म्हणून तरुणाला लाथाबुक्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. ही मारहाण कुमठा नाका परिसरातील भारत नगरात शनिवारी रात्री १२.१५ वाजता झाली. गणेश मोहन कुडके (वय १७, रा. भारत नगर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. कुमठा नाका परिसरातील भारत नगरात जयंती उत्सव साजरा करण्यात येत आहे. यामध्ये रक्तदान कर म्हणून गणेश याला गणेश पारधी व बालाजी घोडके या दोघांसह अन्य दोघांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मध्यरात्री दोन वाजता आई नगिना कुडके यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चुकीच्या दिशेने रिक्षाची दुचाकीला धडक

**सोलापूर, दि.७ जून-**

अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर येथून कुंभारीच्या दिशेने जाताना चुकीच्या दिशेने येणा-या रिक्षा चालकाने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात शनिवारी सकाळी दहा वाजता घडला. शंकर सिध्दप्पा दाले (वय ६०, रा. समाधान नगर) व विष्णु गिरदप्पा सोनटक्के (वय ५०, रा. मल्लिकार्जुन नगर) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. शंकर आणि विष्णु असे दोघे शनिवारी सकाळी दहाच्या सुमारास दुचाकीवर बसून कुंभारीच्या दिशेने जात होते. अक्कलकोट नाका येथील बीएसएनएल टॉवरजवळील रस्त्यावर समोरून चुकीच्या दिशेने येत असलेल्या रिक्षा चालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात शंकर यांच्या दोन्ही हाताला मुकामार तर चेह-याला जखम झाली तसेच विष्णु यांच्या डाव्या पायाला आणि डाव्या हाताला मुकामार लागला आहे. सकाळी अकरा वाजता ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पतीचे भांडण सोडविण्यास गेलेल्या पत्नीला मारहाण

**सोलापूर, दि.७ जून-**

पतीचे भांडण सुरु असताना सोडविण्यास गेलेल्या पत्नीला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आली. ही मारहाण इरण्णा वस्तीत शुक्रवारी रात्री १०.३० वाजता झाली. सुनिता महेश भिंगे (वय ३०, रा. इरण्णा वस्ती) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास यातील जखमी सुनिता हिच्या पतीचे राहया घरासमोर काही लोकांसोबत भांडण सुरु होते. हे भांडण सोडविण्यासाठी सुनिता तेथे गेल्या असता, त्यांना सतीश यलप्पा तुपदोळकर व इतर एक यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने शनिवारी रात्री १२.३० वाजता त्या स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# ‘वालचंद’च्या विद्यार्थ्यांनी पटकाविले प्रथम क्रमांकाचे २५ लाखांचे पारितोषिक

- विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या शेतीसाठी उपयुक्त फवारणी यंत्राची आंतराराष्ट्रीय पातळीवर दखल




**पुणे : प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकातील निम्मी रक्कम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्वीकारताना वरुण दोरनाल. यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. दुसऱ्या छायाचित्रात मॉडेल यंत्र तयार करणारे विद्यार्थी व मागदर्शक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. ७ जून-**

येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या दुसऱ्या वर्षातील चार विद्यार्थ्यांनी ‘अव्युक्तम इनोव्हेशन प्रा. लि.’ या नावाने स्टार्टअप स्थापन करून ‘इंटरनॅशनल पुणे ॲग्री हॅकेथॉन २०२५’ मध्ये २५ लाखांचे प्रथम पारितोषिक पटकावले.

त्यांनी पर्यावरणपूरक कीटकनाशक फवारणीसाठी ‘स्मार्ट पेस्टिसाईड स्प्रेअर’ तयार केले असून, या यंत्राद्वारे शेतकऱ्यांचा खर्च कमी होणार आहे आणि शेतकऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार नाही. या स्पर्धेत निवडले जाणारे हे राज्यातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय होते.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व महाराष्ट्र इनोव्हेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पुण्यात १ ते ३ जून दरम्यान झाली. १००हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संघांना मागे टाकून या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. याआधी ‘स्मार्ट इंडिया हॅकेथॉन’, व इतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांतही त्यांनी पारितोषिके मिळवली होती. त्यातून जमा झालेल्या निधीतूनच त्यांनी कंपनीची उभारणी केली. सध्या ५ टप्प्यावर असलेले प्रोटोटाइप ९ म्हणजेच उत्पादनसिद्धतेच्या दिशेने विकसित करण्यासाठी पुरस्काराची रक्कम वापरली जाणार आहे.

या यशाच्या पार्श्वभूमीवर वालचंद शिक्षण समूहाचे समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी शाखा प्रमुख डॉ. सचिन गेंगजे यांच्या नेतृत्वाखाली ही वाटचाल सुरू आहे. या पत्रकार परिषदेत वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त पृथ्वीराज गांधी, वैभव गांधी, डब्ल्यु.आय.टी. सर्व विद्या शाखांचे प्रमुख, प्राध्यापक जनसंपर्क अधिकारी सुधीर जोगीपेठकर यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




### दुसऱ्या वर्षातच स्टार्टअप स्थापन करून विद्यार्थ्यांचे धाडसी पाऊल

ऋग्वेदी पाटील, वरुण दोरनाल, ओंमकार आवडे व रितेश पाटील यांनी दुसऱ्या वर्षातच स्टार्टअप स्थापन करून धाडसी पाऊल उचलले. या यशामागे प्रा. दीपाली वाडकर, प्रा. वैभव कुलकर्णी व दिलीप माळी यांचे मार्गदर्शन लाभले.‘बूटस्ट्रॅपिंग’ किंवा सुरुवातीच्या टप्प्यातील गुंतवणूक व्यवस्थापनाचे उदाहरण ठरलेला त्यांचा प्रवास आजच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा आहे. त्यांनी केवळ यंत्र नव्हे, तर पुढील १० वर्षांचा व्यवसाय आराखडाही परीक्षकांसमोर प्रभावीपणे मांडला. ‘व्हेंचर कॅपिटल’, ‘सीरिज - फंडिंग’ ते ‘’पर्यंतचा प्रवास त्यांनी आत्मविश्वासाने मांडला.

## राष्ट्रवादी पक्ष अव्वलस्थानी राहण्यासाठी प्रयत्न करा

**उपमुख्यमंत्री पवार यांच्या किसन जाधव यांना सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ जून-**

सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) अव्वल स्थानी राहील यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करावी. अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुणे येथे भेट घेतली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. सर्वसामान्य नागरिक डोळ्यासमोर ठेवून कार्य करत रहा. हाच सर्व सामान्य नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विचारधाराशी जोडला गेला पाहिजे. सत्तेच्या माध्यम ातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पक्ष बळकटीसाठी सभासद नोंदणी अभियान राबवावे असे देखील पवार यांनी सांगितले. याप्रसंगी आमदार चेतन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर शहर उपाध्यक्ष उमेश जाधव, महादेव राठोड,आनंद गाडेकर यांच्यासह पुणे शहरातील पदाधिकारी कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

## महालक्ष्मी नगरात एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि.७ जून-**

शेळगी परिसरातील महालक्ष्मी नगरात शनिवारी सकाळी गळफास घेऊन एका व्यक्तीने आत्महत्या केली.



हा प्रकार सकाळी ६.३० वाजता उघडकीस आला. शितलकुमार अशोक होटकर (वय ४४) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. शनिवारी सकाळच्या सुमारास शितलकुमार हे ते राहत असलेल्या घराच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतलेलया अवस्थेत दिसून आले. त्यांना नातेवाईकांच्या मदतीने गळफासातून सोडवून बेशुध्द अवस्थेत हवालदार वाघमारे यांनी सकाळी ९.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## इन्शाअल्लाह : आवाजातून अनुभवलेलं वास्तव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

मुस्लिम समाजाच्या वास्तवाचं जिवंत चित्रण करणाऱ्या इन्शाअल्लाह या बहुचर्चित कादंबरीच्या अभिवाचनाचा प्रभावी कार्यक्रम प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत पार पडला. शनिवारी, दिनांक ७ जून २०२५ रोजी सायंकाळी ६.२५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित झालेल्या या कार्यक्रम ात रसिकांना एक आगळीवेगळी अनुभवसंपन्नता लाभली.



प्रसिद्ध लेखक आणि दिग्दर्शक अभिराम भडकमकर लिखित इन्शाअल्लाह या कादंबरीच्या अभिवाचनात स्वाक्षरी केली त्यांनी स्वतः आणि त्यांच्यासोबत नामवंत अभिनेते सलीम मुल्ला, सचिन सुरेश तसेच ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस यांनी. त्यांच्या सशक्त आणि भावस्पर्शी वाचनातून कादंबरीतील कथानक जिवंत झालं.

इन्शाअल्लाह ही कथा आहे जुनैद नावाच्या एका मुस्लिम तरुणाची - जो दारिद्र्य, धर्म, समाज आणि अस्तित्वाच्या सीमारेषांवर उभा आहे. या कथेतील बोली भाषा, बागवानी हिंदीचा समृद्ध वापर, आणि सम ाजाच्या मनोविश्वातील गुंतागुंतीची मांडणी प्रेक्षकांच्या काळजाला भिडली. या कार्यक्रमाची सुरुवात प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते सर्व कलाकारांच्या सन्मानाने झाली. हे केवळ अभिवाचन नाही, तर वास्तवाशी भिडण्याचा अनुभव आहे.

भाषा, अभिनय आणि आशय यांच्या त्रिवेणी संगमाचा प्रत्यय आजच्या कार्यक्रमातून प्रेक्षकांना आला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित प्रेक्षकांशी कलाकारांनी या इन्शाअल्लाह कादंबरी बद्दल प्रश्नोत्तरात्मक चर्चा केली. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रिसिजन चे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी केले. प्रिसिजन वाचन कट्ट्यावर साहित्यिक संवादाचे खास सत्र

मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी प्रिसिजन वाचन कट्टा या साहित्यिक मंचावर लेखक अभिराम भडकमकर, अभिनेते सलीम मुल्ला, सचिन सुरेश आणि ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस यांनी उपस्थिती लावली. या वेळी त्यांनी उपस्थित वाचकांशी अनौपचारिक संवाद साधत वेगवेगळ्या पुस्तकांबद्दल चर्चा केली. रसिक वाचकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने हे सत्र विशेष भावनिक रंगत घेऊन पार पडले.

## टेलिव्हिजनच्या इतिहासात प्रथमच महानायिकांची महावटपौर्णिमा

**वडाच्या रक्षणासाठी स्टार प्रवाहच्या १५ नायिका उठवणार आवाज**

**मुंबई, दि. ७ जून-**

वरुण राजाचं आगमन झालं की चाहूल लागते ती वटपौर्णिमा सणाची. पती-पत्नीच्या नात्यातला गोडवा वाढवणाऱ्या या सणाचं विशेष महत्त्व आहे. या दिवशी वटवृक्षाची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली जाते. वड हा वृक्ष दीर्घायुषी असल्याने या वृक्षाचं संवर्धन केलं जावं हा महत्त्वाचा उद्देश देखिल या सणामागे आहे. मराठी टेलिव्हिजनच्या इतिहासात पहिल्यांदाच स्टार प्रवाहच्या १५ नायिका एकत्र येऊन वडाच्या रक्षणासाठी आवाज उठवणार आहेत. व्रताचे धागे तोडू पहाणाऱ्या वाईट प्रवृत्ती विरोधातला हा लढा असेल. ज्या वटवृक्षाने दर वटपौर्णिमेला सौभाग्यवतींना आशीर्वाद दिला त्याच्या मुळावर जेव्हा कुणी घाव घालण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ही लढाई कुणा एकाची नसते. तर आपल्यातल्याच असंख्य शुभा, नंदिनी, सायली, कला आणि अबोली सारख्या रणरागिणी एकत्र येतात आणि या प्रवृत्तीचा नायनाट करतात. आजच्या युगाची सती सावित्री कशी असावी याचा आदर्श घालून देतात.




मराठी परंपरा, मराठी प्रवाह हे स्टार प्रवाह वाहिनीचं ब्रीदवाक्यच आहे. परंपरेसोबतच सामाजिक भान जपण्याचा स्टार प्रवाहने नेहमीच प्रयत्न केला आहे. महावटपौर्णिमेचा हा विशेष भाग याच प्रयत्नातलं पुढचं पाऊल म्हणता येईल. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. पूर्वापार चालत आलेले सण आणि परंपरा आपल्याला निसर्गाच्या सानिध्यात जाण्यासाठी आणि त्यांचं संवर्धन करण्यासाठी भाग पाडतात. वटपौर्णिमा हा सण हे त्याचच एक उत्तम उदाहरण. त्यामुळे वटवृक्षाचं रक्षण करून स्टार प्रवाहच्या नायिका यंदाची वटपौर्णिमा खऱ्या अर्थाने आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करणार आहेत.

आई आणि बाबा रिटायर होत आहेत मालिकेतील शुभा म्हणजेच निवेदिता सराफ म्हणाल्या, 'मालिकांमधील सगळ्या नायिकांना एकत्र आणून त्यांच्या पात्राचा विचार करून गोष्ट लिहिली गेलीय याचं कौतुक वाटतं मला. शूट नाही तर एखादा छान समारंभ सुरु आहे असंच वाटतंय. पूर्वापार चालत आलेल्या सणांमागे खूप चांगला विचार आहे तोच पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. वृक्षसंवर्धन हा विषय सध्या अत्यंत महत्त्वाचा आहे. निसर्गाने आपल्याला भरभरुन दिलं आहे या निसर्गाला जपणं हे आपलं कर्तव्य आहे. महावटपौर्णिमेच्या या विशेष भागाच्या निमिताने १५ नायिका एकत्र येऊन वटवृक्षाच्या रक्षणासाठी कसा लढा देणार हे पहाणं उत्सुकतेचं असेल.' ठरलं तर मग मालिकेतील सायली म्हणजेच अभिनेत्री जुई गडकरी म्हणाली, 'हा फक्त महासंगम आहे असं मी म्हणणार नाही. महावटपौर्णिमेच्या निमित्ताने खूप चांगला उपक्रम स्टार प्रवाह वाहिनी राबवते आहे. निसर्गाच्या सानिध्यात आपण प्रत्येकानेच जायला हवं. वटपौर्णिमा सण आपल्याला हेच शिकवतो. या विशेष भागातूनही आपल्या रुढी, परंपरा आणि निसर्ग किती महत्त्वाचा आहे हे पहाता येईल. झाडांचं संवर्धन करण्यासाठी कश्या १५ नायिका एकत्र येऊन लढा देतात याची छान गोष्ट गुंफण्यात आली आहे. या निमित्ताने वडाच्या झाडाजवळ ४ दिवस शूट करता आलं. आम्ही सगळ्या नायिका एकत्र होतो. शूट करताना खूपच मजा आली अशी भावना जुई गडकरीने व्यक्त केली.' तेव्हा पाहायला विसरु नका महानायिकांची महावटपौर्णिमा ८ जूनला दुपारी १ आणि संध्याकाळी ७ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.



## वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान आध्यात्मिक नंदनवन : पंकजा मुंडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जून-**

श्री स्वामी समर्थांचे जागृत वास्तव्य असल्याने श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे भूतलावरील आध्यात्मिक नंदनवन असल्याचे मत पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास त्यांनी भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. तत्पुर्वी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे व आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी मंत्री पंकजा मुंडे यांचा पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. श्री स्वामी दर्शनानंतर मंदिर समितीच्या वतीने चेअरमन व प्रमुख महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी मंत्री मुंडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे मुंडे कुटुंबियांचे श्रद्धास्थान आहे. मी व माझे कुटुंबीय श्री स्वामी समर्थांचे निस्सीम भक्त आहोत. ज्या ज्या वेळी या भागात यायची संधी मिळते त्यावेळी नक्कीच स्वामी दर्शनाचा लाभ घेते, परंतु आज खास स्वामी समर्थांच्या दर्शनाकरिता येथे येऊन समर्थांचे दर्शन घेतले व येथे बसून शांत चित्ताने स्वामी समर्थांचे नामस्मरण, नामजप केला. हा आनंद जीवनाला समाधान देणारा ठरणार आहे. सोयी सुविधांना प्राधान्य देण्याचे काम मंदिर समि तीच्या वतीने महेश इंगळे हे अत्यंत कुशलतेने हाताळत आहेत, हे कार्य पाहूनही अत्यंत समाधान वाटल्याचे मंत्री मुढे यांनी सांगितले. यावेळी भाजपाचे शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, मा.नगरसेवक महेश हिंडोळे, नागराज कुंभार, मल्लीनाथ स्वामी, शिवशंकर चनशेट्टी, नन्नू कोरबू, अंकूश चव्हाण, कांतू धनशेट्टी, लखन झंपले, धर्मण्णा पाटील, अप्पी साळूंखे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, महेश मस्कले, समर्थ स्वामी, तुषार मोरे आदींसह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# शहरात तीन दिवस शिवशंभू विचारांचा जागर

### हिंदू बांधवांनी उपस्थित राहण्याचे श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे आवाहन

**सोलापूर, दि. ७ जून-**

श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी निमित्त अर्थात श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त तीन दिवस शिवशंभू विचारांचा जागर होणार असल्याची माहिती श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संजय साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे रविवार दि. ८ जून रोजी सकाळी ८ वाजता धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जुना पुणे नाका येथील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या मूर्तीस अभिवादन करण्यात येणार आहे. सोमवारी (दि. ९) सकाळी ८ वाजता श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रंगभवन येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज उद्यानात श्री शिवराज्याभिषेक सोहळा होणार आहे. मंगळवारी (दि.१०) दुपारी ४ वाजता ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरापासून देवदर्शन पदयात्रा पालखी मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत लेझीम पथक, हलगी पथक, वारकरी पथक, शिवकालीन मर्दानी लाठीकाठी शस्त्र पथक आदींचा समावेश असणार आहे. श्री शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यातील या सर्व कार्यक्रमांना हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे संजय साळुंखे यांनी केले. या पत्रकार परिषदेस श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे ओंकार देशमुख, ओंकार चराटे आदी उपस्थित होते.



## ▶▶ महत्वाचे...

### पिकअप पलटी होऊन चालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ७ जून-**

ज्यूस ट्रेट्रापॅक घेऊन जाणारा पिकअप पलटी होऊन चालकाच्या मृत्यूप्रकरणी मयत चालकाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.भगवान ज्ञानू म्हारनूर (वय ५२, रा. सुभाष नगर, मिरज, जि. सांगली) असे मयत चालकाचे नाव आहे. याबाबत अभिजित चंद्रशेखर पाटील (वय ३७, रा. सुभाष नगर, मिरज, जि. सांगली) यांच्या फिर्यादीवरुन भगवान म्हारनूर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ मे रोजी भगवान म्हारनूरहे पिकअप क्र. एमएच १३ एएन १३१८ या वाहनातून ज्युस ट्रेट्रापॅक बीडकडे घेऊन जाताना मंगळवेढा रोडवर वाहन भरधाव चालविल्याने वाहनाचे मागील टायर फुटून गाडीतील क्लिनर सुरेश रावसाहेब कुलाळ व चालक भगवान म्हारनूर हे जखमी झाले. चालक म्हारनूर याचा उपचारावेळी मृत्यू झाला. म्हणून स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार वाल्मिकी पुढील तपास करीत आहेत.

### तरूणास मारहाण करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ७ जून-**

तरूणास मारहाण करून गाडी हिसकविण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयूर अंबादास रच्चा (वय ३५, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास मयूर रच्चा हे एका अनोळखी व्यक्तीला दुचाकीच्या पाठीमागे बसवून सोन्या मारूती पेट्रोल पंपाकडून मुळेगाव क्रॉस रोडकडे येत होते. त्यावेळी मंत्री चंडक पार्क जवळ गाडीच्या मागील सीटवर बसलेल्या अनोळखी व्यक्तीने रच्चा यांच्या खिश्यातील मोबाईल चोरण्याचा प्रयत्न केला व रच्चा यास गाडी थांबविण्यास सांगून त्याच्या नाकावर व डोळ्याखाली बुक्कीने मारहाण करून गाडी हिसकावून नेण्याचा प्रयत्न केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

# सोलापूर-गोवा विमानसेवेचा उद्या शुभारंभ

**● मुख्यमंत्री फडणवीस, मंत्री मोहोळ, पालकमंत्री गोरे यांची उपस्थिती**

**● आ. कल्याणशेट्टी, आ. कोठेंसह जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केली तयारीची पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

सोलापूरकरांचे स्वप्न असलेल्या विमानसेवेचा शुभारंभ (दि.९) जून रोजी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सोलापूर विमानतळावर होणार आहे. या कार्यक्रमाच्या मंडप उभारणीची तयारी सुरू झाली असून मंडप उभारणी व इतर व्यवस्थेची पाहणी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवारी आमदार देवेंद्र कोठे यांना सोलापूर विमानतळाच्या उद्घाटनाबाबत निरोप देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणाऱ्या विमानसेवा उद्घाटन कार्यक्रमाची तयारी करण्याच्या सूचना दिल्या. ९ जून रोजी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूरची विमानसेवा सुरू होणार असल्याचे आ. देवेंद्र कोठे यांनी जाहीर करताच शहरात आनंदाचे वातावरण पसरले. विमानसेवेच्या माध्यमातून सोलापूरच्या विकासाचे द्वार उघडल्याबद्दल सोलापूरकरांनी समाज माध्यमांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे यांचे कौतुक केले. उद्घाटन कार्यक्रमास होणाऱ्या ठिकाणाची पाहणी करून संबंधितांना वरिष्ठांनी सूचना दिल्या. याप्रसंगी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यासह सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता सारिका आकुलवार, राष्ट्रीय विमान प्राधिकरणाचे चंद्रेश वंजारा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मनोज ठाकरे, माने आदी उपस्थित होते.



### प्रवाशांसाठी उद्योजक, व्यावसायिकांकडून भेटवस्तू

सोलापुरातून नागरी विमानसेवा सुरू होत असल्याची सोलापूरकरांमधील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यासाठी लढा उभारणारे सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी गोव्यावरुन येताना व सोलापूरहुन गोव्याला जातानाचे तिकीट काढले आहे. पहिल्या विमानातून प्रवास करणाऱ्या येताना व जाताना प्रवाशांसाठी सोलापूरातील उद्योजक, व्यवसायिक यांनी विविध भेटवस्तू देण्याची तयारी केली आहे.



### प्रवाशांना मिळणार ही भेटवस्तू

- नट्स मिठाई नमकीन व केटरिंगचे भावेश शहा यांच्याकडून रिफ्रेशमेन्ट पॅकेट.
- न्यू बॉम्बे बेकरी अँड केक गॅलरी तर्फे केक
- अन्नपूर्णा टेक्सटाईल्सच्या प्रमोद व अंकित दरगडकडून प्रसिद्ध टर्किश नॅपकीन
- क्लासिक फूड्सच्या दिवीत हितेंद्र शहा यांच्याकडून शेंगा चटणी.
- बी-गलीम प्रो-क्लीन सोल्युशन्सच्या विनय व अनुजा मोडक यांच्याकडून सॅनिटाईझर व फ्रेशनर.

# घरात स्पाय कॅमेरा लावून पत्नीला मारहाण

**● पती व नणंदेविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**



घरात स्पाय कॅमेरा लावून पत्नीला शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण करून घरातील प्रापंचिक साहित्याची मोडतोड करून नुकसान करणाऱ्या पती व नणंदेविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत धनुश्री प्रभाकर शिवशरण (वय २५, रा. आंबेडकर नगर, नविन आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती प्रभाकर व नणंद पुजा वाघमारे (रा. आंबेडकर नगर, नविन आरटीओजवळ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ जून २०२१ ते ६ जून २०२५ या कालावधीत धनुश्री या पती प्रभाकर याच्या घरी सासरी नांदण्यास होत्या. धनुश्री यांच्या सासूच्या मृत्यूनंतर आठ दिवसांनी पती प्रभाकर व नणंद पुजा यांनी धनश्री हिने तिच्या आई-वडीलांकडून २ लाख रुपये आणावेत या कारणावरून शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली. तसेच धनुश्री या आजारी पडल्यानंतर त्यांना दवाखान्यात दाखवत नव्हते. तसेच नणंद पुजा हिने धनुश्रीच्या घरात सीसीटीव्ही कॅमेरा व स्पाय कॅमेरा लावून त्यातील धनुश्रीची व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत सोडचिठ्ठी देण्याची धमकी दिली. आई-वडीलांकडून पैसे आण म्हणून तगादा लावून शिवीगाळ केली. ६ जून २०२५ रोजी पती व नणंदेने शिवीगाळ व दमदाटी करून धनुश्रीला मारहाण करून घरातील प्रापंचिक साहित्य फोडून नुकसान केले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सोनार पुढील तपास करीत आहेत.

# ४ हजार ४३८ शिक्षकांच्या होणार बदल्या

### ९ हजार ६१ शिक्षक कार्यरत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर , दि. ७ जून-**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडून गुरुवारी ५ जून रोजी रात्री बारा वाजेपर्यंत प्राथमिक शाळेतील रिक्त शिक्षकांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे.



त्यामुळे शिक्षकांच्या लवकरच जिल्हांतर्गत बदल्या होणार आहेत. जिल्ह्यात नऊ हजार २५० प्राथमिक शिक्षक आहेत. त्यातील नऊ हजार ६१ शिक्षक सध्या कार्यरत आहेत. त्यातील जवळपास साडेचार हजार शिक्षक बदलीसाठी पात्र ठरले आहेत. त्यांची बदली शासनाच्या आदेशानुसार होणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे. दहा दिवसांत नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या रखडणार असल्याचा अंदाज काही शिक्षक संघटनेतून व्यक्त होत आहे.

मात्र, त्याआधीच शिक्षकांच्या बदल्या होणार असल्याचे प्राथमिक शिक्षण विभागाने सांगितले. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या अगोदर बदल्या होणार का? हे येत्या काही दिवसात स्पष्ट होणार आहे. बदली प्रक्रिया सुरू झाल्यानंतर प्रत्येक संवर्गनिहाय बदलीसाठी कालावधी दिला जातो. त्यात आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. त्यामुळे बदल्या रखडण्याची शक्यता असल्याचे शिक्षकांमध्ये चर्चा सुरू आहे.

### प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रीया सुरू

प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रीया सुरू असून शक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी पोर्टलवर रिक्त जागांची माहिती भरली आहे. बदलीसाठी साडेचार हजार शिक्षक पात्र आहेत. त्यांच्या बदल्या लवकरच होतील. त्यादृष्टीने गतीने कामकाज सुरू आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शिक्षक बदली प्रक्रीया पूर्ण होणार आहे.

**- कादर शेख,**
प्राथमिक शिक्षणाधिकारी

## ▶▶ शहर पोलिस ॲक्शन मोडवर

# महिलेसह तिघां सराईत गुन्हेगारांना दोन जिल्ह्यातून केले तडीपार

### चालू वर्षी आतापर्यंत ३३ जणांना करण्यात आले तडीपार



दिपक जाधव | सचिन व्हनमाने | कपील भांडेकर | फरजाना शेख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

आगामी काळात होणाऱ्या महानगर पालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर पोलिसांनी शहरातील गुडांच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली असून शहर पोलिस ॲक्शन मोडवर आले आहेत. याचाच एक भाग म्हणून पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी एका महिलेसह तीन सराईत गुन्हेगारांना सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहे. चालू वर्षी आतापर्यंत ३३ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे तर पोलिस उपायुक्त कबाडे हे रूजू झाल्यापासून १५५ गुन्हेगारांना तडीपार केलेले आहे.

दिपक मोहन जाधव (वय २५, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. २ मैदानाजवळ, सलगर वस्ती, सोलापूर), सचिन कलप्पा व्हनमाने (वय २७, रा. कल्याण नगर भाग ३, जुळे सोलापूर), कपिल ज्ञानेश्वर भांडेकर (वय २७, रा. घर नं. ३०, वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर) आणि फरजाना अब्बास शेख (वय ४२, रा. ४८४/३, अ गोदूताई विडी घरकुल, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दिपक जाधव याच्याविरुध्द सन २०१६,२०२०,२०२५ या कालावधीत दंगा व मारामारी करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, महिला अत्याचाराचे गुन्हे यासारखे गुन्हे दाखल आहेत. सदर बझार पोलिसांकडून त्याच्या तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सचिन व्हनमाने याच्याविरुध्द सन २०१२, २०१५, २०२४ या कालावधीत घरफोडी करणे, घातक शस्त्र घेऊन फिरून दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरुध्द विजापूर नाका पोलिसांकडून तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. कपिल भांडेकर याच्याविरुध्द सन २०१७,२०१९,२०२३ व २०२५ या कलावधीत सामान्य नागरीकांना मारहाण करून दहशत निर्माण करणे, जबरी चोरी करणे, खंडणी मागणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. फौजदार चावडी पोलिसांकडून त्याच्या तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तर फरजाना शेख या महिलेविरुध्द २०२४ व २०२५ या कालावधीत महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरणे, सामान्य नागरीकांचे पाकिट चोरणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. सदर बझार पोलिसांकडून तिच्या तडीपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

या चारही प्रस्तावास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या सूचनेनुसार मंजूरी देत तिन्ही गुन्हेगारांना दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश दिले.





सोलापूर : होटगी रोड येथील ईदगाह मैदान आणि पानगल हायस्कूल येथील मैदानावर शनिवारी बकरी ईदची सामूहिक नमाज अदा करण्यात आली.

# बकरी ईद म्हणजे त्याग, समर्पण, प्रेम, बंधूता अन् समानतेचा संदेश

## शहर काझी मुफ्ती सय्यद अमजदअली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

सोलापूर शहरातील विविध ईदगाह मैदानावर बकरी ईदनिमित्त मुस्लीम बांधवांनी सामूहिक नमाज पठण केले. यावेळी बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

या दिवशी मुस्लीम बांधव बकरीची कुर्बानी देऊन हा सण साजरा करीत असतात.इस्लाम धर्मियांच्या पाच तत्व पैकी एक म्हणजे हज यात्रा याच काळात मुस्लिम बांधव मक्का येथे जाऊन पूर्ण करतात. अल्लाह ने ज्याला मालदार केले त्यांना हज यात्रा अनिवार्य आहे.असे सांगितले जाते.

दरम्यान, बकरी ईद दिवशी अनेक मुस्लीम बांधवानी शहरातील अहले हदीस ईदगाह रंगभवन, शाही आलम गीर ईदगाह पांगल हायस्कूल, आलम गीर ईदगाह होटगी रोड, आदिल शाही ईदगाह जुनी मिल कंपाउंड, आणि आसार मैदान ईदगाह, या विविध ईदगाह मैदानावर गर्दी केली होती. यावेळी बकरी ईदनिमित्त सोलापूर शहरातील ईदगाह मैदानावर मुस्लीम बांधवांनी सामूहिक नमाज पठण केले. त्यानंतर सामूहिक प्रार्थना करण्यात आली.होटगी रोडवर शहर काझी मुफ्ती सय्यद अमजदअली काझी यांनी सामूहिक नमाज पठण केले. या सणातून आपल्याला शिकायला मिळतं की अल्लाहसाठी सर्व काही त्याग करता येतं. या दिवशी मुस्लिम समाजातील लोक बकऱ्यांची कुरबानी देतात आणि त्या मांसाचं तीन भागात वाटप करतात.एक हिस्सा स्वत:साठी, दुसरा नातेवाईकांसाठी आणि तिसरा गरीबांसाठी. हे सामाजिक समानता, दया आणि बंधुत्वाचे प्रतिक आहे.




इस्लाम हा एक संपूर्ण जीवनपद्धती आहे जो केवळ उपासनेचा नाही, तर त्याग, समर्पण, प्रेम, बंधुता आणि समानतेचाही संदेश देतो. या सर्व गोष्टींचं सुंदर दर्शन ईद उल-अजहा या सणामध्ये घडते.असे शहर काझी सय्यद मुफ्ती अमजदअली यांनी आपल्या प्रवचनावेळी सांगितले.

**● न्याय देणारे असले पाहिजेत :** खरी कुरबानी फक्त प्राण्यांची नसते, तर आपले अहंकार, गर्व, द्वेष, मत्सर आणि वाईट इच्छाही त्याग करणं ही खरी कुरबानी आहे. कुरबानीच्या माध्यमातून संयम, कृतज्ञता आणि नम्रता शिकायला मिळते.आपल्या मुलांना उच्च शिक्षण द्या.ते न्याय मागणारे नसावेत, तर न्याय देणारे असले पाहिजेत, ते संरक्षण मागणारे नसावेत, तर जे लोकांना संरक्षण देतात, ते देशाला आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मजबूत करणारे असले पाहिजेत.

**- मुफ्ती सय्यद अमजदअली काझी,** शहर काझी सोलापूर

**● ईद म्हणजे आनंदमय क्षणांचा अनुभव :** या दिवशी मुस्लिम बांधव नवीन कपडे परिधान करतात, एकमेकांना शुभेच्छा देतात, पाहुण्यांचं स्वागत करतात आणि गरजूंना मदत करतात. हा सण आपल्याला सामाजिक ऐक्य,सौहार्द आणि प्रेम शिकवतो.

**● ईद-उल-अजहाची पार्श्वभूमी :** ईद उल-अजहा हा सण पैगंबर हजरत इब्राहिम (अ.स.) यांच्या अल्लाहसाठी दिलेल्या महान बलिदानाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. अल्लाहने त्यांना त्यांच्या सर्वात प्रिय मुलगा हजरत इस्माईल (अ.स.) यांना कुरबान करण्याचा आदेश दिला. त्यांनी कोणताही प्रश्न न विचारता अल्लाहच्या आज्ञेचं पालन केलं, पण अल्लाहने त्यांच्या निष्ठेची परीक्षा पूर्ण मानून हजरत इस्माईल यांच्याऐवजी एक मेंढा पाठवला. ही घटना समर्पण आणि ईश्वरनिष्ठेचा सर्वोच्च आदर्श आहे.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११४०

**अहो वसतीं धवळारें । मोडूनि केली देऊळ देव्हारें ।**
**नागौनि वेव्हारें । गवादी घातली ।।**

ज्ञानी माणूस स्वत:ला मोठेपण घेत नाही. लोक प्रसिध्दीची त्याला शिसारी येते असते. स्वत:च्या अंगी नम्रता आणि कमीपणा हेच त्याचे भुषण असते. धनाचा लोभी माणूस जीवजाण्याची वेळ आली तरी दडवून ठेवलेले धन हव्यासापोटी सांगत नाही, तसे ज्ञानी व्यक्तीच्या जीवावर संकट आले तरी, तो आपण केलेले पुण्यकर्म आपल्या वाचेने सांगत नाही. खटयाळ गाईला पान्हा फुटला तरी ती चोरते, वारांगणा आपले प्रौढत्व लपविते. श्रीमंत माणूस एकटा जंगलातून जाताना आपले वैभव लपवितो, कुलीन स्त्री आपले शरीर झाकून ठेवते, शेतकरी आपण पेरलेले बी माती टाकून झाकतो, अगदी या प्रमाणे ज्ञानी व्यक्ति आपल्या हातून झालेले दान-पुण्य सत्कर्म झाकून ठेवत असतो. सामाजाने आपणाला साधू तपस्वी, महाराज म्हणावे अशी त्याची अजिबात अपेक्षा नसते. इतरांवर केलेल्या परोपकाराची वाच्यता ज्ञानी करीत नाही. या सर्व गुणांचा उत्कर्ष ज्याचे ठिकाणी आहे, त्याला ज्ञान झाले असे समजावे. यालाच अदंभित्व असे म्हणतात, असे भगवंत म्हणाले. या गुणांची आपण आपल्या ठिकाणी चाचपणी करणे आवश्यक आहे. ज्यामुळे आपण कितपत योग्य वागत आहोत, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.



भगवंत अहिंसेबद्दल बोलत आहेत. झाडाच्या फांद्या तोडून त्या झाडाच्या बुडाला संरक्षण म्हणून लावणे, किंवा पाऊस पडत नाही म्हणून जर्जर झालेल्या प्राणीमात्रांसाठी पाऊस पडण्यासाठी यज्ञ करुन त्या यज्ञात पशुंचा बळी देणे ही हिंसाच होय. वैध हिंसेला अहिंसा म्हणणे चुकीचे आहे. हिंसा ही हिंसच आहे. रोग्याचे मरण टाळण्यासाठी कंद मूळे काढणे, झाडे तोडणे, पानासह उकळणे, झाडाला भोके पाडून त्यातून चिक काढणे, चेतन प्राण्यांना मारुन त्यांचे पित्त काढून रोग्यासाठी वापरणे, ही सुध्दा हिंसाच आहे. हिंसेबद्दल बोलतांना माऊली म्हणतात अहो वसतीं धवळारें । मोडूनि केली देऊळ देव्हारे । नागौनि वेव्हारें । गवादी घातली ।।. अर्थात, राहती घरे पाडून त्या पाडलेल्या साहित्याने किंवा घराच्या जागेवर मंदिर-देव्हारे तयार करणे योग्य नाही. जीवनात लोकांना गंडवून फसवून द्रव्य मिळवायचे आणि त्या द्रव्यातून अन्नछत्र, दान करायचे म्हणजे हिंसाच आहे. आज समाजात असे अनेक दानशूर आहेत, की जे समाजाला वेगवेगळया प्रकारे लुबाडतात, लुटतात आणि या लूट मधून मिळालेला थोडासा भाग दान-धर्मावर खर्च करुन आपल्या लुटारुवृत्तीवर पांघरुन घालण्याचा प्रयत्न करतात. आपण दानधर्म केले नाही तरी चालेल; पण आपल्याकडून कोणाची फसवणूक, लुबाडणूक होणार नाही याची खात्री झाली तरी पुरे. त्याच बरोबर कोणत्याही परिस्थितीत खोटारडे मोठेपण आपल्या मनाला शिवणार नाही अशी आपली मानसिकता कायमस्वरुपी टिकली पाहीजे, अर्थात मी नावाचा शत्रू आपल्या जवळ येणार नाही असे आपले वर्तन असायला हवे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ८ जून २०२५ | त्रिदीनात्मक सावत्र व्रतारंभ |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (०७.१७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (१२.४१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (१२.१७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (२०.२८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ** : आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह** : प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या** : उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक** : कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** : सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर** : दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ** : व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन** : श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दु:खी रहाल.

# सोलापुरात गारमेंट ट्रेनिंग सेंटर करा

## मंत्री लोढा यांना युनिफॉर्म उत्पादकाकडून निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

सोलापूर रेडीमेड कापड उत्पादक संघाने गेल्या आठ वर्षात देशभरात विविध राज्यात युनिफॉर्म गारमेंट उत्पादनाचे प्रदर्शन भरविले आहे. त्यामुळे त्याची मागणी देशभर वाढताना दिसत आहे म्हणून त्याला कुशल कामगारांची गरज असून सोलापुरात एक स्टेट आर्ट ऑफ गारमेंट ट्रेनिंग सेंटरची उभारणी करून द्यावी, अशा आशयाचे निवेदन राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याकडे देण्यात आले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील गारमेंट असोसिएशनच्या गारमेंट कारखान्यामध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात वरील निवेदन देण्यात आले. यावेळी गारमेंट असोसिएशनचे मार्गदर्शक आ. सुभाष देशमुख अध्यक्ष निलेश शहा, सचिव प्रकाश पवारसह पदाधिकारी उपस्थित होते.




सोलापूर एमआयडीसी सध्या १००० पेक्षा जास्त युनिफॉर्म गारमेंट उत्पादक कारखानदार आहे त्यांच्याकडे बारा ते पंधरा हजार महिला व पुरुष कामगार काम करीत आहेत. उत्पादनक्षमता वाढविण्याकरिता सध्या कुशल कामगारांची खूप गरज भासत आहे. त्यामुळे ट्रेनिंग सेंटरची नितांत गरज असल्याचे युनिफॉर्म गारमेंट असोसिएशन नी सांगितले.

जर ट्रेनिंग सेंटर उभारले तर त्यामध्ये अदयावत मशिनरी उभारले जाईल म्हणजे कॅड ऑपरेटिंग, शिलाई मशीन, कटिंग मशीन, प्रेस मशीन, काज आणि बटन मशीन एकाच ठिकाणी उपलब्ध करता येईल. ज्यामुळे कुशल कामगार तयार होण्यास मदत होईल.

४५ ते ६० दिवसांचा स्पेशल कोर्स गारमेंट उद्योगाच्या गरजेनुसार राबविण्यात येईल जेणेकरून ट्रेनिंग घेणाऱ्या प्रत्येक उमेदवार आत्मनिर्भर बनेल. जर महाराष्ट्र शासनाकडून जर ट्रेनिंग सेंटर उभे राहिले तर युनिफॉर्म गारमेंट चे उत्पादन वाढवून ते देशाबाहेर देखील यशस्वीरित्या पाठविण्या संदर्भात जास्त कारखानदारांना मदत होईल असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते. त्यामुळे शासनाने याचा सकारात्मक विचार करावा. अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.

## संतोष नगर येथे वृध्दाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

बाळे परिसरातील संतोष नगर येथे स्वत:च्या गाळ्यात बसलेल्या वृध्दाला दगड व काचेची बाटली फेकून मारून ठार मारण्याची धमकी देणाऱ्या दोघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुदेश नागनाथ उपळकर (वय ५९, रा. पीएमसी कॉलनी, गोखले नगर, पुणे सध्या रा. सैनिक बिल्डींग, संतोष नगर, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन परमेश्वर चंद्रकांत माने, राज रेवण खांडेकर (दोघे रा. बाळे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ जून रोजी दुपारी सुदेश उपळकर हे त्यांच्या संतोष नगर येथील स्वत:च्या घराच्या खाली असलेल्या गाळ्यात बसलेले होते. त्यावेळी परमेश्वर माने व राज खांडेकर हे दोघे आले व त्यांनी उपळकर यांना शिवीगाळ करून गाळ्यातील दगड व काचेची बाटली फेकून मारून उपळकर यांना ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# हिंदूसाम्राज्य दिनानिमित्त आजपासून विविध कार्यक्रम

## प्रबोधनातून होणार जागर : शिवस्मारक मंडळातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळातर्फे हिंदूसाम्राज्य दिनानिमित्त म्हणजेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त चार दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिवस्मारकतर्फे दरवर्षी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला हिंदूसाम्राज्य दिन सोहळा साजरा केला जात आहे. यंदा रविवार, ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापुरातील इंडियन मॉडेल स्कूलच्या सभागृहात शिवचरित्र अभ्यासक मोहन शेटे (पुणे) यांचे व्याख्यान होणार आहे. सोमवार ९ जून रोजी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीनिमित्त सकाळी ८.३० वाजता नवी पेठ येथील शिवस्मारकमध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती मूर्तीस मल्यार्पण करण्यात येणार आहे.

मंगळवार, १० जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात सुप्रसिद्ध गायक अवधूत गांधी आणि सहकलाकारांचा भक्ती शक्ती संगम हा शिवगीतांचा बहारदार संगीतमय कार्यक्रम सादर होणार आहे. शिवस्मारकच्या श्री हिंदूसाम्राज्य दिन सोहळ्याअंतर्गत बुधवार ११ जून रोजी सायंकाळी ६ वाजता वालचंद महाविद्यालयाजवळील चिप्पा मार्केटशेजारी असलेल्या लोटस फंक्शन हॉलमध्ये अप्पाला प्रसादराव (भाग्यनगर, आंध्र प्रदेश) यांचे तेलगू भाषेतून व्याख्यान होणार आहे. या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, संचालक देवानंद चिलवंत, प्रसाद जिरांकलगीकर, संचालिका माधवी कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर उपस्थित होते.

### सोलापूरकरांची संपणार प्रतीक्षा

प्रख्यात गायक अवधूत गांधी यांचा भक्ती शक्ती संगम हा शिवगीतांचा राज्यभर अतिशय लोकप्रिय असलेला कार्यक्रम सोलापुरात व्हावा, अशी सोलापुरातील शिवभक्तांची इच्छा होती. त्यामुळे शिवस्मारकतर्फे आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे सोलापूरकरांची प्रतीक्षा संपणार असून सोलापूरकरांना सांगीतिक मेजवानी मिळणार आहे, असे शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी सांगितले.

# कारहुणवीनिमित्त मंगळवारी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

कसबा गणपती शेतकरी संघटनेच्या वतीने कारहुणवीनिमित्त मंगळवार दि. १० जून रोजी सायंकाळी ६ वाजता मिरवणूक काढण्यात येणार आहे तसेच कृषी पुरस्काराने शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष सिद्धाराम गुंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निमित्ताने मंगळवारी सायंकाळी ६ वाजता बाळीवेस येथील श्री कसबा गणपती मंदिर येथे कृषी पुरस्काराने मान्यवर शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यावर्षी गंगाधर बिराजदार (निंबर्गी), राम मुळे (निलेगाव, तुळजापूर), बिरप्पा कांबळे यांचा कृषी पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे शाल स्मृतिचिन्ह शाल , हार,श्रीफळ व फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे उपस्थित राहणार आहेत. यावेळी कृषी विभागाचे जिल्हाध्यक्ष शुक्राचार्य भोसले, श्री सिद्धेश्वर यात्रेचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू, ॲड. मिलिंद थोबडे, कसबा गणपती ट्रस्टी अध्यक्ष सोमनाथ भोगडे, उपाध्यक्ष प्रकाश वाले, मल्लिनाथ मसरे, महेश थोबडे, सोमनाथ मेंगाणे, प्रथमेश कोठे, बाळासाहेब मुस्तारे, विजयकुमार बरबडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यानंतर मंदिर येथूनच मिरवणूक काढण्यात येणार आहे. कसबा गणपती मंदिर, टिळक चौक, होटगी मठबोळ, मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस, चाटी गल्ली, मंगळवार पेठ पोलिस चौकी, शिवानुभव मंगल कार्यालय, कुंभार वेस, वारद बोळ, सराफ कट्टा ,मधला मारुती, शुक्रवार पेठ, कसबा पोलीस चौकी, दत्त चौक, महालक्ष्मी डेअरी, मसरे गल्ली ते कसबा गणपती मंदिर येथे मिरवणूक विसर्जन करण्यात येणार आहे. यावेळी विनायक शरणार्थी, केदार कुदाटे, केदार मेंगाणे, धनेश हिरेहब्बू, अनिल मसरे, नागनाथ मेंगाणे, आप्पासाहेब कुताटे, योगेश हदरे, पुष्कराज मेत्री, गुरूशांत मोकाशी आदी उपस्थित होते.

# मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथे रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

मौलाना आझाद पॉलिटेक्निक व किर्लोसकर ऑईल इंजिन लिमिटेड, कोल्हापूर यांच्या संयुक्त विधमाने मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथे सामाजिक दायित्वाची भावना ठेवून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होत.



रोजगार मेळावा या कार्यक्रमास मौलाना आझाद पॉलिटेक्निक कॉलेजचे प्रार्चाय, डॉ. सर्फराज शेख अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून किर्लोसकर ऑईल इंजिन लिमिटेड, कोल्हापूरचे उमेश कुंभार, अभिषेक तालुकदार, पंकज पुंनाळकर, अमित पिसाळ, सुभम बन्ने यांची उपस्थिती लाभली. होटगी येथील मौलाना आझाद पॉलिटेक्निक मधील इमारतीत संपन्न झालेल्या या रोजगार मेळाव्यात कोल्हापूर, सांगली, सातारा,पुणे, सोलापूर जिल्हात टॉपची कंपनी म्हणून नावाजलेली कंपनी किर्लोसकर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरूवात सर्व प्रमुख पाहुणे यांचे सत्कार प्राचार्य डॉ. सर्फराज शेख यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व बुके देऊन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सर्फराज यांनी केले. मेळाव्यासाठी १२५ उमेदवारीची ऑनलाईन नोंदणी झाली होती. नोंदणी झालेल्या उमेदवाऱ्याचे किर्लोसकर ऑईल इंजिन लिमिटेड, कोल्हापूर आस्थापनांच्यावतीने मुलाखती घेण्यात आल्या. ज्या-ज्या उमेदवारीची निवड होईल त्यांना कंपनी व्दारे कॉललेटर ईमेल व्दारे दिले जाईल असे मौलाना आझाद पॉलिटेक्निक कॉलेजचे रोजगार सल्लागार प्राध्यापक, निसार शेख यांना सांगितले. सूत्रसंचालन व आभार प्रा. खरादी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी रोजगार सल्लागार निसार शेख, शब्बीर पटेल, किरण जमादार, निता वाघमारे, आरती काळे यांनी परीश्रम घेतले.



# ‘सेंट जोसेफ’चे माजी विद्यार्थी २५ वर्षानंतर एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

येथील सेंट जोसेफ हायस्कूलच्या २००० च्या दहावी वर्गातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा पार पडला. यावेळी देशाच्या विविध भागात आणि परदेशात स्थायिक झालेले ५५ माजी विद्यार्थी उपस्थित होते. २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेत जाऊन त्यावेळच्या मित्र-मैत्रिणींबरोबर आठवणी जागवतांना सर्वांचा उत्साह दुणावला.

यामध्ये प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंता, शिक्षक, उद्योजक म्हणून हे माजी विद्यार्थी योगदान देत आहेत. हायस्कूलने १२५ वर्षे पूर्ण केली आहेत. यावेळी शालेय बुलेटिनचे प्रकाशन प्राचार्य फादर प्रदीप गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी फादर विल्फ्रेड फर्नांडिस उपस्थित होते. या तुकडीतील हायस्कूलचे माजी विद्यार्थी सलमानताज पटेल (आयपीएस) यांचा उत्तर प्रदेश केडरमध्ये समावेश झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. ते सध्या हैदराबादच्या सेंट्रल डिटेक्टीव्ह ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. आयोजन समितीचे सदस्य सचिन कोठारी, प्रा. डॉ. रोझा चंदेले, डॉ. शिफा पठाण, विद्या ढोले, विपुल बंकापुरे, सुरज गुनगे, डॉ. निहार बुरटे, नीरज शालगर, डॉ.प्राजक्ता शितोळे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी शाळेला शालेय क्रीडा साहित्य आणि विविध प्रकारचे झाडे भेट दिली.



# सार्वजनिक खासगी भागीदारी धोरणाच्या यशस्वीतेसाठी उद्योजकांनी पुढाकार घ्यावा

## मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे आवाहन ; सोलापुरातील उद्योजकांसोबत घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

राज्यातील सरकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे परिवर्तन करण्यासाठी शासनाने सार्वजनिक खासगी भागीदारी धोरण आणले आहे. या धोरणाच्या यशस्वीतेसाठी उद्योजकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

सोलापुरातील उद्योजकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आणि राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे धोरण सांगण्यासाठी मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शुक्रवारी दौऱ्यादरम्यान नियोजन भवन येथे उद्योजकांसमवेत बैठक घेतली. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार देवेंद्र कोठे, भाजपच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, विनायक झोटे , चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, उद्योजक वासुदेव बंग, केतन शहा, माधव देशपांडे, पेंटप्पा गड्डम उपस्थित होते.

शासनाच्या धोरणाचा अधिक चांगल्या प्रकारे अवलंब करण्यासाठी आणि उद्योजकांच्या सोयीसाठी खाजगी आयटीआयलाही मान्यता देण्यात येणार आहे, असेही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. अनेक उद्योजकांनी कुशल मनुष्यबळ निर्मिती आणि रोजगार निर्मिती विषयक मागण्या आणि सूचना मांडल्या. सोलापुरातील उद्योजकांच्या शंकांचे निरसनही यावेळी मंत्री लोढा यांनी केले.

### आयटीआयला आयआयटीप्रमाणे गुणवत्तापूर्ण बनविणार

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) आयआयटीप्रमाणे गुणवत्तापूर्ण बनवण्याचे शासनाचे धोरण आहे, असे विनायक झोटे यांनी सांगताच उपस्थित उद्योजक आणि सोलापूरकरांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रतिसाद दिला.

# नवोदय विद्यालय प्रवेशासाठी २९ जुलै पर्यंत करण्याचे अर्ज करा

## जिल्ह्यात ८० जागा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

नवोदय विद्यालय समितीने जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या जागांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. शैक्षणिक सत्र २०२६-२७ च्या जागांसाठी ही अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक मुलांचे पालक २९ जुलैपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. नवोदयच्या सहावीच्या जागांसाठी प्रवेश परीक्षेच्या आधारे केला जातो.

जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या जागांसाठी प्रवेशासाठी इच्छुक मुलांच्या पालकांना ऑनलाइन अर्ज करावा लागेल. अर्ज ऑनलाइन cbseitms.rcil.gov.in या अधिकृत वेबसाइटवर करता येईल. प्रवेशासाठी परीक्षेचा पहिला टप्पा १३ डिसेंबर २०२५ रोजी प्रस्तावित आहे, तर दुसरा टप्पा ११ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येईल. जवाहर नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ६ वी मध्ये १० ते १२ वर्षे वयोगटातील मुलेच इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. नवोदय विद्यालयाच्या इयत्ता ६ वी मध्ये प्रवेशासाठी इतर पात्रता निकष देखील विहित केलेले आहेत. संबधित विद्यार्थ्याने ज्या जिल्ह्यातील शाळेतून पाचवी उत्तीर्ण झाला असेल, त्याच जिल्ह्यातील जवाहर नवोदय विद्यालयाच्या सहावीच्या वर्गात त्याला प्रवेशासाठी अर्ज करता येईल. अर्ज करण्यासाठी पासपोर्ट आकाराचा फोटो, मुलाची स्वाक्षरी, आधार कार्ड, निवास प्रमाणपत्र, इयत्ता पाचवीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. प्रत्येक जवाहर नवोदय शाळेत इयत्ता सहावीसाठी ८० जागा आहेत.

### नवोदय विद्यालयात निवड होण्यासाठी तीन वर्षाची तयारी

जवाहर नवोदय विद्यालयात निवड झालेले विद्यार्थी बुध्दीमान असतात. शासनाच्या शिष्यवृत्तीमधून सहावीत निवड झाल्यानंतर सर्व शिक्षण दर्जेदार असते. शिवाय भविष्यात नोकरीची शाश्वती म्हणून नवोदय विद्यालयाला प्राधान्य देण्यात येते. त्यामुळे नवोदय विद्यालयात निवड होण्यासाठी तिसरी पासून तीन ते चार वर्षे तयारी करण्यात येते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# देशाची भरभराट होवो, शांतता आबाधित राहो

## बार्शीत ईद-ऊल-अज़हा उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जून-**

देशाची भरभराट होवो, शांतता व सामाजिक सौहार्द आबाधित राहो, अशा प्रार्थनेने बार्शीत मलिक ईदगाह येथे मौलाना इरफान कादरी तर हजरत निजामुद्दीन ईदगाह येथे मौलाना मुफ्ती सलामत खतिब यांच्या नेतृत्वात सामूहिक नमाज पठण करण्यात आले.

शनिवारी बार्शीत नमाज पठणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने बार्शी शहर व जवळपासच्या परिसरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील मुख्य ऐतिहासिक नाईकवाडी ईदगाह येथे परंपरेनुसार सुरवातीला नाईकवाडी परिवाराकडून वसीम नाईकवाडी यांच्या हस्ते इमाम व खतिब मौलाना अन्वारुल हक यांचे पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर सामूहिक नमाज पठण करण्यात आली.

नमाज पठणानंतर समाज बांधवांकडून एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. राजकीयसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. ईद साजरी होण्यासाठी तहसीलदार एफ.आर. शेख, नगरपरिषद मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी मोलाचे सहकार्य केले. डी.वाय.एस.पी.जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, ए.पी.आय. ढेरे, जाधव, कुंजीर यांच्यासह सर्व पोलीस स्टाफने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी चोख बंदोबस्त ठेवला होता. नाईकवाडी परिवाराच्यावतीने ईदगाह मुतवली हाजी शफिकभाई नाईकवाडी तसेच फारुक नाईकवाडी, तौफिक नाईकवाडी, वसीम नाईकवाडी, नदीम नाईकवाडी, प्राचार्य अब्दुलरहेमान शेख, प्रसिद्ध उद्योजक इकबाल पटेल, सामाजिक कार्यकर्ते, इम्तियाज तांबोळी, आदम तांबोळी यांनी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यकर्ते समीर वळसंगकर यांनी आभार मानले.



# शेटफळच्या लेझीम संघाचा रायगडावरील सोहळ्यात सन्मान

## युवराज संभाजी छत्रपती महाराज व महाराणी संयोगीताराजे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ जून-**

दुर्गराज रायगडावर झालेल्या ३५१ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात शेटफळ (ता. करमाळा) येथील नागनाथ लेझीम संघाने सहभागी होऊन उत्कृष्ट लेझीम सादरीकरण केल्याबद्दल या लेझीम संघाला सन्मानचिन्ह देऊन युवराज संभाजी छत्रपती महाराज व महाराणी संयोगीताराजे महाराज यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.

शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील प्राचीन कला संस्कृती जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या विविध लोककलावंत कलाकार शाहीर, गोंधळी, वासुदेव आपापली कला सादर करतात. शेटफळ येथील नागनाथ लेझीम संघाने प्राचीन लेझीम कला जतन केली असून पारंपारिक हलगीच्या ठेक्यावर होत असलेल्या या लेझीम कलेचे सर्वत्र कौतुक केले जाते. शेटफळकरांनी जपलेली पुरातन लेझीम परंपरा कला पाहून युवराज संभाजीराजांनी कौतुक करत भर पावसात या पथकातील तरुणांबरोबर लेझीमचा ठेका धरला. गावातील २०० सदस्य असलेला हा लेझीम संघ रायगड शिवराज्याभिषेक सोहळ्याला जाण्यापूर्वी पंधरा ते वीस दिवस दररोज संध्याकाळी सराव करत होता. यावर्षीही १२५ जणांनी शिवराज्याभिषेक सोहळ्यात लेझीम सादरीकरणात सहभाग नोंदविला. राज्याभिषेक सोहळ्यानंतर होळीच्या माळावर युवराज संभाजी राजे व प्रमुख मान्यवरांसमोर भर पावसात लेझीम संघाने उत्कृष्ट सादरीकरण केले .या सादरीकरणाबद्दल या संघाला गौरवण्यात आले. या लेझीम पथकातील तरुणांनी केवळ लेझीमचे सादरीकरण केले नाही तर या ठिकाणी दोन दिवस स्वयंसेवक म्हणून किल्ल्यावर येणाऱ्या शिवभक्तांची गर्दी नियंत्रणाचे स्वयंसेवक म्हणून काम पाहिले. कचरा, प्लॅस्टिक याची स्वच्छता केली. संघाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



# बार्शीतील अपहरण झालेल्या मुलींचा लागला शोध; दोन संशयितांना अटक

## पाचच तासात पोलिसांनी लावला छडा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ जून-**

बार्शी शहरातून दोन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याच्या घटनेनंतर बार्शी शहर पोलिसांनी अवघ्या पाच तासांत मुलींसह दोन संशयितांना ताब्यात घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे. लातूर बसस्थानक परिसरातून दोन मुली आणि एका संशयित तरुणाला, तसेच बार्शीतून अन्य संशयिताला ताब्यात घेण्यात आले.

बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस. डी. जगताप यांच्या नेतृत्वाखाली सुरु होता. दि.३ जून रोजी येथील वसतिगृहातून दोन मुली क्लासच्या बहाण्याने बेपत्ता झाल्या होत्या. तपासादरम्यान, पोलिसांनी लातूर बसस्थानक परिसरातून मुलींसह एका संशयिताला, तसेच बार्शीतून एका संशयिताला ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे सुमित लालासाहेब लोमटे (वय २१, रा. घारगाव, ता. परांडा) आणि नितीन हरिदास मोरे (वय १९, रा. घारगाव, ता. परांडा) अशी आहेत.

या दोघांना कोर्टापुढे हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली. अपहृत मुलींना सोलापूर येथील सुधारगृहात पाठवण्यात आले आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. बी. खराडे, पोलीस अविनाश पवार व राहुल उदार आणि कसबे यांच्या पथकाने ही जलद कारवाई केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, पोलिसांनी पुढील तपास सुरु ठेवला आहे. नागरिकांना कोणतीही माहिती असल्यास बार्शी शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.




# सहकार महर्षि कारखान्याच्या वतीने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ जून-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये जागतिक पर्यावरण दिन ५ जून रोजी साजरा करण्यात आला. कारखान्याच्या वतीने कारखाना परिसर व विभागीय कार्यालय, कामगार कॉलनी येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे नियोजन केले आहे.

सहकार महर्षि कारखान्याने कारखाना परिसर, विभागीय कार्यालय व कामगार कॉलणी येथे विविध जातीची दोन हजार झाडांची लागवड करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती कार्यकारी संचालक राजेंद्र केरबा चौगुले यांनी दिली.

कार्यक्रमप्रसंगी वाय.बी. इनामदार, एस. के. गोडसे, एस.एन. जाधव, डी.व्ही. रणवरे, वाय. के. निंबाळकर, एस. ए. शेखर, एस.एम. देशमुख, आर. एस. चव्हाण, एस.जे. नरसाळे, पी.एच. इनामदार, एस. एम. साळुंखे, आर. एस. गायकवाड, व्ही. आर. वाघ, एन.सी. निंबाळकर, एम.एम. भेगडे, आर.डी. रणनवरे उपस्थित होते.

# माळीनगर येथे कृषी संकल्प अभियानांतर्गत परिसंवाद

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ७ जून-**

विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत ऊस पिकावर चर्चासत्र, प्रशिक्षण यावर माळीनगर येथील सासवड माळी शुगर फॅक्टरी आणि शुगरकेन सहकारी सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने कारखान्याच्या गोल्डन जुबिली हॉलमध्ये परिसंवादाचे आयोजन केले होते.

खरीप हंगाम पूर्व नियोजन प्रसारासाठी दि. २९ मे ते १२ जून २५ या दरम्यान सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शासनाच्या वतीने विकसित कृषी संकल्प अभियान राबवले जात आहे. अभियानाच्या नवव्या दिवशी माळीनगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी संशोधन विस्ताराचे कार्य महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत शासनाचे कृषी विज्ञान केंद्र मोहोळ, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. उपस्थित शेतकऱ्यांना ऊस लागवडीचे अर्थशास्त्र, बेणे निवडून प्रक्रिया व व्यवस्थापनावर डॉ. गणेश पवार यांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय भरड धान्य संशोधन सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. परशुराम पात्रोटी यांनी भरड धान्याच्या उत्पादनातून शाश्वत शेती व आरोग्याकडे वाटचाल करावी असे आवाहन केले. डॉ. शिल्पा परशुराम यांनी डाळिंब पिकातील तेल्या रोग व मर यावर माहिती दिली. अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विषयाचे दिनेश क्षीरसागर यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना या विषयावर मार्गदर्शन केले. पीक संरक्षणावर पंकज मंडवी, नॅनो युरिया, डीएपी, पाणी परीक्षणावर कृषी रसायनशास्त्राच्या श्रीमती काजल जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी तालुका सहाय्य कृषी अधिकारी सारिका एकतपुरे, भगवान शिंदे, इफको कंपनीचे धाईंजे, माळशिरस आत्माचे रेश्मा क्षीरसागर, सुरज फुले, साखर कारखान्याचे पूर्णवेळ संचालक गणेश इनामके, उपाध्यक्ष निखिल कुदळे, शुगरकेन सोसायटीचे उपाध्यक्ष कपिल भोंगळे, अनिल गिरमे, विराज कुदळे, नामदेव आगम, सुयोग ठाकरे उपस्थित होते.

# पंढरी ते घुमान सायकल यात्रेसाठी राज्य समन्वयक नियुक्त

## पाच हजार किलोमीटरचा असणार प्रवास; ११ सल्लागारांचीही निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ जून-**

पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमिटी श्री क्षेत्र घुमाण ( पंजाब ) व देशभरातील समस्त नामदेव शिंपी समाजाच्या वतीने काढण्यात येणाऱ्या संत शिरोमणी श्री नामदेवजी महाराज रथ व सायकल यात्रेच्या नऊ राज्य समन्वयक व अकरा सल्लागार पदाच्या नियुक्त्या आज शनिवारी दि.७ जून रोजी जाहीर करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य समन्वयकपदी पंढरपूरचे गणेश उंडाळे यांची नियुक्ती करण्यात आली.

१२ व्या शतकात संत ज्ञानेश्वर व संत नामदेव महाराज यांनी भारत भ्रमण करुन श्री विठ्ठल भक्तीचा व भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला. हे संतांचे विचार देशभर पोहोचविण्यासाठी शांती, समता व बंधुता हे ब्रीद वाक्य उराशी बाळगून पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमिटी व देशभरातील समस्त नामदेव शिंपी समाजाच्या वतीने संत शिरोमणी श्री नामदेवजी महाराज रथ व सायकल यात्रा समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मारवाड, हरियाणा, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश राज्यांसाठी राज्य समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली. तर गेल्या तीन वर्षात राज्याच्या विविध भागातून सायकल यात्रेत सहभागी होणाऱ्या अकरा सायकल यात्रींची सल्लागार समिती नेमण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य समन्वयकपदी गणेश उंडाळे (पंढरपूर), गुजरात राज्य समन्वयकपदी मुलचंद परमार (अहमदाबाद), राजस्थान राज्य समन्वयकपदी खेमराज नामा (तखतगड), मारवाड प्रांत समन्वयकपदी सीताराम टांक ( बारसाधाम - पाली), हरियाणा राज्य समन्वयकपदी ॲड. हरपालसिंग (हिसार), पंजाब राज्य समन्वयकपदी सरबजितसिंग बावा (घुमाण), दिल्ली राज्य समन्वयकपदी महेंद्र लड्डा (दिल्ली), उत्तर प्रदेश राज्य समन्वयकपदी किशनसिंह नामा राजपूत (मथुरा) व मध्यप्रदेश राज्य समन्वयकपदी अरुण नामदेव (भोपाळ) यांची नियुक्ती करण्यात आली. सन २०२२ पासून पाच हजार किलोमीटरच्या संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेत सहभागी होणाऱ्या व या यात्रेत नव्याने सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सायकल यात्रींच्या अडीअडचणी समजून घेवून त्या सोडविण्यासाठी राज्यस्तरीय सल्लागार समिती नियुक्त करण्यात आली. यामध्ये सतीश जाधव (मुंबई), दिलीप वरकड (नागपूर), डॉ. सुभाष कोकणे (पुणे), संदीप कालेकर (पुणे ), आनंद कन्सल (पुणे), श्रीमती हेमलता राव (पुणे), डॉ. राजगोपाल खंडेलवाल (फलटण), प्रमोद जवंजाळ ( कुर्डुवाडी), रविकिरण आवळे (चिपळूण), सुधाकर सोनवणे (नाशिक) व अनिल सूर्यवंशी (धाराशिव) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बैठकीस समितीचे उपाध्यक्ष शंकर टेमघरे, सुभाष भांबुरे, सचिव ॲड विलास काटे, खजिनदार मनोज मांढरे, विश्वस्थ राजेंद्रकृष्ण कापसे, राजेंद्र मारणे आदी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी वैद्यकीय कक्षाच्या कार्याध्यक्षपदी प्रिती घाडगे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ दि. ७ जून-**

रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष सबंध महाराष्ट्र भर कार्यरत आहे व अत्यंत प्रभावीपणे वैद्यकीय क्षेत्रातील रुणांना केलेल्या मदत कार्याची दखल घेत दुसऱ्यांदा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष सोलापूर जिल्हा कार्याध्यक्षपदी प्रिती घाडगे यांची निवड करण्यात आली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या निर्देशानुसार कक्षाचे राज्य प्रमुख जितेंद्र सातव, राज्य संपर्क प्रमुख सचिन सरवदे यांनी दुसऱ्यांदा अधिकृत नियुक्ती पत्र व ओळखपत्र देऊन निवड केली. प्रीती घाडगे या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष निर्मित्ती पासून सोलापूर जिल्हयांच्या कार्याध्यक्ष पदावर कार्यरत आहेत.

# भारतीय वनसेवा अधिकारीपदी शरद करे

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.७ जून-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील शरद सोमा करे यांची पदोन्नतीने भारतीय वनसेवा अधिकारीपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सन २००९ मध्ये त्यांची सहहयाक वनसंरक्षक या पदावर निवड झाली होती.त्यांनी २००९ ते २०११ या कालावधीत कोईमतुर येथील केंद्रीय अकादमी राज्य वनसेवा याठिकाणी सहहयाक वनसंरक्षक या पदासाठी प्रशिक्षण पुर्ण केले.प्रशिक्षणानंतर शिंदेवाडी याठिकाणी उपविभागीय वन अधिकारी या ठिकाणी परिविक्षाधीन कालावधी पुर्ण केला. त्यांनी सहहयाक वनसंरक्षक म्हणून वर्धा वनविभाग याठिकाणी काम केले .त्यांनंतर नागपूर येथील पेंच व्याघ्र प्रकल्प याठिकाणी काही दिवस काम केले. त्यानंतर ऑगस्ट २०१६ मध्ये विभागीय वन अधिकारी या पदावर पदोन्नती होऊन प्रधान मूख्य वनसंरक्षक कार्यालय वनभवन नागपूर येथे विभागीय वनाधिकारी रोजगार हमी योजना या पदावर त्यांची पदस्थापना झाली. त्यानंतर विभागीय वनाधिकारी सामाजिक वनीकरण अमरावती याठिकाणी काम केले.ते सध्या विभागीय वनाधिकारी सामाजिक वनीकरण अमरावती याठिकाणी कार्यरत आहेत. त्यांना ॲड. लक्ष्मण करे, नामदेव करे, कैलास करे, श्रीमंत करे यांचे मार्गदर्शन लाभले.



## महत्वाचे...




# सह्याद्री संस्थेत पर्यावरण व शिवस्वराज्याभिषेक दिन कार्यक्रम

**करकंब, दि. ७ जून-**

करकंब येथील सह्याद्री औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जागतिक पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक सोहळा दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते कवी व पत्रकार लक्ष्मण जाधव यांनी शिवराज्याभिषेक सोहळ्याबाबत माहिती देऊन आपल्या कवितांमधून पर्यावरणाचे महत्त्व विशद केले. यावेळी अभिछाया प्रतिष्ठानच्या सचिवा सुरेखा शेळके, प्रा. किसन सलगर, मुख्याध्यापिका राणी गोडसे आदिसह शिक्षकवृंद उपस्थित होते. सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला दिलेला संदेश चित्रफितीद्वारे दाखविण्यात आला. आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या तंत्रज्ञान उपकरणांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्रा. सलगर यांनी छत्रपती शिवरायांचे कार्य व शिवराज्याभिषेक सोहळ्याबाबत विचार मांडले. सचिवा शेळके यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक बापू जाधव, सूत्रसंचालन अश्विनी जाधव, सचिन टकले यांनी केले तर आभार महेश भोसले यांनी मानले.




# 'स्वराज्य'च्या जिल्हा प्रभारीपदी इफ्तेकार कामतीकर यांची निवड

**अक्कलकोट, दि. ७ जून-**

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेच्या सोलापूर जिल्हा प्रभारीपदी येथील आडत व्यापारी इफ्तेकार कामतीकर यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्षपदी येथील चंद्रकांत वेदपाठक तसेच सोलापूर शहर अध्यक्षपदी विनोद भोसले यांची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक कांबळे व महासचिव कमलेश शेवाळे यांनी स्वराज्यच्या चौथ्या वर्धापन कार्यक्रमात निवड केली. यावेळी प्रदेशाध्यक्षा धनश्री उत्पात, विश्वस्त संगीता बोराडे, सविता तावरे, उमेश काशीकर, प्रशांत निकम, संचालक सुरेखा कोकरे, रविंद्र करंगुटकर, विशाल बोराडे, संदिप जाधव, वैशाली कांबळे, माजी समन्वयक सुनील पंडित, इम्तियाज बागवान, सुनील बेंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवडीचे स्वराज्यचे पदाधिकारी प्रकाश चव्हाण, सत्तू भोसले, दत्तात्रय दळवी, वैशाली गोरे, स्मिता पाठक, गुरुनाथ पोतदार, दिपक पोतदार, मीराबाई बुद्रुक, पंकज कोरेकर, काशिनाथ पोतदार, वर्षा चव्हाण, गौरीशंकर चनशेट्टी, दयानंद बिडवे, बलभीम पवार, शिवलिंगप्पा संगापुरे, अप्पासाहेब धुमाळ आदींनी अभिनंदन केले आहे.



# वटवृक्ष मंदिरात गुणवंत विद्यार्थिनी सेजल जाधव हिचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ७ जून-**

एसएससी बोर्ड परीक्षेत आई-वडिलांचे मार्गदर्शन व श्री स्वामी समर्थांचे आशीर्वाद मोलाचे ठरले असल्याचे मनोगत मार्च २०२५ मध्ये पुणे बोर्डाच्या वतीने घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेतील तालुक्यातून तृतीय क्रमांकाने व आयएमएस शाळेतून ९८.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली गुणवंत विद्यार्थिनी सेजल जाधव हिने व्यक्त केले. सेजल जाधवच्या या उज्वल याच्याबद्दल येथील वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी सेजल जाधव, तिचे आई वडील अर्चना जाधव, संतोष जाधव यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संतोष जाधव, अर्चना जाधव, समर्थ जाधव व कुटुंबीय, श्रीशैल गवंडी, संजय पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

# पिलीवला आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर पावसाची जोरदार हजेरी

**पिलीव, दि. ७ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा जोरदार हजेरी लावली. विशेषतः पिलीव भागात आज सकाळी अकरा वाजल्यापासूनच पावसाने जोरदार हजेरी लावली. यामुळे बळीराजा चांगलाच सुखावला आहे. पावसाने आठ दिवस उघडीप दिल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी मका, बाजरीची पेरणी केली आहे. ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही त्यांना पेरणी करण्यासाठी याचा फायदा होणार आहे. खरेतर यंदा मे महीन्यातच पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे शेतकरी चांगलाच सुखावला आहे. यामुळे यंदा अगदी पावसाळयाच्या सुरुवातीला चांगला पाऊस पडत असल्याने खरीप, रब्बी हंगाम चांगला व वेळेवर होईल असे आशादायक चित्र आहे. दुष्काळी पट्ट्यातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, पठाणवस्ती, गारवाड, मगरवाडी या भागातील शेतकरी चांगलाच सुखावला आहे. कारण या भागात शेतीपेक्षा पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई वर्षानुवर्षे आहे. परंतु यंदाच्या मे महीन्यातील पावसामुळे याच दुष्काळी गावातील ओढे, नाले कित्येक वर्षानंतर वाहीले आहेत. तसेच बंधारे, तलाव, तळी भरली आहेत. यामुळे पिलीव परीसरातील शेतकरी चांगलाच सुखावला आहे.

CMYK

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पिलीवच्या ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण

**पिलीव, दि. ७ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील ईदगाह मैदानावर जामा मशीदच्या पुढाकाराने बकरी ईद निमित्त सामूहिक नमाज पठण करण्यात आले. यावेळी मौलाना मुजमिल तांबोळी यांनी बकरी ईदचे महत्त्व पटवून देऊन नमाजाचे महत्त्व सांगितले.

यामध्ये जामा मशीद, बस स्टँड वरील मदरसा मशीद, सारवान गल्लीतील अलहुसैनी मशीदीच्या वतीनेही सामूहिक नमाजीमध्ये सहभाग नोंदविला. यावेळी जामा मशिदीचे अध्यक्ष मेहबूब मुलाणी, सचिव नजीर मुलाणी, सदस्य सलीम मुलाणी, शुक्कूर मुलाणी, अब्दुलरहीम मुलाणी, अजिज मुलाणी, अल्ताफ मुलाणी, आरिफखान पठाण, मुजमिल तांबोळी, अमिनखान पठाण, बाबा सय्यद , सलीम मुलाणी, अमीर मुलांणी, जामा मशीद, आंधळकर चौक, मदरसा मशिद बसस्थानक व सारवान गल्ली मशीद यांच्या संयुक्त विद्यमाने बकरी ईद निमित्त ईदगाह मैदानावर आयोजित सामूहिक नमाज पठण व नमाज आदाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी सर्व मुस्लिम बांधव मुस्लिम युवक व तिन्ही मशिदीतील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

यावेळी पिलीव पोलीस स्टेशनचे हवालदार पंडित मिसाळ, हवालदार स्वरूप शिंदे, पोलीस नाईक सतिश धुमाळ व अमीत जाधव यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

### महत्वाचे...



## शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिषेक व पुष्पहार अर्पण

**अकलूज, दि. ७ जून-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक सोहळ्या निमित्त शिवपार्वती मंदिर शंकरनगर येथील शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यास युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सोहळा साजरा झाला. महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती शंकरनगर अकलूज यांच्यावतीने हा सोहळा आयोजित केला होता. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, ऋतुजादेवी मोहिते पाटील, कृष्णप्रिया मोहिते पाटील, राजइंदिरा मोहिते-पाटील, व्हाईस चेअरमन शंकरराव माने देशमुख, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे उपस्थित होते. यावेळी रयतेचा राजा, राजा शिवछत्रपती या महानाट्याची चित्रफित प्रसारित करण्यात आली. यात्रा समितीच्या वतीने व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख यांच्या हस्ते उपस्थितांचा सत्कार करण्यात आला.



## पिलीव भाजपच्यावतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान

**पिलीव, दि. ७ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील भाजपच्या वतीने म ाळशिरस तालुका मंडल अध्यक्षपदी माजी सरपंच नितीन मोहीते यांची निवड झाल्याबद्दल व पिलीव भाजपा शहराध्यक्षपदी प्रमोद भैस यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी व श्री महालक्ष्मी ग्रामविकास पॅनलच्या वतीने सन्मान करण्यात आला. या सत्कारावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, सत्यजित गलांडे, महादेव जरग, प्रविण वाघमारे, अतुल नष्टे, सिताराम बोडरे, राहुल भैस, अंकुश भैस, निलेश पिसे, संकेत देशमुख, प्रदीप चोबे, हनुमंत सुळे, फिरोज शेख, सोमनाथ बोडरे, संतोष भंडलकर, संदीप चोबे, दिगंबर भैस, राजु बोडरे, मयुर भैस, बालम जमादार, प्रविण माने, अभिजित पिसे, संतोष करडे , सुरज वाघमारे, योगेश देशमुख उपस्थित होते.

## मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांच्या सेवानिवृत्तीला जमा झाल्या हजार वह्या

**माढा, दि. ७ जून-**

माढा तालुक्यातील भैरवनाथ विद्यालय आलेगाव(बु.) येथे कार्यरत असलेले मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख हे नियत वयोम ानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा वेणेगाव येथील गणेश मंगल कार्यालयात पुणे शहर अप्पर पोलीस आयुक्त शंकर खटके, माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, युवा नेते रावसाहेब देशमुख, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन तात्यासाहेब पाटील, भाजपा ग्रीकॉस किसान मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजाभाऊ खटके, सचिन देशमुख, सरपंच यशवंत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमात उपस्थितांनी मुख्याध्यापक देशमुख यांना इतर कोणतीही भेट न देता वह्या व शैक्षणिक साहित्य भेट दिले. यावेळी एकूण एक हजार वह्या जमा झाल्या. या जमा झालेल्या वह्या गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमात उपस्थित असलेल्यांचा बुके भेट देऊन सन्मान न करता बुक देऊन म्हणजेच वैचारिक पुस्तके भेट देऊन सन्मान करण्यात आला. सेवानिवृत्ती निमित्त बाळासाहेब देशमुख व सुनंदा देशमुख यांचा सपत्नीक सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. अशोक खटके, भजनदास खटके, गोरख खटके, नानासाहेब ढवळे, गोरख देशमुख, गणेश केचे, शैलेश ओहोळ, महेश तळेकर, मनोज तळेकर, संदिप तळेकर, शेखर कोरके, डी. के देशमुख, संभाजी थिटे, तात्यासाहेब पाटील, मयुरेश लोंढे, प्रवीण दगडे, अतुल पाटील, सुभाष खटके, दिपक खटके ,संजय राजेघोरपडे, प्रफुल्ल ढवळे, महेश देशमुख, प्रदिप देशमुख, अविनाश देशमुख, चेतन देशमुख, रणजित देशमुख, सुहास देशमुख, क्रांतिसिंह देशमुख, उमाकांत देशम ुख, वैभव देशमुख, बालाजी जगताप, अरूण जगताप उपस्थित होते.



## मंद्रूप येथे बकरी ईद उत्साहात

**मंद्रूप, दि. ७ जून-**

मंद्रूप गावात ईद अल-अजहा अर्थात बकरी ईद मोठ्या श्रद्धा, उत्साह आणि शांततेत साजरी करण्यात आली. शनिवारी सकाळी मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली. नमाजेनंतर एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला. बकरी ईद हा मुस्लिम समाजातील एक महत्त्वाचा आणि श्रद्धेचा सण आहे. यानिमित्ताने मौलवी साहेबांनी समाजात प्रेम, बंधुभाव आणि मदतीची भावना जोपासण्याचे आवाहन केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## अरण तीर्थक्षेत्रासाठी १२७ कोटींचा विकास आराखडा सादर

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लवकरच प्रारंभ; पालकमंत्री गोरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.७ जून-**

अरण (ता. माढा) येथे संतश्रेष्ठ श्री संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी असल्याने या पवित्र तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी १२७ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.त्यास लवकरच मंत्रीमंडळाची प्रशासकीय मान्यता घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते कामाचा औपचारिक प्रारंभ करण्यात येईल अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली



याबाबत महत्वपूर्ण बैठक झाली. प्रारंभी तयार करण्यात आलेल्या शंभर कोटींच्या आराखड्यात सुधारणा करत विकासकामांमध्ये वाढ करण्यात आली असून, भक्तनिवास, रस्ते, स्वागत कमानी, मंदिर परिसराचा सौंदर्यीकरण, सभागृह आदी घटकांचा समावेश या नव्या आराखड्यात करण्यात आला आहे. पालकमंत्री गोरे यांनी या प्रस्तावाचे सादरीकरण पाहून सविस्तर माहिती घेतली. लवकरच मंत्रीमंडळाची प्रशासकीय मान्यता घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कामाचा औपचारिक प्रारंभ करण्यात येईल असे यावेळी पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

बैठकीला संत सावता महाराजांचे १७ वे वंशज हभप सावता महाराज वसेकर, हभप प्रभू महाराज माळी, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील, आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, तसेच भक्त परिवारातील आबासाहेब खारे, सोमनाथ राऊत, गणेश माळी, सिमाताई एकतपुरे यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## आता माढ्याचा पाणीपुरवठा होणार सुरळीत

### एक्स्प्रेस फिडरचे काम पूर्णत्वास

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ७ जून-**

पाणीपुरवठा योजनेचा विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी ४५ लाख रुपये निधीतून एक्सप्रेस फिडरचे काम पूर्ण झाल्याने शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याची माहिती नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, सभापती रेश्मा लंकेश्वर, शबाना बागवान, मोहिनी नेटके, नगरसेवक आजिनाथ माळी, विकास साठे, अरुण कदम, नाना साठे, शिवाजी जगदाळे, रमेश थोरात, सुधीर लंकेश्वर, मुन्ना बागवान आदी उपस्थित होते. माढा शहराला येवती जलाशयातून पाणीपुरवठा केला जातो. परंतु माढा-येवती ही पाईपलाईन जुनी व जीर्ण झाल्याने तसेच वारंवार लाईट जात असल्याने माढा शहराला होत असलेल्या पाणीपुरवठ्यामध्ये काही काळ विस्कळीतपणा येत होता. परंतु जिल्हा नियोजन समिती व सुवर्ण नगरोत्थान जिल्हास्तर योजनेतून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी ४५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यामुळे काम पूर्णत्वास गेले आहे. माढा शहरामध्ये गेल्या दोन-तीन वर्षापासून समान पाणीपुरवठा योजनेतून जवळपास



- **नगरपंचायतीने केले चौक, इमारत, मैदानांचे नामकरण**
- **माढा ग्रामीण रुग्णालयाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नावास मंजुरी.**
- **माढा-वैराग रोडलगतच्या इंदिरानगर चौकाला क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे चौक नामकरणास मंजुरी.**
- **माढा क्रीडा संकुलाला सहकार महर्षी कै.गणपतराव साठे नामकरणाला मंजुरी**

३८ इंधन विहीर तसेच प्रत्येक प्रभागात दोन ते तीन टाक्यांचे नियोजन माढा नगरपंचायतीकडून केले असल्यामुळे माढ्यात तीव्र पाणीटंचाई जाणवली नाही. तीव्र पाणी टंचाई असती तर ऐन उन्हाळ्यात माढा शहराच्या रस्त्यावर महिला घागरी घेऊन उतरल्या असत्या. परंतु काही जणांनी आमदारांना माढ्यात तीव्र पाणीटंचाई असल्याचे भासवून त्यांची दिशाभूल केली आहे. नगरपंचायतीकडून माढा शहराच्या नवीन पाणीपुरवठा पाईपलाईन योजनासाठी ५२ कोटी रुपये निधीचा प्रस्ताव शासन दरबारी मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. तो देखील मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. ही योजना मंजूर झाली तर शहराचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी मिटणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## आबासाहेब तांबवे यांना पीएच.डी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. ७ जून**

आबासो जगन्नाथ तांबवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात डॉ शशिकांत लक्ष्मण तांबे प्राचार्य बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय चळे, (ता. पंढरपूर) यांच्या मार्गदर्शनात रायगड जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थांना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास हे संशोधन कार्य पूर्ण केले आहे. या संशोधन कार्यासाठी त्यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली.



याप्रसंगी त्यांचे अभिनंदन करताना सोलापूर विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ दामा, प्रा. डॉ. हिरेमठ, प्रा. डॉ कांबळे, प्रा. डॉ. शिंदे, प्राचार्य डॉ. एस एल तांबे, प्रियांका तांबवे जगन्नाथ तांबवे, सुभाष गोफणे, सुरेश सूळ महाराज, प्रभाकर सातपुते, आण्णासो तांबवे, अनिल बंडगर, बाळदादा बंडगर, सुरेश तांबवे, राजकुमार पवार, शहाजी गोफणे,सुनिल तांबवे, पांडुरंग गोफणे, सचिन गोफणे,अभिमान गोफणे, प्रथमेश गोफणे, सत्यवान कारंडे, रजपूत, अमोल रुपनर, मल्हारी हेगडे, शिवाजी तांबवे, नामदेव तांबवे, संभाजी तांबवे उपस्थित होते.

## 'वयोश्री'योजनेचे १७ हजार ९३८ लाभार्थी

### ● ज्येष्ठ नागरीकांना पाच कोटी ३८ लाख निधीचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

राज्यातील ६५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या नागरीकाना सामान्य स्थितीत जीवन जगण्यासाठी तसेच वयोमानानुसार अपंगत्व व अशक्तपणा यासाठी उपाययोजना करण्याच्या साहीत्यासाठी एका वर्षात तीन हजार रूपये अनुदान देण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू करण्यात आली . त्यानुसार जिल्ह्यातून ३७ हजार २७४ ज्येष्ठ नागरीकांनी वयोश्री योजनेसाठी अर्ज केला आहे.

कार्यालयाकडून कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर १७ हजार ९३८ लाभार्थ्यांना महाडीबीटी दारे त्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्यात आला आहे. लाभार्थ्यांच्या खात्यात पाच कोटी ३८ लाख रुपयांच्या निधीचे थेट वाटप करण्यात आला आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ६५ वर्षांच्या पुढील राज्यातील सर्व ज्येष्ठ नागरीकांना प्रतिवर्षी वैद्यकीय साहित्यांची खरेदी करण्यासाठी तीन हजार रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा केली. त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातून ३७ हजार २७४ जणांनी जिल्हा कार्यालयाला अर्ज सादर केले आहेत. ज्यांचे परिपूर्ण अर्ज प्राप्त आहेत, अशांना अनुदान मिळाले आहे. ज्यांचे अर्ज अर्धवट आहेत, अशांच्या कागदपत्रांची पूर्तता करण्याचे काम सुरू आहे. या योजनेचा निधी हा महाडीबीटीद्वारे दिला जात असल्याने विहित माहिती संकलित केली जात आहे. सध्या येथील जिल्हा कार्यालयात ज्यांचे ईकेवायसी नाहीत, अशा लाभार्थ्यांशी संपर्क साधण्याचे काम सुरू असून आधारकार्डात झालेल्या नावातील बदल, स्पेलिंग दुरुस्ती व जन्मतारीखसह अन्य दुरुस्तीचे काम सुरू आहे. परीपूर्ण अर्ज वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून अनुदान मागणी करण्यात येत आहे.

> अर्जाची पडताळणी करून त्यांची परिपूर्ण माहिती वरिष्ठ कार्यालयाला सादर करण्यात येत असून त्यानुसार जिल्ह्यात १७ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आला आहे. वयोश्री योजनेमुळे ज्येष्ठ नागरीकांना वैद्यकीय साहीत्यांसाठी अनुदान मिळाल्याने आर्थिक सहाय होते.
>
> **- सुलोचना सोनवणे,** सहाय्यक आयुक्त

| | |
|---|---|
| **लाभार्थी संख्या** | ३७२७४ |
| **लाभ घेतलेल्यांची संख्या** | १७९३८ |
| **प्रलंबित लाभार्थी संख्या** | २७०२ |
| **एकूण वाटप अनुदान** | ५ कोटी ३८ लाख १४ हजार |
| **प्रति लाभार्थी अनुदान** | ३००० |

## विठ्ठल धाईंजे यांना अभिवादन

**श्रीपूर, दि. ७ जून-**

रिपब्लिकन पक्षाचे युवक प्रदेश उपाध्यक्ष किरण धाईंजे यांचे अकलूज येथील निवासस्थानी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंतराव कुलकर्णी यांनी भेट देवून किरण धाईंजे यांचे सात्वन केले. किरण यांचे वडील विठ्ठल धाइंजे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले आहे. याप्रसंगी पांडुरंगचे मुख्य शेती अधिकारी कुमठेकर, कम्प्युटर इंचार्ज तानाजी भोसले, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, माळशिरस तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, राजरत्न नाईकनवरे उपस्थित होते. डॉ. कुलकर्णी यांनी धाईंजे कुटुंबात झालेल्या दुखद घटनेची आस्थेने विचारपूस करुन बुध्दवासी विठ्ठल धाइंजे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## अक्कलकोट येथे माहिती अधिकार कार्यकर्ता कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ जून-**

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी निवृत्त अधिकारी अविनाश मोकाशी, प. महाराष्ट्र अध्यक्ष संजय किणीकर, जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे, शहर अध्यक्ष श्रीकांत कोळी, प. महाराष्ट्र संघटक डॉ. सत्यजित म्हस्के, कार्यकारी प्रचारप्रमुख मारुती जाधव, जिल्हा सह संघटक दत्ता पवार, महिला जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती वैशाली हावणुर तसेच माताजी बिल्ला यांच्या व जिल्हयातील महासंघाचे सर्व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत माहिती अधिकार कार्यकर्ता कार्यशाळा उत्स्फूर्त संपन्न झाली.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अविनाश मोकाशी यांच्या मानवाधिकार व माहिती अधिकार या विषयाने पहिल्या सत्राची सुरुवात झाली. नवीन कार्यकर्ता नोंदणी १५ जूनपर्यत मुदत असून जास्तीत जास्त नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. पिंपरी चिंचवड, पुणे येथील श्री केवट यांनी देखील मार्गदर्शन केले.

## पालखी सोहळ्यात वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी प्रशासन कटीबद्ध

### पालकमंत्री जयकुमार गोरे; नातेपुते पालखी तळाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ७ जून-**

कैवल्य चक्रवर्ती संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा व आषाढी वारीच्या निमित्ताने नातेपुते येथील माऊली पालखी तळाचे राज्याचे ग्राम विकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पाहणी करून येथील मुक्कामाच्या ठिकाणी सर्व सोयी सुविधा देण्यासाठी निधीची कमतरता कमी पडून देणार नाही सर्व सोयी सुविधा देण्यासाठी प्रशासनाकडून



तयारी सुरू असून माऊलींच्या पालखी सोहळ्यात येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग तळ मुक्काम या ठिकाणी सुविधा देण्यासाठी प्रशासन कटबद्ध असल्याचे सांगण्यात आले.

पालखी मुक्कामाच्या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह लाईट, पाणी, शौचालय हिरकणी कक्षा उभारण्यात येणार आहे, यावेळी कारंडे येथे विसावा ठिकाणी धर्मपुरी येथील स्वागत कक्षा याची पाहणी केली. यावेळी माजी आमदार रामभाऊ सातपुते जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अध्यक्ष अतुल कुलकर्णी, उपनगरध्यक्ष अतुल पाटील, ज्येष्ठ नगरसेवक एडवोकेट भानुदास राऊत, प्रांताधिकारी विजया पांगारकर, पोलीस उपअधीक्षक नारायण शिरगांवकर, तहसिलदार सुरेश शेजूळ, सपोनि महारुद्र परजने, नायब तसिलदार अमोल कदम, गटविकास अधिकारी आबासाहेब पवार, मुख्याधिकारी विकास शिंगाडे, राजेंद्र पांढरे, सतीश सपकाळ, अक्षय भांड, राजाभाऊ हिवरकर, देविदास चांगण, नंदुकुमार लांडगे, संजय मामा उराडे,

> **टोल माफी मिळावी**
>
> सोलापूर जिल्ह्यातून शेजारील मराठवाडा विदर्भ तसेच सर्व तालुक्यासह कर्नाटक राज्यातून आषाढी वारीच्यानिमित्त श्री क्षेत्र देहूला व श्री क्षेत्र आळंदीला जाण्यासाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमधून सूट देण्यात यावी. अशी मागणी वारकरी भाविकांच्या वतीने करण्यात आली आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा प्रस्थान दि.१८ जून रोजी तसेच कैवल्य चक्रवर्ती सम्राट संत ज्ञानेश्वर महाराज प्रस्थान दि.१९ जून रोजी असून. दि. १५ जून ते २० जून पर्यंतच्या कालावधीमध्ये वारकऱ्यांची वाहने देहू व आळंदीकडे प्रस्थान होतील या दरम्यान वारकऱ्यांच्या सर्व वाहनांना सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी राजुरी या ठिकाणी टोलनाक्यावरती टोल माफी मिळावी.
>
> **- श्रीराम महाराज भगत,** नातेपुते परिसर दिंडीचे प्रमुख